TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192212
UNIVERSAL LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M928 K45J Accession No. M448

Author ખલિલ જિબ્રાન.

Title જીવનદર્શન.

This book should be returned on or before the date last marked below.

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प २६ वें

# जीवन-दर्शन

महाकवि खलिल गिब्रान
याच्या The Prophet नामक विख्यात ग्रंथाचा अनुवाद

अनुवादक
रघुनाथ गणेश जोशी, वाङ्मयविशारद

★

डिसेंबर १९४१ ]  मूल्य २ रु.

प्रकाशक
**गोविंद वामन कुलकर्णी**
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणें २

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

मुद्रक
**श्री. र. राजगुरु**
राजगुरु प्रेस, ४०५ नारायण, पुणें २

# दर्शन-परिचय

कारागृहवासांतील जीवन तत्त्वचिंतनाला आणि आत्मशोधनाला विशेष अनुकूल असल्याचें अनुभवास आलेलें आहे. म. गांधींच्या १९३० मधील सत्याग्रहाच्या चळवळींत खलिल गिब्रानचा Prophet हा मूल्यवान् ग्रंथ सत्याग्रहींच्या हातीं पडला. तेव्हांपासून सत्याग्रही सेवकांमध्यें या ग्रंथाला मोठी मान्यता मिळाली आहे. मला स्वतःलाहि या ग्रंथांतील विचारसौंदर्यानें चांगलेंच आकर्षित केलें. गेल्या दहा-बारा वर्षांत अध्यापन-प्रवचनद्वारा मी या ग्रंथाचा प्रचार करीत आलों आहें; आणि त्यामुळें हा मराठी अनुवाद वाचकांच्या हातीं देतांना मला फार आनंद वाटत आहे. सहा वर्षांपूर्वी श्री. किशोरलालभाई मश्रूवाळा यांनीं Prophet चा गुजराती अनुवाद केला आहे. अलीकडे हिंदींतहि तो झाला आहे. श्री. महादेवभाई देसाई यांनीं म. गांधींच्या 'हरिजन' पत्रामध्यें याची खूप प्रशंसा केली होती; आणि Prophet मधील श्रमावरील प्रवचन अवतरिलें होतें. नागपूरच्या 'विहंगमां'तून खलिल गिब्रानच्या The Madman आणि The Wanderer या पुस्तकांचे श्री. काकासाहेब कालेलकर यांनीं केलेले अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत. Sand and Foam याचाहि काकासाहेबांनीं केलेला अनुवाद मीं पाहिला आहे. अद्यापि तो कोणी प्रकाशित केला नाहीं. The Prophet हें खलिल गिब्रानच्या सर्व पुस्तकांत अत्यंत श्रेष्ठ पुस्तक आहे. मला आशा आहे, कीं प्रस्तुत अनुवादाचे द्वारा महाराष्ट्रीय वाचकांत खलिल गिब्रानचे इतर ग्रंथहि वाचण्याची जिज्ञासा जागृत होईल; आणि त्यांचेहि अनुवाद ग्रंथरूपानें प्रसिद्ध होतील.

इतक्या सुंदर ग्रंथांची निर्मिति करणाऱ्या थोर ग्रंथकाराचें जीवन जाणण्याची इच्छा होणें अगदीं स्वाभाविक आहे. पण दुःखाची गोष्ट कीं, या ग्रंथकाराचें चरित्र अद्यापि कोठेंच उपलब्ध होत नाहीं. त्याच्या ग्रंथांच्या प्रकाशकांनीं जी कांहीं तुटपुंजी माहिती दिली आहे तिच्यावरच भूक भागवून घ्यावी लागते. खलिल गिब्रान याचा जन्म इ. स. १८८३ मध्यें सीरिया देशांतील माउंट लेबानॉनमध्यें झाला. यहुदी लोकांचे अनेक पैगंबर या प्रदेशांत जन्म पावल्यामुळें इतिहासांत याची फार प्रसिद्धि आहे. बारा वर्षांचा असतांना तो आपल्या आईबापांबरोबर बेल्जियम, फ्रान्स आणि अमेरिका या देशांत गेला होता. पण सुमारें दोन वर्षांनंतर तो आपल्या सीरिया देशाला परत आला आणि बइरुतच्या ‘ अल् हिकमत ’ पाठशाळेंत दाखल झाला. इ. स. १९०३ मध्यें तो पुनः अमेरिकेला गेला आणि तेथें पांच वर्षें राहून चित्रकलेचा अभ्यास करण्यासाठीं पुनः फ्रान्समध्यें गेला. इ. स. १९१२ मध्यें अमेरिकेंत जाऊन तेथेंच स्थायी झाला. १९३१ मध्यें अंत होईपर्यंत तो न्यूयॉर्कमध्येंच राहिला होता. अरबी भाषेमध्यें त्यानें विपुल ग्रंथरचना केली आहे. अरबी भाषा जाणणारे लक्षावधि लोक त्याला अलौकिक प्रतिभेचा पुरुष मानितात. खलिल गिब्रान हा महाकवि, तत्त्वज्ञानी आणि चित्रकार होता. त्याची कीर्ति सर्व जगभर पसरली आहे. त्याच्या ग्रंथांचीं भाषांतरें विसाहून अधिक भाषांत झालेलीं आहेत; आणि त्यानें काढिलेलीं चित्रें पाश्चात्य देशांतील बहुतेक प्रमुख नगरांत दाखविलीं गेलीं आहेत. सुमारें १९१८ पासून त्यानें इंग्रेजींत रचना करण्यास प्रारंभ केला. इंग्रेजीमध्यें त्याचीं एकंदर नऊ पुस्तकें प्रसिद्ध आहेत. त्याच्या सर्व पुस्तकांत त्याचीं स्वतःचीं चित्रेंहि दिलेलीं आहेत.

खलिल गिब्रान याची चित्रकार म्हणूनहि सर्वत्र ख्याति झालेली आहे. त्याच्या वाङ्मयाप्रमाणेंच त्याची चित्रकलादेखील आध्यात्मिक

वृत्तीनें भारलेली आहे. त्याच्या चित्रांतील मानवाकृती दिगंबर असतात, पण त्यामुळें कोठेंहि पावित्र्याची हानि झालेली मला भासली नाहीं. कवि आणि चित्रकार असा योग फार दुर्मीळच. विलियम ब्लेक ( William Blake ), रसेल ( A. E. ), रवीन्द्रनाथ ठाकूर हे असे विरल कलावंत होऊन गेले. खलिल गिब्रान याची गणनाहि यांच्याच मालिकेंत करण्यासारखी आहे. प्रख्यात फ्रेंच शिल्पकार ऑगस्ट रोडिन ( Auguste Rodin ) यानें खलिलच्या चित्रांची विलियम ब्लेक याच्या चित्रांशीं तुलना केली आहे. 'प्रॉफेट'मध्यें त्याचीं बारा चित्रें दिलीं आहेत. महाराष्ट्रीय वाचकांना त्याच्या चित्रकलेचाहि थोडा आस्वाद चाखण्यास मिळावा म्हणून त्यांतील चार निवडक चित्रें या अनुवादाबरोबर देण्यांत येत आहेत.

'मॅडमन' हा खलिलचा पहिला इंग्रेजी ग्रंथ होय. तो १९१८ मध्यें प्रसिद्ध झाला. या प्रथम कृतींतहि त्याच्या प्रतिभेच्या बहुतेक छटा पाहावयास मिळतात. परिशिष्टांत "मी वेडा कसा झालों?" या नांवाखालीं या ग्रंथाची कल्पना सूचित केलेली आढळेल. 'The Madman' आणि 'The Prophet' यांच्या दरम्यान त्याचे दोन ग्रंथ प्रसिद्ध झाल्याचें सांगतात. पण मला ते ग्रंथ पाहावयास सांपडले नाहींत. त्यांचें स्वरूप काय आहे याचीहि मला कोठें माहिती मिळूं शकली नाहीं. 'सँड अँड फोम' ( १९२५ ) यांत जीवनाच्या सागरावर लाधलेल्या ज्ञान-कणिका त्यानें उधळून दिल्या आहेत. 'Jesus : The Son of Man' ( १९२८ ) या पुस्तकांत त्यानें येशू ख्रिस्ताचें चरित्र वर्णिलें आहे. ख्रिस्ताच्या जीवनांत ज्या ज्या व्यक्तींचा संबंध आला आहे त्या त्या व्यक्तींच्या मुखांनीं हें ख्रिस्तचरित्र वदविलें असल्यामुळें यांत नावीन्य आणि ताजेपणा निर्माण झाला आहे. 'The Earth Gods' ( १९३१ ) या पुस्तकानें आपल्यावर विशेष छाप पाडिली नाहीं असें श्री. किशोरलाल-

भाईनीं लिहिलें आहे. पण श्री. काकासाहेब कालेलकरांना त्याची कल्पना फारच भव्य वाटते. मला हें पुस्तक अद्यापि पाहावयास मिळालें नसल्यामुळें कांहींच सांगतां येत नाहीं. ' The Wanderer ' आणि ' The Garden of the Prophet ' हे दोनहि ग्रंथ कवीच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाले. वॉंडरर (१९३२) मध्यें जीवनाच्या परिणतावस्थेंतील अनेक अनुभव लहान लहान गोष्टींच्या रूपानें गुंफलेले आहेत. जीवनाचा कटु अनुभव त्यांत मिसळलेला असला तरी त्यांत भरपूर माधुर्यहि आढळतें. परिशिष्टांतील उताऱ्यांवरून याची थोडी कल्पना येईल. ' दि गार्डन ऑफ दि प्रॉफेट ' हा त्याचा शेवटचा ग्रंथ होय. मरणापूर्वी कित्येक वर्षे खलिल यानें याच्या निर्मितीचें चिंतन चालविलें होतें. हा ग्रंथ म्हणजे त्याच्या ' प्रॉफेट 'ची पुरवणीच आहे. यांत प्रॉफेटमधील जीवनविषयक चर्चा पुढें चालविली असून तात्त्विक विवेचनहि बरेंच आहे. ' राष्ट्र 'विषयक विचारांचा एक उतारा परिशिष्टांत दिला आहे. त्यावरून त्यांतील विचारांची व्यापकता सहज दिसून येईल.

तथापि ' प्रॉफेट ' (१९२३) हाच याचा ग्रंथराज होय. अमेरिका आणि इंग्लंड या दोनहि देशांत या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या आजपर्यंत निघाल्या आहेत. अगदीं स्वल्प किंमतींतहि अलीकडे हा ग्रंथ मिळण्याची सोय झाली आहे. प्रसिद्ध आयरिश कवि, तत्त्वज्ञ आणि सहकारी शेतीच्या चळवळीचा प्रवर्तक A. E. ऊर्फ जॉर्ज रसेल यानें खलिलच्या या ग्रंथराजाची पुढील शब्दांत स्तुति केली आहे :

" रवीन्द्रनाथ ठाकूर यांच्या 'गीतांजली'नंतर कवि आणि चित्रकार खलिल गिब्रान याच्या ' प्रॉफेट ' इतकी सुंदर वाणी पूर्वेकडून कानीं आली आहे असें मला वाटत नाहीं. विचारसौंदर्यांत याला मागें टाकील असा ग्रंथ गेल्या कित्येक वर्षांत मीं पाहिला नाहीं. ' आकारसौंदर्यापेक्षां विचारसौंदर्य

मनाला अधिक मोहनी घालतें ' असें सॉक्रेटिसानें बँक्वेट ( Banquet ) मध्यें म्हटलें आहे. त्याचा अर्थ हा ग्रंथ वाचीत असतां मला चांगला उमजला. ...... पानागणिक मला यांतून अवतरणें देतां येतील आणि प्रत्येक पानावर कांहीं ना कांहीं सुंदर व प्रेरक विचार सहज सांपडेल. ''

'कन्ट्री लाईफ' नांवाच्या नियतकालिकांत पुढील अभिप्राय आढळतो :

" या ग्रंथाच्या लेखकानें जुनीं सत्यें–आणि सत्यें सारीं जुनीच असतात–पण नव्या आणि अधिकारयुक्त वाणीनें सांगितलीं आहेत. जीवन, प्रेम, विवाह, बालकें, श्रम, हर्ष, दुःख, मरण इत्यादी महान् वस्तूंविषयीं त्यानें निर्भयपणें लिहिलें आहे. लहान माणसांना हे विषय केवळ निरर्थक शब्दावडंबराचेच भासतात पण या विषयांवर लिहितांना त्यानें निष्ठा, गभीरता, कल्पकता आणि भाषासौंदर्य हे गुण इतके प्रकट केले आहेत कीं, कबीर आणि जलालुद्दिन, ट्राहर्न ( Traherne ) आणि ब्लेक यांच्यासारख्या महान् साक्षात्कारी लेखकांच्या मालिकेंत या ग्रंथकाराला एकदम नेऊन बसविण्यास आपणांला हरकत वाटत नाहीं. ''

खलिल हा जीवनाचा शोध घेणारा क्रांतदर्शी कवि आहे. लौकिकाचीं चित्रें रेखाटणाऱ्या सामान्य लेखकांची दृष्टि जीवनाच्या बहिरंगावरच बहुधा खिळून राहिलेली असते. त्यांच्या लेखनांत संसारी मनाला थोडाफार विरंगुळा लाभतो; नाहीं असें नाहीं पण जीवनाच्या अंतरंगांतील अनंत प्रदेशांत काय काय चिजा सांठविलेल्या आहेत, कोणकोणत्या प्रेरणा लपून राहिल्या आहेत याचें दर्शन त्यांच्या लेखनांत कधींच आढळावयाचें नाहीं. त्यासाठीं खलिलसारख्या अलौकिक प्रतिभेच्या असामान्य कलावंतांचीच कांस धरिली पाहिजे. वरवर पाहणाराला अशा कवींचें काव्य गूढ भासतें आणि कोठल्याहि गूढतेचा ठाव पाहण्याची सामान्य बुद्धीची प्रवृत्ति नसल्यामुळें जें गूढ तें दुर्बोध, आणि जें दुर्बोध तें अर्थशून्य अशीं समीकरणें बांधण्याची त्या बुद्धीला घाई होते. यामुळें साक्षात्कारी लिखाणाला कमी लेखण्याचा एक संप्रदायच सांप्रत

निर्माण झाला आहे. खलिलसारख्या लेखकांना त्याची चांगली जाणीव असते; आणि म्हणून ते आपण होऊनच आपणांला 'मॅडमन' (पागल), 'वॉंडरर' (भटक्या) अशीं नांवें घेत असतात. वस्तुतः हेच खरे शाहणे आणि ज्ञाते म्हटले पाहिजेत.

**"सर्व भूतांस जी रात्र जागतो संयमी तिथें"**

अशी त्यांची स्थिति असते.

**"व्यर्थीं अधिकच अर्थ वसे**
**तो त्यांस दिसे,**
**ज्यां म्हणति पिसे"**

या केशवसुतांच्या शब्दांत वर्णिल्याप्रमाणें या 'पिशां'नाच जीवनाचा परम अर्थ सांपडलेला असतो. आणि म्हणून यांचीच वाणी अर्थपूर्ण आढळते. तो अर्थ इतका गाढ असतो कीं, एकाच वाचनानें तो हस्तगत होऊं शकत नाहीं अथवा एकाच वृत्तीपुरता तो मर्यादित असत नाहीं. अनुभूतीची वाणी तार्किक प्रत्यक्षापेक्षां विशाल आणि व्यापक असल्यामुळें तिचा अर्थ कोणत्याहि एका साच्यांत संपूर्णपणें सामावूं शकत नाहीं. पण हा तिचा दोष नसून श्रेष्ठ प्रकारचा गुणच समजला पाहिजे. जडाकडून चेतनाकडे, आधिभौतिकाकडून आध्यात्मिकाकडे जसजसें जावें, तसतसें ज्ञानाचें स्वरूप विशाल आणि विरल होत जातें. पण त्याची स्वसंवेद्यताहि वाढत गेल्यामुळें त्याचें प्रामाण्य दृढावत जातें. यामुळें भौतिक शास्त्रांपेक्षां आध्यात्मिक शास्त्रें गूढ भासतात खरीं; पण तेवढ्यावरून तीं कमी प्रतीचीं ठरवितां येणार नाहींत. यासंबंधीं अध्यात्मज्ञानावरील कोणत्याहि ग्रंथांत अशीच मीमांसा आढळेल. विख्यात तत्त्वज्ञ सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या 'An Idealist View of Life' या ग्रंथांतील पुढील उतारा पाहण्यासारखा आहे :

"The lower we descend the more clear may be our knowledge. . . Mathematical knowledge

may be very much clearer than our knowledge of the world as a closed energetic system, which may be clearer than a knowledge of it as the environment of life and sentience. The knowledge of ourselves as ethical beings may be much clearer than that of the world as spirit and yet it is this mysterious, unclear and inarticulate knowledge that brings us closest to reality."

*(Page 311)*

ज्ञानाच्या श्रेणीवर जसजसें आपण चढत जाऊं तसतसें तें ज्ञान अस्पष्ट होत जातें. पदार्थविज्ञानापेक्षां रसायनशास्त्रांतील आणि रसायनशास्त्रापेक्षां जीविशास्त्रांतील ज्ञान कमी स्पष्ट असतें. मानसशास्त्र अथवा नीतिशास्त्र यांतील ज्ञानें त्यांहूनहि अधिक अस्पष्ट वाटतात; आणि आत्मस्वरूपाचें ज्ञान तर

**"यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह"**

यांत म्हटल्याप्रमाणें अनिर्वचनीयच असतें. तथापि हेंच ज्ञान आपणांला सत्याचा सर्वोच्च साक्षात्कार घडवून आणीत असल्यामुळें निरतिशय आनंदाचा लाभ करून देतें.

रवीन्द्रनाथांनीं 'गीतांजलीं'त म्हटलें आहे :

"I put my tales of you into lasting songs. The secret gushes out from my heart. They come and ask me, 'Tell me all your meanings.' I know not how to answer them. I say, 'Ah, who knows what they mean!' They smile and go away in utter scorn. And you sit there smiling."

"माझ्या गीतांत मी तुझ्या कथा ओवतों. त्यांमधून माझ्या हृदयांतील रहस्य बाहेर धावून येतें. लोक मला विचारतात,

'याचा सर्व अर्थ सांगा.' काय उत्तर द्यावें हें मला कळत नाहीं. मी म्हणतों, 'कोण जाणे काय अर्थ आहे!' आणि मग लोक हंसतात व तुच्छतेनें निघून जातात. तूं मात्र हंसत असतोस."

केशवसुतांनीं देखील असेंच वर्णिलें आहे :

" ज्ञाताच्या कुंपणावरून
धीरत्व धरून
उड्डाण करून
चिद्घनचपला ही जाते
नाचत तेथें चमचमते
अंधुक आकृति तिस दिसती
त्या गाताती
निगूढ गीती "

प्रॉफेटमध्यें शेवटीं म्हटलें आहे :

" If these be vague words, than seek not to clear them."

" हे शब्द अस्पष्ट असतील तर ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न करूं नका."

कारण,

" Life, and all that lives, is conceived in the mist and not in the crystal."

" जीवनाची, आणि चैतन्यमय अशा सर्व वस्तूंची गर्भधारणा दंवबिंदूंत होत असते; स्फटिकांत ती होत नाहीं."

आणि हें सारें अगदीं यथार्थ आहे. म्हणूनच जीवनाचीं अंतिम सत्यें तर्काच्या शास्त्रीय ग्रंथांत न सांपडतां तीं साक्षात्कारी कवींच्या आर्ष वाणींतच सांपडतात. जगांतील सर्व धर्मग्रंथ हे अशाच ऋषींचे काव्योद्गार आहेत. वस्तुतः अशा आर्ष काव्यांतील अर्थ

अनंत असतो. ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणें आणि अधिकाराप्रमाणें त्याला तो घेतां येतो.

" From the words of the poet men take what meanings please them; Yet their last meaning points to thee."

रवीन्द्रनाथांच्या 'गीतांजली'तील या वचनाचा अर्थहि हाच आहे.

जॉर्ज रसेल ( A. E. ) यानें 'प्रॉफेट'ची 'गीतांजली'शीं तुलना केली आहे ती साक्षात्कारी ( Mystic ) काव्य या दृष्टीनेंच होय. 'गीतांजलीं'त मुख्यतः परमात्म्याचीच आळवणी आहे. त्यामुळें जीवनाच्या आध्यात्मिक अंशाचेंच विवरण तींत प्रामुख्यानें सांपडतें. तथापि प्रार्थना, विपत्ति, विरक्ति, भूतसेवा, मृत्यु, मरणोत्तर जीवन इत्यादी विषयहि 'गीतांजलीं'त आले आहेत. कारण यांचा आध्यात्मिक जीवनाशीं नित्य आणि निकट संबंध असतो. 'गीतांजलीं'त कर्मयोगाचाहि गौरव केलेला आहे. कारण निष्काम कर्मयोग हेंच चित्तशुद्धीचें सर्वांत सुलभ साधन आहे. यामुळें 'गीतांजलि' हें भक्तिपर काव्य असलें तरी, तींत जीवनाचें संपूर्ण दर्शन सूचित झालेलें आहे. खलिल गिब्रान याचा 'प्रॉफेट' हा ग्रंथ साक्षात्कारी दृष्टीनें भारलेला आहे हें खरेंच; पण वैयक्तिक आणि सामाजिक अशा दोनहि दृष्टींनीं जीवनाचें संपूर्ण दर्शन उभें करणें हा या ग्रंथाचा प्रधान उद्देश आहे. 'गीतांजलीं'त जी सामाजिक दृष्टि सूचित होते तिचा सामाजिक जीवनाच्या दृष्टीनें 'प्रॉफेट'मध्यें पूर्ण आविष्कार पाहावयास मिळतो. खलिलचें चरित्र उपलब्ध नसल्यामुळें 'गीतांजली'चा प्रत्यक्ष परिणाम त्याच्या लेखनावर झाला असेल कीं काय, हें सांगतां येत नाहीं. स्वतंत्रपणेंहि त्याच्या प्रतिभेनें आपली जीवनसृष्टि शोधिली असेल. बायबलचा परिणाम त्याच्या जीवनावर विलक्षण झालेला दिसतो. 'प्रॉफेट'मधील

लेखनशैली थेट बायबलच्या वळणावरच आहे. आणि ख्रिस्ताचा प्रेमसंदेश सामाजिक जीवनांत सर्वांशानें आणण्याची जो कोणी धडपड करील त्याला 'प्रॉफेट'मध्यें दाखविलेल्या जीवन-दर्शनाकडेच यावें लागेल. या दृष्टीनें पाहतां खलिलचा विचार-विकास बायबलच्या स्फूर्तीनेंहि झाला असण्याचा संभव आहे. तें कसेंहि असो; 'प्रॉफेट' हा एक जीवन-दर्शनाचा ग्रंथ असल्यामुळें त्याची थोरवी अलौकिक समजली पाहिजे. यासाठींच 'प्रॉफेट'च्या या मराठी अनुवादाला 'जीवन-दर्शन' असें नांव देण्यांत येत आहे. इतर कोणत्याहि काव्यात्मक नांवापेक्षां हें नांव अधिक अर्थबोधक होईल असें मला वाटतें.

रवीन्द्रनाथ, खलिल गिब्रान हे साक्षात्कारी कवी या दृष्टीनें ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर, जलालुद्दिन इत्यादिकांच्या मालिकेंतील असले तरी, त्यांच्या काव्यांत आधुनिकता भरून राहिली असल्यामुळें त्यांना वैशिष्टय प्राप्त झालें आहे. समता हा आधुनिक विचाराचा एकमेव निष्कर्ष सांगतां येईल. राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा समाजाच्या सर्व विभागांत विकासाच्या समान संधी समाजांतील प्रत्येक घटकाला सारखेपणानें उपलब्ध झाल्या पाहिजेत हा समतेचा अर्थ समजला जातो. अशा सामाजिक समतेच्या निर्मितीसाठीं एका नव्या जीवन-दर्शनाची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. आध्यात्मिक ऐक्याच्या पायावरच समतेची सामाजिक इमारत उभारतां येईल. आधुनिकते (Modernism)-चा निश्चित अर्थ अद्यापि ठरावयाचा आहे. जडवाद हाच आधुनिकतेचा प्राण होय असें कांहींचें म्हणणें आहे. भौतिक सुखवाद हीच आधुनिकतेची मुख्य कसोटी आहे असेंहि कांहीं लोक मानितात. स्वैराचार हेंच आधुनिकतेचें स्वरूप अशी देखील कित्येकांची कल्पना दिसते. यामुळें सध्यां वैचारिक सृष्टींत बराच गोंधळ माजलेला आहे. पण सामाजिक ध्येयवाद याचें खरें स्वरू

तत्त्वतः आध्यात्मिकच असतें. कारण, तो व्यक्तीला स्वतःच्या सुखापलीकडे आणि स्वतःच्या मर्यादित जीवनापलीकडे घेउन जात असतो. ध्येयवादाची आंतरिक स्फूर्ति ही आत्म्याच्या अमर आकांक्षांतूनच उद्भवत असते; आणि ध्येयवादाचें स्वरूप जितकें व्यापक असेल तितका तो सर्वोदयकारी आणि अखिल जीवनाला कल्याणप्रद होतो. ध्येयवादाच्या सिद्धीसाठीं ज्या साधनांचा स्वीकार करावयाचा असतो, तीं साधनें जितकीं शुद्ध आणि मांगल्यपूर्ण असतील तितकें ध्येयवादाला यश प्राप्त होत असतें. यामुळें सामाजिक आदर्शांची सिद्धि होण्यासाठीं त्या आदर्शांच्या उपासकांच्या जीवनांत उदार आणि उन्नत भावनांची अव्याहत उपासना चालत राहिली पाहिजे. म्हणूनच जीवनाला आध्यात्मिकतेचें अधिष्ठान अपरिहार्य होतें. माझ्या समजुतीनें आधुनिकतेचा अध्यात्माशीं विरोध असण्याचें कारण नाहीं. मात्र अध्यात्म ही केवळ वैयक्तिक जीवनाची गोष्ट समजतां कामा नये. त्याचें समाजीकरण झालें पाहिजे. यालाच अध्यात्माचें कर्मयोगी स्वरूप म्हणतात. 'गीतांजलि' अथवा 'प्रॉफेट' या ग्रंथांत हाच आध्यात्मिक कर्मयोग चित्रिलेला आहे. आणि म्हणूनच ते आधुनिक जगाला आकर्षक वाटत आहेत.

खलिल ग्रिबानच्या 'जीवन-दर्शना'त मानवजीवनांतील सर्व प्रमुख प्रश्नांचा ऊहापोह आला आहे. मानवी जीवन हा विश्व-जीवनाचा अथवा परमेश्वरी जीवनाचा एक अंश आहे. मानवाच्या हृदयांत उसळणाऱ्या आशा-आकांक्षा या परमेश्वराच्या प्रेरणा आहेत आणि हा दृश्य प्रपंच अदृश्य अंतरात्म्याची लीला आहे ही खलिलची जीवनविषयक प्रधान कल्पना आहे.

" यदयं सर्वं आत्मा "

या औपनिषद दर्शनाप्रमाणेंच खलिलचें जीवन-दर्शन अद्वैतरूपच आहे. प्रेम, जीवन, ईश्वर अशा विविध शब्दांनीं खलिल

एकाच चिद्वस्तूचें वर्णन करीत असतो. कित्येक वेळां त्याच्या लिहिण्यांत असें भासतें, कीं 'जीवन' या शब्दानें तो चैतन्याच्या निर्गुण स्वरूपाचा उल्लेख करीत असावा, आणि चैतन्याच्या सगुण स्वरूपाला ईश्वर हें नांव असावें. पण कांहीं ठिकाणीं व्यक्ताव्यक्त चैतन्यसागराला तो जीवन म्हणून संबोधितो आणि ईश्वर ही त्या चैतन्यसागराची नियामक शक्ति होय असें मानीत आहेसें दिसतें. प्रारंभींच त्यानें जें प्रेमावर प्रवचन केलें आहे त्यांतील प्रेम या शब्दाचा अर्थ जीवन-प्रेम असा आहे. ती एक परमेश्वराचीच प्रेरणा आहे. मनुष्यानें आपल्या आयुष्यांत या परमेश्वरी प्रेरणेशीं कधीं प्रतारणा करू नये. त्या प्रेरणेला सर्व भावानें शरण जाण्यांतच त्याचा पुरुषार्थ सांठविलेला आहे. ही प्रेरणा बुद्धीच्याहि पलीकडची असल्यामुळें तिचें संपूर्ण स्वरूप आगाऊ आकलन होत नाहीं. तथापि आत्मनिवेदनबुद्धीनें त्या प्रेरणेशीं एकरूप झालें असतां जीवनाचीं अज्ञात दालनें एकाएकीं खुलीं होतात. जीवनाची ही प्रेरणा अथवा जीवन-प्रेम हें कधीं रुद्रस्वरूपी तर कधीं शिवस्वरूपी असतें. आपल्या घोर आणि मंगल अशा दोनहि स्वरूपांनीं तें जीवनांत आविष्कृत होत राहतें. जीवनोपासकानें या दोन्ही स्वरूपांत त्याला जाणण्याची शक्ति प्रथम संपादिली पाहिजे. खलिलचें प्रारंभींचें प्रेमावरील प्रवचन हें त्याच्या एकंदर जीवन-दर्शनाचें सारसर्वस्वच आहे. हें प्रवचन एकदां नीट आकलन झालें तर त्याच्या पुढील सर्व विवेचनाचा आपोआप उलगडा होईल.

'लग्न', 'बालकें', 'अपराध आणि शासन', 'साधुता आणि दुष्टता' आणि 'सुख' या विषयांवरील त्याचे विचार अभ्यासपूर्वक अवलोकिण्यासारखे आहेत. मनुष्य हा तत्त्वतः परमेश्वराचा अंश असल्यामुळें त्याच्या जीवनांत मांगल्याचीं बीजें असणारच. प्राचीन काळापासून साक्षात्कारी साधुसंत हीच श्रद्धा बाळगीत आले आहेत. आणि आधुनिक काळांतील समतेचे पुरस्कर्ते कळत नकळत

याच श्रद्धेचा स्वीकार करीत आहेत. आधुनिक काळांत शिक्षण-शास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र इत्यादी जीवनाच्या प्रमुख शास्त्रांत नियंत्रणापेक्षां स्वातंत्र्याला आणि शासनापेक्षां सहानुभूतीला अधिक मानाचें स्थान देण्यांत येऊं लागलें आहे. स्त्री ही पुरुषाची सदैव अंकितच राहिली पाहिजे, आज्ञापालन एवढाच बालकांचा धर्म होय, दुष्टांचें कठोरपणें दंडन व निर्मूलनच केलें पाहिजे, सुखाची वासना ही दडपूनच टाकिली पाहिजे असे सिद्धांत सामाजिक जीवनांत अगदीं दृढमूल झालेले आजवरच्या इतिहासांत आढळून येतात. बुद्धाचा अवैराचा, ख्रिस्ताचा अप्रतीकाराचा आणि सर्व साधुसंतांचा प्रेमाचा संदेश आजवर सामाजिक दृष्ट्या अव्यवहार्य म्हणून उपेक्षिला आणि अवमानिला गेला आहे. पण आधुनिक विचारांचें वळण पुनः आध्यात्मिक प्रकृतीच्या संतमहात्म्यांच्या जीवन-दर्शनाकडेच चाललेलें दिसत आहे.

अगदींच असामान्य अपवाद वगळले तर स्त्री आणि पुरुष या दोघांच्याहि जीवनविकासाला विवाह आवश्यक आहे. पुरुषानें आपल्या पाशवी बलावर स्त्रीला गुलाम बनविलें असल्यामुळें आधुनिक कालांत स्त्रीनें पुरुषवर्गाविरुद्ध बंड उभारलें आहे. पुरुषानें विवाहसंस्थेचा दुरुपयोग केल्यामुळें आज स्त्रीनें विवाहसंस्थेवरच हत्यार उगारलें आहे. पण खुद्द बर्ट्रॉं रसेल यानें ' Marriage and Morals ' या आपल्या प्रख्यात पुस्तकांत विवाह हीच स्वाभाविक स्थिति आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. आणि पतिपत्नींना काडीमोड करावा लागणें ही त्यांचे जीवनांतलि अपेशी गोष्ट आहे असाच निर्णय दिला आहे. विवाह ही केवळ भौतिक अथवा आर्थिक संस्था नाहीं. विवाहाचा आदर्श जीवनाचा संपूर्ण विकास करणें हाच आहे. या आदर्शाच्या सिद्धीसाठीं पति आणि पत्नी या दोघांच्याहि व्यक्तित्वाचा समांतर विकास होत गेला पाहिजे.

पत्नीनें आपल्या व्यक्तित्वाचा पतीच्या व्यक्तित्वांत विलय केला तर पति विलासी आणि सत्तालोलुप बनतो; आणि पत्नीच्या कपाळीं दास्यत्व येतें. पतीच्या पाशवी बलाविरुद्ध झगडण्यासाठीं तिला 'अनृतं साहसं माया' इत्यादि कापट्यपूर्ण शस्त्रांचा अंगीकार करावा लागतो. याच्या उलट पुरुषानें स्त्रीचा अनुनय करण्याची आणि पत्नीच्या व्यक्तित्वांत पतीनें आपलें व्यक्तित्व विलीन करण्याची कल्पना स्त्रीला उन्मादी आणि पुरुषाला लंपट बनविते. विवाहाच्या आदर्शांत पतिपत्नींनीं एकमेकांत विलीन व्हावयाचें नसून, दोघांनीं मिळून जीवन-धर्माचा परिपोष करावयाचा आहे. गृहस्थधर्मांत पति हा जसा गृहाचा स्वामी असतो तशीच पत्नी ही गृहाची स्वामिनी असते. आणि दोघांच्याहि जीवनावर गृहस्थधर्माचें अधिराज्य चालतें. पत्नी ही पतीची सहचारिणी नव्हे, तर सहधर्मचारिणी असते.

"Only the hand of Life can contain your hearts."

"केवळ जीवनाच्या हातांतच तुमचीं हृदयें सामावणें शक्य आहे."

या खलिलच्या वाक्याचा हाच अर्थ आहे.

'बालकां'वरील प्रवचनांत खलिलनें व्यक्त केलेले विचारहि आधुनिक शिक्षणशास्त्राला मान्य होत चालले आहेत. जमदग्नीच्या आज्ञेसरशीं रेणुकेची मान आपल्या कुऱ्हाडीखालीं तोडणाऱ्या परशुरामाचें आज्ञापालन हा कांहीं आदर्श पुत्रधर्म नव्हे. सत्यासाठीं हिरण्यकश्यपूच्या विरुद्ध बंड करणारा प्रल्हाद आणि कैकेयीचा धिक्कार करून अरण्यवास पतकरणारा भरत हेच आदर्श पुत्र समजले पाहिजेत. रवीन्द्रनाथांनीं 'स्नेह-ग्रास' नांवाच्या सुनीतांत बालकाविषयीं मातेला केलेला उपदेश खलिलसारखाच आहे. ते लिहितात :

" निजेर से, विश्वेर से, विश्वदेवतार
संतान नोहे गो मातः संपत्ति तोमार "

" बालक हें स्वतःचें, विश्वाचें आणि विश्वदेवतेचें आहे. माते, बालक ही कांहीं तुझी खाजगी संपत्ति नव्हे."

बालकांच्या रूपानें जीवन पुनःपुनः अवतरत असतें. यामुळेंच जीवनाचें अमरपण सिद्ध होतें. मागच्या पिढीच्या अपुऱ्या आकांक्षा पुऱ्या करण्यासाठीं नव्या पिढीचा जन्म होतो. म्हणून बालकें म्हणजे पुढें जाणाऱ्या जीवनाचे प्रतिनिधी होत. पालकांनीं आपलें प्रेम त्यांना द्यावें; पण आपल्या जीर्ण विचारांच्या शृंखला त्यांच्या पायांत अडकविण्याचें पाप करूं नये.

गुन्हेगारांच्या मानसशास्त्राचा अलीकडे जो अभ्यास चालू आहे, त्यावरून गुन्हेगार म्हणजे कोणी राक्षसी जातीचे प्राणी आहेत ही सर्वमान्य समजूत खोटी ठरत आहे. अपराधांचीं कारणें आनुवंशिक, आर्थिक आणि सामाजिक असतात असें आढळून आलें आहे. यामुळें अपराधाची जबाबदारी वैयक्तिक न धरितां सामाजिक मानिली पाहिजे असें मत मान्यता पावूं लागलें आहे. गुन्हेगारांबद्दल सूडबुद्धि न बाळगतां त्यांच्याविषयीं सहानुभूति व प्रेमभाव बाळगिला पाहिजे आणि कैदखान्यांत चाललेला गुन्हेगारांचा छळ बंद करून त्यांच्यांतील माणुसकीचे अंश जागृत होतील अशा तऱ्हेचें वातावरण तेथें निर्माण केलें पाहिजे, असे विचार पसरत आहेत. साधुसंतांनीं आपल्या आचरणानें आणि उपदेशानें पतितांना पुनीत करण्याचा हाच मार्ग सांगितला नाहीं काय ? सज्जन आणि दुर्जन या कांहीं लखोटबंद जाती नाहींत. सज्जनांतहि हीनांश आढळतो आणि दुर्जनांतहि सदंश लपलेला असतो. खालिलचें यासंबंधाचें प्रवचन कोणालाहि मान्य होण्यासारखेंच आहे.

सुखाची वासना कांही कांहीं वेळां मानवाला इतकी उन्मार्ग-गामी बनविते कीं, तिच्या नंग्या स्वरूपाला भिऊन जीवनाचा त्याग करण्याचा अतिरेकी मार्ग सुचविला जातो. खलिलचें 'सुखा'वरील प्रवचन इतकें समतोलपणाचें आहे, कीं कोणाहि जीवनभीरु वैराग्याला तें पुनः जीवनांत आणून सोडील.

'विवेक आणि वासना' यामधलि विचारहि जीवनाचा संपूर्ण विकास करणाराला पूर्णपणें मार्गदर्शक होतील. नुसता विवेक ही एक जीवनाला नियंत्रित करणारी शक्ति आहे आणि नुसती वासना जीवनाला जाळणारी ज्वाला आहे. वस्तुतः शांति आणि गति हीं एकाच जीवनाचीं दोन स्वरूपें आहेत. विवेकांत शांतीचा आणि वासनेंत गतीचा साक्षात्कार होतो. विवेक आणि वासना यांच्या तालबद्धतेंत जीवनाचें सुरेल संगीत प्रकट होतें.

खलिलचें 'श्रमा'वरील प्रवचन हा या ग्रंथांतील सर्वोत्कृष्ट भाग होय. जीवन अखंड गतिमान् आहे आणि या गतींतच त्याची शांतिहि सामावलेली आहे, ही आध्यात्मिक कर्मयोगी दृष्टि होय. 'विसर्गः कर्म संज्ञितः' गीतेंत जगद्व्यापारालाच कर्म अशी संज्ञा दिलेली आहे. आणि जग हें जगदीश्वराहून निराळें नसल्यामुळें कर्म आणि ब्रह्म यांतहि तत्त्वतः कांहींच भेद नाहीं. कर्मानें व्यक्तीची धारणा होते, समाजाचा संग्रह होतो, आणि चित्ताची शुद्धि होऊन ब्रह्माचा साक्षात्कारहि होतो. म्हणून जीवनांत कर्माला अनन्य-साधारण स्थान प्राप्त झालेलें आहे. उपयुक्ततेचें सुख, कलेचा आनंद आणि उपासनेची शांति हीं तीनहि अमृतफलें जीवनांतील कर्म-वृक्षावरच लटकलेलीं असतात. यामुळें कर्माचा महिमा अवर्णनीय झाला आहे. आधुनिक शैक्षणिक मानसशास्त्राला शरीरश्रमाचा बुद्धि आणि भावना यांच्या विकासाशीं संबंध असल्याचा शोध लागलाच आहे. यामुळें कर्म हें जीवनविकासाचें एकमेव साधन यापुढें होणार आहे. शेतकऱ्यापेक्षां शिल्पकार मोठा आणि

चर्मकारापेक्षां चित्रकार मोठा या खुळ्या कल्पनेला खलिलनें धक्का दिलाच आहे. पण माझ्या समजुतीनें जीवनाचें अमृततत्त्व शोधणाऱ्या खलिलच्या पैगंबराला आपल्या शोधासाठीं विजनवासाची आवश्यकता राहूं नये. कर्मांत हात गुंतलेले असतांनाच जीवनाचीं गूढें उकललेलीं बुद्धीला दिसतात. शिवाय कर्म ही कल्पनेची कसोटी असल्यामुळें कर्मक्षेत्रांत निर्माण झालेलीं ज्ञानें विफल होण्याची भीति उरत नाहीं. कर्माचें स्वरूप नेहमींच सामाजिक असल्यामुळें तें व्यक्तीला विशाल बनविण्यास सहजच उपयोगी पडतें. कर्माच्या या विराट् स्वरूपाचें आकलन केलेले असंख्य कर्मदेव आज आपल्या समाजाला पाहिजे आहेत.

जीवनाचे सारे व्यापार अध्यात्माच्या विशाल भूमीवरून होऊं लागले म्हणजे खाणें-पिणें, वस्त्र-आच्छादन, घर-दार, मैत्री-वार्तालाप इत्यादी सामान्य विषयांनाहि अलौकिक प्रभा प्राप्त होते. जेवणखाण हें केवळ उदरभरण न होतां तें एक यज्ञकर्मच बनतें; वस्त्रामागची लज्जा मनाला विकृत करणारी राहात नाहीं; घरांच्या भिंतींनीं आपल्या आत्म्याचें क्षितिज संकुचित होत नाहीं; मैत्री ही आपली आत्मवृत्ति गाढ-गंभीर करण्याचें साधन बनतें आणि सत्यार्थीला शब्दांच्या शृंखला जखडूं शकत नाहींत.

'सुंदरते'वरील प्रवचनांत सौंदर्याच्या कितीतरी लौकिक कल्पना अलौकिक सौंदर्यांत वर्णिल्या आहेत; आणि 'जीवनाचें अनावृत दर्शन म्हणजेच सुंदरता' असा ग्रंथकाराचा स्वतःचा सिद्धांत प्रकटला आहे.

'क्रय-विक्रय' या नांवाखालीं खलिलचें अर्थशास्त्रविषयक दर्शन आलेलें आहे. 'श्रम करणारालाच विनिमयाचा अधिकार आहे' हा महत्त्वाचा समाजवादी सिद्धांत यांत ग्रथित झालेला आहे. मात्र कलावंतांनाहि उत्पादक-श्रम करणाऱ्यांइतकेंच गौरविलें आहे. कलावंत जर साध्या अन्नवस्त्रावर संतुष्ट राहतील तर समाज त्यांना

पोशीलहि. पण कलेचा उत्पादक-श्रमाशीं विरोधच असला पाहिजे असा सिद्धांत मान्य करितां येणार नाहीं; आणि समाजाच्या आदर्श अवस्थेंत कलावंतहि उत्पादक-श्रम आनंदानें करतील अशी अपेक्षा करावयास हरकत नाहीं. आर्थिक व्यवहारांत न्यायाची संपूर्ण प्रस्थापना होईपर्यंत जीवनांत शांति निर्माण होणार नाहीं हा खलिलचा सिद्धांत सर्व अध्यात्मवादी लोकांनीं सदैव ध्यानांत बाळगिला पाहिजे.

समाजाच्या राजकीय विभागाविषयीं 'कायदे' आणि 'स्वातंत्र्य' या नांवाखालीं खलिलनें आपले विचार प्रकट केले आहेत. आध्यात्मिक दृष्टया आदर्श समाजांत दंडशक्तीवर आधारलेली राज्यसंस्था आढळणारच नाहीं. 'लोकसत्ता' किंवा 'समाजसत्ता' हा राज्यसंस्थेचा अंतिम आदर्श असला तरी, सामाजिक जीवनाचा अंतिम आदर्श आत्मसत्ता हाच आहे. प्रजेच्या अंतःकरणांतील दुष्ट विकारांचें नियमन करण्यासाठींच राज्यसंस्थेचा तत्त्वतः जन्म होतो. समाज-जीवन सत्यमय, न्यायनिष्ठ आणि भयरहित झालें म्हणजे राज्यसंस्थेची आवश्यकता संपते. आणि नंतरच खऱ्या सामाजिक स्वातंत्र्याचा उदय होतो. अशा समाजांत कायद्यांच्या कृत्रिम बेड्या आणि लौकिक नीतीचीं बाह्य बंधनें गळून पडतात. म्हणून राजकीय कायदे आणि राजकीय स्वातंत्र्य यांची खलिलनें चेष्टाच केली आहे. तो आध्यात्मिक स्वातंत्र्याचा भोक्ता असल्याकारणानें त्याची ही चेष्टा यथार्थ आहे असेंच म्हटलें पाहिजे.

खलिलच्या 'जीवन-दर्शनां'त माणसांना गुलाम बनविणारी प्रचंड कारखानदारी आणि राष्ट्रांच्या राष्ट्रें बेचिराख करणारी युद्धविद्या यांना कोठेंच स्थान नाहीं. 'राष्ट्र', 'राजा' आणि 'सुधारणा' हे परिशिष्टांतील उतारे पाहिले असतां त्याची राजकीय विचारसरणी कळून येईल. पण आध्यात्मिक आदर्शाच्या निर्मितीला लोभ आणि हिंसा यांचा कधींच उपयोग व्हावयाचा नसल्यामुळें कारखाने

आणि युद्धें यांचा उल्लेख खलिलनें केला नाहीं ही गोष्ट तात्त्विक दृष्टया अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

"तुमचें रोजचें जीवन हेंच तुमचें मंदिर आणि हाच तुमचा धर्म" या अत्यंत समर्पक शब्दांत खलिलनें धर्माचें व्याख्यान केलें आहे. आणि आपल्या मुलाबाळांमध्यें, आकाशांतील मेघमालेमध्यें आणि झाडांवरील फुलांमध्यें हंसणाऱ्या परमेश्वराला पाहा, उगाच कूट समस्या उकलण्याच्या भानगडींत पडूं नका असा योग्य संदेश दिला आहे.

आध्यात्मिक दृष्टया जीवनाचा विचार करणाराला मृत्यूची कधींच भीति वाटत नाहीं. जन्म आणि मृत्यु हीं एकाच जीवनाचीं दोन स्वरूपें आहेत. जीवनाच्या आनंदांत रंगलेल्या उपासकाला

**"नाभिनन्देत मरणं नाभिनन्देत जीवितम्"**

अशी साम्यावस्था लाभलेली असते. व्यक्तीच्या जीवनांत ज्या आशा-आकांक्षा उसळत असतात त्यांमधूनच आत्म्याच अमरत्व भासमान होतें. मानवी जीवनांत पूर्णतेचीं स्वप्नें वावरत असतात, त्यांच्यावरील श्रद्धेमुळें मानवाला शाश्वततेचा साक्षात्कार होतो, आणि देहाच्या मरणामुळें त्याला अनंताशीं समरस होण्याचा मार्ग खुला होतो. मरण ही विफलता न होतां कृतार्थता होते.

'जीवन-दर्शनां'त 'दान', 'दुःख', 'प्रार्थना' इत्यादि आणखी कित्येक विषय विवेचिलेले आहेत. पण त्यांसंबंधीं येथें कांहीं सांगण्याची आवश्यकता दिसत नाहीं. खलिल हा ज्या समाजांत वाढला तो समाज मांसाहारी आणि परिमित मद्य सेवन करणारा असल्यामुळें त्याच्या लेखनांत त्यांचा निषेध दिसत नाहीं. आध्यात्मिक विकासांत या दोनहि गोष्टींचा त्याग करावा लागतो अशी भारतीय संतांची समजूत आहे. आधुनिक आहारशास्त्रहि मद्य

आणि मांस यांचा निषेध सांगूं लागलें आहे, एवढेंच येथें नमूद करावेंसें वाटतें.

'जीवन-दर्शना'चे लेखक श्री. र. ग. जोशी हे स्वतः चांगले साहित्यिक आहेत. 'पद्मविहारी' या नांवानें त्यांच्या कित्येक कविता 'लोकशिक्षणां'त यापूर्वीं प्रसिद्ध झाल्या आहेत. खलिलनें वर्णिलेल्या जीवन-दर्शनाशीं ते स्वतः हृदयापासून समरस झालेले आहेत. कारण त्यांचा आध्यात्मिक जीवनावर विश्वास आहे. यामुळें त्यांचा अनुवाद रसपूर्ण झाला आहे. खलिलची विशिष्ट लेखनशैली मराठींत उतरविण्यासाठीं त्यांनीं केलेले प्रयास चांगले सफल झाले आहेत असें मला वाटतें. महाराष्ट्रीय वाचक याबद्दल त्यांना धन्यवाद देतील अशी मला आशा आहे.

आश्रम, सासवड.<br>२६-१२-४१

— स. ज. भागवत

# निवेदन

सुमारें अडीच वर्षांपूर्वी कॉंग्रेस सरकारनें लोणी येथें सुरू केलेल्या 'वर्धा-शिक्षण अध्यापन-मंदिरांत' तेथील विद्यार्थ्यांसमोर आचार्य भागवत यांचें 'श्रम' या विषयावर प्रवचन चाललेलें होतें. श्रम करण्याची वृत्ति हा तर वर्धा-शिक्षणाचा प्राणच. तेव्हां तेथील विद्यार्थ्यांना श्रमाचें आंतरबाह्य स्वरूप उघड करून सांगणें क्रमप्राप्तच होतें. प्रारंभीं थोडेसें प्रास्ताविक झाल्यावर प्रस्तुत ग्रंथांतील 'श्रम' हा उतारा वाचून दाखविण्यास त्यांनीं सुरवात केली. मूळ इंग्रेजी ग्रंथांतून एकेक वाक्य वाचून दाखवावें आणि नंतर त्यावर आपलें वक्तृत्वपूर्ण विवेचन करावें असें चाललें होतें. खलिल गिब्रानसारखा तत्त्वज्ञ कवि आणि आचार्य भागवतांसारखा रसिक भाष्यकार यांचा 'समसमा संयोग' झाल्यावर काय विचारावयाचें! सर्वच श्रोतृसमूह अगदीं मंत्रमुग्ध झाला आणि वर्गाचा तास केव्हां संपला तेंहि कोणास कळलें नाहीं!

आचार्यांच्या त्या वक्तृत्वानें खलिल गिब्रानच्या 'जीवन-दर्शना'ची माझ्या मनावर विलक्षण मोहिनी पडली; आणि घरीं येतांच त्यांच्याजवळून तो ग्रंथ मीं मागून घेऊन वाचावयास आरंभ केला. कलेच्या कौशल्यपूर्ण कोंदणांत जीवनाचें तेजस्वी रत्न गुंफण्याची या असामान्य कविश्रेष्ठाची अलौकिक प्रतिभा पाहून, मला तर स्वर्गीय रवीन्द्रनाथांच्या 'गीतांजली'चीच आठवण झाली! काव्य आणि तत्त्वज्ञान यांच्या या मधुर संगम-प्रवाहांत कित्येकदां अवगाहन केलें तरी तृप्ति म्हणून होईच ना! अशा या सुंदर ग्रंथाचा अनुवाद मराठी भाषेंत होणें अत्यावश्यक आहे अशी आपली कल्पना आचार्यांनीं मजपुढें मांडिली व त्यांच्याच प्रोत्साहनावरून हा अनुवाद करण्यास मी

प्रवृत्त झालों. त्यांच्या सान्निध्यांत सासवड येथील आश्रमांत राहण्याचा योग अनायासेंच मला लाभला होता. म्हणून लागलीच या कामास आरंभ केला आणि थोड्याच दिवसांत तें काम हाता-वेगळें केलें. या ग्रंथाची जन्मकथा ही अशी आहे. या ग्रंथाच्या मागची सारी प्रेरणा आचार्य भागवत यांचीच असून मी केवळ निमित्तमात्र आहें.

श्री. किशोरलालभाई मश्रूवाला यांच्या गुजराती अनुवादाचें मला बरेंच साहाय्य झालें. श्री. साने गुरुजी यांनीं धुळयाच्या तुरुंगांत हा अनुवाद अनेक मंडळींना वाचून दाखविला व त्यांत कांहीं सुधारणा सुचविल्या. आचार्य भागवतांनींहि त्यावर बरेच संस्कार केले व सुंदरसा 'दर्शन-परिचय'हि लिहून दिला. या सर्वांचे आभार मानून ऋणमुक्त होण्यापेक्षां मी त्यांच्या ऋणांतच राहूं इच्छितों.

विषय तत्त्वज्ञानाचा आणि शैली काव्याची अशा ग्रंथाचा अनुवाद करणें हें अवघड काम आहे. तथापि मूळ स्वरूप कायम राखण्याचा मीं कसोशीनें प्रयत्न केला आहे. तो कितपत यशस्वी झाला आहे हें सुज्ञ वाचकांनींच ठरवावयाचें आहे.

— र. ग. जोशी

# अनुक्रमणिका


| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| दर्शन-परिचय | ... | ... | ३ |
| निवेदन | ... | ... | २३ |
| प्रस्तावना | ... | ... | १ |
| प्रेम | ... | ... | ९ |
| लग्न | ... | ... | १३ |
| बालकें | ... | ... | १५ |
| दान | ... | ... | १७ |
| खानपान | ... | ... | २१ |
| श्रम | ... | ... | २४ |
| हर्ष आणि शोक | ... | ... | २९ |
| घरें | ... | ... | ३१ |
| वस्त्रें | ... | ... | ३५ |
| क्रय-विक्रय | ... | ... | ३७ |
| अपराध आणि शासन | ... | ... | ४० |
| कायदे | ... | ... | ४६ |
| स्वातंत्र्य | ... | ... | ४९ |
| विवेक आणि वासना | ... | ... | ५३ |
| दुःख | ... | ... | ५६ |
| आत्मज्ञान | ... | ... | ५८ |
| अध्यापन | ... | ... | ६० |
| मैत्री | ... | ... | ६२ |
| वार्तालाप | ... | ... | ६५ |

काळ ... ... ६७
साधुता आणि दुष्टता ... ... ६९
प्रार्थना ... ... ७३
सुख ... ... ७६
सुंदरता ... ... ८१
धर्म ... ... ८५
मृत्यु ... ... ८८
निरोप ... ... ९१
परिशिष्ट ... ... १०७

## चित्रसूचि

'अनंत सागरांत एक अनंत बिंदु' ४
'बालकरूपी चैतन्यमय बाण सोडण्याचीं तुम्ही धनुष्यें आहांत' १६
'तुम्हीहि दुःख म्हणजे काय, तें जाणून घेतलेंच पाहिजे' ५६
'मी तुमच्याकडे पुनः परत येईन' १०५

---

## शुद्धि

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३३ | १० | हृदय | हृदय |
| ५३ | ५ | भावना | वासना |
| ५५ | ६ व ९ | भावनेंत | वासनेंत |

# जीवन-दर्शन

# प्रस्तावना

अल्-मुस्तफा हें त्याचें नांव होतें.

प्रभुकृपेनें तो पावन झाला होता आणि प्रभूला तो अत्यंत प्रिय होता.

आपल्या अंधकारमय जीवनाची उषा तोच उजळीत असे.

स्वतःच्या जन्मभूमीला परत घेऊन जाणाऱ्या आपल्या नौकेच्या आगमनाची प्रतीक्षा करीत बारा वर्षेपर्यंत तो ऑरफालीझ नामक नगरींत राहिला होता.

आणि आतां बारावें वर्ष होतें. कापणीच्या हंगामाचा इलूल महिना होता. त्या महिन्याच्या सातव्या तारखेस नगरीबाहेरच्या टेकडीवर तो चढला आणि त्यानें समुद्राकडे आपली दृष्टि फेकिली; तोंच धुक्यासह येत असलेली आपली नौका त्याच्या दृष्टीस पडली.

ती नौका बघतांच त्याच्या हृदयाचीं द्वारें एकदम खुलीं झालीं आणि त्याच्या आनंदाला पंख फुटून तो समुद्रावर खूप दूरपर्यंत

उडत गेला. नंतर त्यानें आपले नेत्र मिटले आणि आपल्या आत्म्याच्या अनंत शांतींत प्रभुप्रार्थना केली.

पण टेकडीवरून खालीं उतरत असतां त्याच्या हृदयावर खिन्नतेची छाया पसरली, आणि तो आपल्या मनांत विचार करूं लागला :

शांत अंतःकरणानें आणि व्यथित झाल्याशिवाय मी कसा जाऊं शकेन ? नाहीं, ही नगरी सोडतांना माझें हृदय विव्हल झाल्याशिवाय राहणार नाहीं.

दुःखाचे कितीतरी दिवस मीं या नगरीच्या तटांमध्यें कंठिले आहेत आणि एकांताच्या कितीतरी रात्री मीं येथें घालविल्या आहेत; आणि चिरमित्र बनलेल्या आपल्या दुःखाचा व एकांताचाहि निरोप घेतांना कोणाला वाईट वाटणार नाहीं ?

माझ्या हृदय-पुष्पाच्या कितीतरी पाकळ्या मीं या रस्त्यांमध्यें जागोजाग विखुरल्या आहेत, आणि माझ्या आशा-आकांक्षांचीं अनेक बालकें या टेकड्यांमधून नागडींउघडीं फिरत आहेत. त्यांच्या स्मृतिभाराखालीं दबून गेल्याशिवाय आणि वेदना झाल्याशिवाय मी त्यांचा निरोप घेऊं शकत नाहीं.

हें कांहीं एक आंगरखें आज मी उतरून ठेवीत नाहीं, तर आपल्या स्वतःच्याच हातांनीं शरीराची त्वचा सोलून काढीत आहें.

केवळ एक विचार मी माझ्या पाठीमागें ठेवून जातों आहे असें नाहीं, तर क्षुधा आणि तृषा यांनीं मधुर बनलेलें एक हृदय ठेवून जात आहें.

तथापि मी आतां अधिक थांबूं शकत नाहीं.

चराचराला आपणाकडे बोलाविणारा समुद्र मला हांक मारीत आहे, आणि म्हणून मला गेलेंच पाहिजे.

कारण रात्रीच्या प्रहरीं काळ धगधगत असतांहि येथेंच राहणें म्हणजे गोठून जाणें, दगड होऊन पडणें आणि ढेप बनून जाणेंच होय.

जें कांहीं येथें आहे तें सर्व बरोबर घेऊन जावें, असें तर फार वाटतें. पण तें कसें जमणार ?

जिव्हा आणि ओष्ठ यांच्यापासून पंखांची देणगी मिळालेला ध्वनीहि आपणाबरोबर जिव्हेला आणि ओष्ठाला नेऊं शकत नाहीं. त्याला एकट्यालाच आकाशाला शोधीत जावें लागतें.

आणि एकट्यालाच—आपलें घरटें मागें सोडूनच—गरुडाला सूर्याकडे उडत जावें लागतें.

असा विचार करीत तो टेकडीच्या पायथ्याशीं पोहोंचला आणि नंतर आपली दृष्टि त्यानें पुनः समुद्राकडे वळविली; तों आपली नौका बंदरानजीक येत असलेली त्याला दिसली आणि तिच्या नाळे-वर असलेले आपल्या देशचे खलाशीहि त्याच्या दृष्टीस पडले.

आणि त्याच्या आत्म्यानें त्यांना मोठ्यानें हांक मारिली; तो म्हणाला :

माझ्या पुरातन मातेच्या पुत्रांनो, सागरतरंगांवर आरूढ होणाऱ्या राउतांनो,

कितीतरी वेळां माझ्या स्वप्नांमध्यें आपली नौका हांकारीत तुम्ही आलां आहांत. आणि आज माझ्या जागृतीमध्यें येत आहांत. ही जागृति हेंहि एक अधिक गाढ स्वप्नच आहे.

येण्याला मी तयारच आहें, आणि माझी उत्कंठा आपलीं शिडें पूर्णपणें उभारून वाऱ्याची वाट बघत आहे.

केवळ शेवटचा एकच श्वास या शांत वातावरणांत मी घेईन, शेवटचा एकच प्रेमनिर्भर दृष्टिक्षेप पाठीमागें टाकीन,

आणि नंतर मी तुमच्यामध्यें येऊन उभा राहीन : सागर-प्रवाशांमध्यें एक सागर-प्रवासी.

आणि हे विशाल सागरलक्ष्मी, निद्रामयी माते,

तूंच एकटी सर्व नदी-निर्झरांना शांति-विश्रांति आणि मुक्ति देतेस,

माझ्या जीवनाचा हा प्रवाह आणखी एकच वळण घेईल, या वनराजीमध्यें आणखी एकच कलरव करील,

आणि नंतर मी तुजजवळ येऊन पोहोंचेन : जणुं अनंत सागरांत एक अनंत बिंदु.

आणि तो जेव्हां पुढें चालला, तेव्हां त्यानें लांबून पुरुष आणि स्त्रिया आपापलीं शेतें आणि द्राक्षाचे मळे सोडून घाइघाईनें नगरीच्या वेशींकडे येत असल्याचें पाहिलें.

आणि आपलें नांव घेऊन शेताशेतांतून साद घालणारे व परस्परांना आपल्या नौकेच्या आगमनाची वार्ता कथन करणारे त्यांचे शब्द त्यानें ऐकिले.



'अनंत सागरांत एक अनंत बिंदु'

नंतर तो स्वतःशींच म्हणाला :

काय, हा वियोगदिन मीलनदिनच बनणार का ?

आणि माझ्या जीवनाची संध्या, खरें पाहतां, माझ्या जीवनाची उषाच होती असें म्हटलें जाईल का ?

आपला नांगर जमिनींतच अर्धवट टाकून येणाराला अथवा आपल्या द्राक्षमधूचा चरक मध्येंच थांबवून येणाराला मी काय देणार ?

काय, माझें हृदय फळांनीं भारावलेल्या वृक्षाचें रूप धारण करील, आणि त्याचीं फळें गोळा करून तीं मला त्यांना समर्पण करितां येतील ?

आणि माझ्या अभिलाषांचा ओघ एकाद्या निर्झराप्रमाणें वाहूं लागेल, आणि त्याच्या जीवनानें मी त्यांचे प्याले भरून देऊं शकेन ?

समर्थानें आपल्या अंगुलीनें छेडावी अशी वीणा अथवा आपल्या श्वासानें भरून टाकावी अशी बांसरी मी आहे काय ?

मी तर केवळ शांततेचा शोध करणारा आहें, आणि या शांततेमध्यें मला असा कोणता निधि सांपडला आहे, कीं जो मी निःशंकपणें वांटून देऊं शकेन ?

जर माझा हा सुगीचा दिवस असेल, तर कोणत्या शेतांमध्यें आणि कोणत्या विस्मृत ऋतूंमध्यें मीं बीं पेरिलें होतें ?

खरोखर, माझा दीप उंच धरण्याचा क्षण जर आला असेल, तर त्या दीपामध्यें जळणारी ज्योति माझी असूं शकणार नाहीं.

रिता आणि न लाविलेला असा माझा दीप मी उंच धरीन,

आणि रात्रीचा नाथ त्यांत स्नेह भरील व तोच त्यास प्रदीप्तहि करील.

इतके विचार त्यानें शब्दांमध्यें व्यक्त केले. पण त्याच्या हृदयांत आणखी जें कांहीं पुष्कळसें होतें तें निःशब्दच राहून गेलें. कारण आपल्या हृदयांतील गूढ-गंभीर भाव शब्दांमध्यें व्यक्त करण्यास तो असमर्थ होता.

आणि जेव्हां त्यानें नगरांत प्रवेश केला तेव्हां सर्व लोक त्याला भेटण्याकरितां आले. एकस्वानें ते त्याला हांका मारीत होते.

आणि नगरींतील वृद्धजन पुढें आले व म्हणाले :

इतक्यांतच आम्हांला सोडून जाऊं नकोस.

आमच्या संधिप्रकाशांत तूं मध्याह्नरूप झाला आहेस आणि तुझ्या यौवनानें आमच्यापुढें आकांक्षांची स्वप्नसृष्टि उभी केली आहे.

आम्हांला तूं कांहीं परका नाहींस किंवा पाहुणाहि नाहींस, तर आमचा पुत्रच आणि अत्यंत प्रियतम आहेस.

आमचे नेत्र तुझ्या दर्शनाकरितां इतक्यांतच तृषार्त करूं नकोस.

त्यानंतर उपदेशक आणि उपदेशिका यांनीं त्याला म्हटलें :

समुद्राच्या लाटा आपणांमध्यें आतांच वियोग घडवून न आणोत, आणि आमच्यामध्यें तूं घालविलेलीं वर्षें केवळ स्मृतिविषय न बनोत.

तूं आमचें चैतन्य बनून आमच्यामध्यें वावरला आहेस, आणि तुझी छाया आमच्या मुखांवरील प्रभा झाली आहे.

आम्ही तुझ्यावर निरतिशय प्रेम केलें आहे. पण आमचें प्रेम मूक होतें आणि तें अवगुंठनाखालीं झांकून राहिलेलें होतें.

तथापि आज तें उच्चरवानें तुला हांका मारीत आहे, आणि तुझ्यासमोर प्रकट होऊं पाहात आहे.

आणि असें नेहमींच होतें कीं, वियोगाचा क्षण आल्याशिवाय प्रेमाला आपली स्वतःची अगाधता कळून येत नाहीं.

आणि इतरांनींहि येऊन त्याची विनवणी केली. पण त्यांना त्यानें कांहीं उत्तर दिलें नाहीं. आपलें मस्तक मात्र त्यानें नमविलें; आणि त्याच्या वक्षावर ठिपकणारे त्याचे अश्रू जवळ उभे असणारांच्या दृष्टीस पडले.

तदनंतर तो आणि सर्व लोक मंदिरासमोरील एका मोठ्या चौका-कडे चालले.

आणि तेथें आश्रमांतून अल्मित्रा नांवाची एक स्त्री बाहेर आली. ती ब्रह्मवादिनी होती.

तेव्हां तिच्याकडे त्यानें अपार कोमलतेनें पाहिलें; कारण, या लोकांच्या नगरींत येऊन त्याला फक्त एकच दिवस झाला असतां तिनेंच त्याला शोधून काढिलें होतें आणि आपली श्रद्धा त्याला अर्पण केली होती.

आणि त्याला वंदन करून ती म्हणाली :

प्रभूच्या पैगंबरा, शाश्वताच्या शोधका, दीर्घ काळपर्यंत तूं आपल्या नौकेच्या शोधार्थ न्याहाळून पाहिलें आहेस.

आणि आतां तुझी नौका आली आहे, आणि गेल्यावांचून तुला गत्यंतर नाहीं.

तुझ्या स्मृतिपटलावर कोरून ठेविलेल्या तुझ्या देशाविषयींची तुझी उत्कंठा अपार आहे आणि तो देश तुझ्या उच्चतर आकांक्षांचें माहेर-घरच आहे. म्हणून आमचें प्रेम तुला बद्ध करूं इच्छीत नाहीं आणि आमच्या गरजा तुला अडकवूं इच्छीत नाहींत.

तथापि आमची तुला अशी विनंति आहे कीं, आम्हांला सोडून जाण्यापूर्वीं तूं आम्हांला कांहींतरी सांगावें आणि तुझ्या सत्याच्या भांडारांतून आम्हांला कांहींतरी द्यावें.

आम्ही तें आमच्या बालकांना देऊं, आणि तीं आपल्या बालकांना देतील आणि त्याचा नाश होणार नाहीं.

तुझ्या एकांतांत तूं आमच्या दिवसांचें निरीक्षण केलें आहेस आणि तुझ्या जागृतींत आमच्या निद्रेमधील रुदन आणि हास्य तूं ऐकिलें आहेस.

तर आतां, आमचेंच स्वरूप आम्हांला उघड करून सांग, आणि जन्म व मृत्यु यांमधील ज्या अनुभवांचा साक्षात्कार तुला झाला असेल, ते सर्व अनुभव आम्हांला कथन कर.

तेव्हां त्यानें उत्तर दिलें:

ऑरफालीझवासी जनहो, तुमच्या हृदयांत या क्षणींहि ज्या भावना उसळत आहेत त्यांवांचून अन्य कशाविषयीं मी बोलूं शकणार?

# प्रेम

त्यावर अल्‌मित्रा म्हणाली, आम्हांला प्रेमाविषयीं सांग.

आणि त्यानें आपलें मस्तक उन्नत केलें. जनसमूहावरून आपली दृष्टि फिरविली; आणि सर्व समुदाय शांतिमुग्ध झाला. नंतर उच्च स्वरानें तो म्हणाला :

जेव्हां प्रेम तुम्हांला संकेत करीत असेल, तेव्हां त्याच्या पाठीमागून जा,

जरी त्याचे मार्ग बिकट आणि सुळयासारखे आहेत.

आणि जेव्हां तें आपले पंख पसरील तेव्हां त्याच्या आधीन व्हा,

जरी त्याच्या पंखांत छपून राहिलेली तलवार तुम्हांला कदाचित् जखमी करील.

आणि जेव्हां तें तुमच्याशीं बोलेल तेव्हां त्याच्यावर विश्वास टाका,

जरी त्याचा शब्द उद्यान उध्वस्त करणाऱ्या उत्तरेकडच्या वायूप्रमाणें तुमच्या स्वप्नांचा कदाचित् चक्काचूर करील.

कारण, प्रेम जसें तुमच्या मस्तकावर मुकुट चढवितें तसें तें तुम्हांला शूळावरहि चढवील. जसें तें तुमच्या विकासासाठीं आहे तसेंच तें तुम्हांला खच्ची करण्यासाठींहि आहे.

जसें तें तुमच्याइतकें उंच चढून सूर्यकिरणांत नाचणाऱ्या तुमच्या जीवनाच्या अतिकोमल शाखांना कुरवाळतें,

तसें तें खालीं पण उतरून पृथ्वीला घट्ट कवटाळून बसलेल्या तुमच्या मुळांनाहि गदगदां हलवील.

धान्याच्या कणसांप्रमाणें तें तुम्हांला स्वतःजवळ गोळा करून घेतें.

तुमचें स्वरूप उघडें करण्याकरितां तें तुमची मळणी करितें.

नंतर फोलपटांमधून वेगळें काढण्याकरितां तें तुम्हांला पांखडतें.

पांढरें शुभ्र करण्याकरितां तें तुम्हांला दळतें.

नरम होईपर्यंत तुम्हांला तें मळतें.

आणि शेवटीं प्रभूच्या पवित्र भोजनाकरितां तुम्ही पवित्र नैवेद्य बनावें म्हणून तुम्हांला तें स्वतःच्या पवित्र अग्नीवर चढवितें.

तुमच्यावर हे सारे संस्कार प्रेम एवढ्यासाठीं करतें कीं, तुमच्या हृदयांत वसत असलेलीं गुह्यें तुम्हांला जाणतां यावींत आणि त्यांच्या ज्ञानानें तुम्ही जगज्जीवनाच्या हृदयाचा एक अंश बनावें.

पण भीतीमुळें तुम्ही जर केवळ प्रेमाची शांति आणि प्रेमाचें सुख यांनाच शोधीत असाल,

तर हें अधिक बरें कीं, तुम्ही आपल्या फोलपटांतच गुरफटून बसावें आणि प्रेमाच्या खळ्यामधून निघून जावें,

आणि जेथें मनसोक्त हंसतां येणार नाहीं आणि मनमोकळेपणें रडतां येणार नाहीं अशा ऋतुहीन जगामध्यें हंसण्या-रडण्यासाठीं प्रवेश करावा.

प्रेम स्वतःशिवाय अन्य कांहीं देत नाहीं, आणि दुसऱ्याकडून स्वतःशिवाय अन्य कांहीं घेत नाहीं.

प्रेम कोणाला अंकित करीत नाहीं आणि कोणाचें अंकित होत नाहीं;

कारण, प्रेमाची परिपूर्ति प्रेमांतच आहे.

जेव्हां तुम्हांला प्रेमाची प्रतीति होते तेव्हां तुम्ही असें म्हणूं नये कीं, "प्रभु माझ्या हृदयांत आहे," तर त्यापेक्षां असें म्हणावें कीं, "मी प्रभूच्या हृदयांत आहें."

आणि असें मानूं नका, कीं आपण प्रेमाला मार्ग दाखवूं शकूं; कारण, त्याच्या दृष्टीनें तुम्ही पात्र असाल तर प्रेमच तुम्हांला मार्गदर्शन करितें.

केवळ स्वतः कृतार्थ होण्याशिवाय प्रेमाला दुसरी कसलीच अभिलाषा नाहीं.

पण प्रेमाचा आस्वाद घेत असतांहि तुम्हांला अभिलाषा आंवरतां येत नसतील, तर तुमच्या अभिलाषा अशा असोत :

वितळून जावें आणि रजनीला आपलें मधुर गान गाणारा असा एकादा झुळझुळणारा निर्झर व्हावें.

अति कोमलतेची वेदना अनुभवावी.

आपणा स्वतःलाच झालेल्या प्रेमाच्या आकलनानें विद्ध व्हावें;

आणि स्वेच्छेनें व हर्षानें स्वतःचें रक्त सांडावें.

पंख फुटलेल्या हृदयानें प्रभातीं उठावें आणि प्रेमाचा अनुभव घेण्यासाठीं आणखी एक दिवस बहाल केल्याबद्दल प्रभूचे आभार मानावे;

मध्याह्नसमयीं विश्रांति घेत प्रेमसमाधीचें चिंतन करावें;

सायंकाळीं कृतज्ञभावानें घरीं परतावें;

आणि त्यानंतर हृदयस्थ प्रियतमाकरितां प्रार्थना करीत आणि ओठांवर त्याचें स्तुतिस्तोत्र नाचवीत निद्रित व्हावें.

# लग्न

त्यानंतर अल्मित्रानें पुनः विनंति करून विचारिलें आणि लग्न म्हणजे काय, गुरुदेव ?

तेव्हां त्यानें उत्तर दिलें :

तुम्ही दोघें बरोबरच जन्मलां आहांत आणि अखंड बरोबरच राहाल.

मृत्यूच्या शुभ्र पंखांनीं तुमची ताटातूट केली तरीहि तुम्ही बरोबरच राहणार आहांत.

खरेंच, प्रभूच्या निःशब्द स्मृतीमध्येंहि तुम्ही बरोबरच असाल.

तथापि तुमच्या सहत्वामध्यें जरा अवकाश असूं द्या.

आणि तुम्हां उभयतांमध्यें स्वर्गीय वायूंना नृत्य करूं द्या.

तुम्ही परस्परांवर प्रेम करा पण तुमच्या प्रेमाची बेडी बनवूं नका;

तर तुमचें प्रेम तुमच्या आत्म्यांच्या किनाऱ्यांमध्यें हेलावणाऱ्या सागराप्रमाणें बनवा.

तुम्ही परस्परांचे प्याले भरून द्या, पण एकाच प्याल्यांतून दोघेंहि प्राशन करूं नका.

आपापल्या भाकरीचा भाग परस्परांना द्या, पण एकच भाकरी दोघेंहि खात बसूं नका.

दोघें मिळून गा, नाचा आणि आनंद करा; पण तुम्ही प्रत्येकजण स्वतंत्रच रहा,

जशा वीणेच्या तारा एकाच संगीतानें कंपित होत असतांहि स्वतंत्रच असतात.

आपापलीं हृदयें परस्परांना द्या, पण तीं परस्परांच्या आधीन मात्र करूं नका.

कारण, केवळ जीवनाच्या हातांतच तुमचीं हृदयें सामावणें शक्य आहे.

आणि एकत्र उभीं राहा, पण एकमेकांना अगदीं चिकटून नव्हे;

कारण, मंदिराचे स्तंभ पृथक् पृथक्‌च उभे असतात,

आणि देवदार व सुरू एकमेकांच्या छायेंत वाढत नाहींत.

# बालकें

आणि त्यानंतर आपल्या हृदयाशीं बालकाला धरून उभी असलेली एक युवती म्हणाली, आम्हांला बालकांविषयीं कांहीं सांगा.

तेव्हां तो म्हणाला :

तुमचीं बालकें हीं तुमचीं बालकें नव्हत.

तर, चिरंजीव होऊं इच्छिणाऱ्या जगज्जीवनाच्या उत्कट कामनेचे ते कन्यापुत्र आहेत.

तीं तुमच्या द्वारा जन्माला आलीं तरी तुम्ही केवळ निमित्तमात्र आहांत, आणि तीं तुमच्याजवळ असलीं तरी तीं तुमचीं नव्हत.

तुम्ही त्यांना आपलें प्रेम द्या, पण आपले विचार मात्र देऊं नका; कारण, त्यांना आपले स्वतःचे विचार आहेत.

त्यांच्या शरीरांसाठीं तुम्ही त्यांना घरें बांधून द्या, पण त्यांच्या आत्म्यांकरितां मात्र तीं देऊं नका.

कारण, त्यांचे आत्मे तुम्हांला बघतां न येणाऱ्या अथवा स्वप्नांतहि न दिसणाऱ्या भविष्याच्या मंदिरांत राहतात.

त्यांच्यासारखें बनण्याचा तुम्ही खुशाल प्रयत्न करा, पण त्यांना तुमच्यासारखें बनविण्याचा प्रयत्न करूं नका.


कारण, जीवन मागें जात नाहीं आणि भूतकाळाबरोबर रेंगाळत-हि नाहीं.

बालकरूपी चैतन्यमय बाण सोडण्याचीं तुम्ही धनुष्यें आहांत.

तो महान् धनुर्धारी अनंताच्या मार्गावरील लक्ष्य बघतो, आणि आपले बाण वेगानें आणि दूरवर जावेत म्हणून आपल्या सामर्थ्यानें तुम्हांस नमवितो.

त्या धनुर्धराच्या हातांनीं नमविलें जाण्यांत तुम्हांला आनंद वाटो;

कारण, सूं सूं करीत जाणारा बाण त्याला जितका प्रिय आहे तितकेंच अचल असें धनुष्यदेखील त्याला प्रिय आहे.



' बालकरूपी चैतन्यमय बाण सोडण्याचीं तुम्ही धनुष्यें आहांत '

# दान

त्यानंतर एक लक्ष्मीपुत्र म्हणाला, दान म्हणजे काय तें आम्हांला सांगा.

आणि त्यानें त्याला उत्तर दिलें :

आपल्या धनदौलतींतून जेव्हां कांहीं अर्पण करतां तेव्हां तुम्ही विशेष कांहीं देतां असें नाहीं.

जेव्हां स्वतःच्या जीवनाचा अंश द्याल तेव्हांच तें खरेंखुरें दान होईल.

उद्यां कदाचित् आपणाला गरज भासेल या भीतीनें राखून ठेविलेल्या आणि संरक्षिलेल्या वस्तू म्हणजेच ही धनदौलत नव्हे काय ?

आणि उद्यां ! यात्रेकरूंच्या मागून जाणारा अति दूरदर्शी कुत्रा उद्यां उपयोगी पडतील या विचारानें पथहीन वाळवंटांत हाडें पुरून ठेवितो; पण त्याला तो उद्यांचा दिवस काय देणार ?

आणि गरजेची भीति म्हणजे प्रत्यक्ष गरजच नव्हे काय ?

तुमची विहीर तुडुंब भरली असतांहि जर तृष्णेची भीति असेल, तर ती तृष्णा अशमनीयच नव्हे काय ?

असे कांहीं असतात, कीं ज्यांच्याजवळ भरपूर असतें पण त्यांतील थोडेसेंच ते अर्पण करितात, आणि आपलें नांव व्हावें म्हणून ते अर्पण करितात आणि त्यांच्या गुप्त वासनेनें त्यांच्या देणग्या अहितकारी बनतात.

असे कांहीं असतात, कीं ज्यांच्याजवळ थोडेसेंच असतें पण ते सगळें अर्पण करून टाकितात.

ते जीवनावर आणि जीवनाच्या विपुल उदारतेवर श्रद्धा राखणारे असतात आणि त्यांची थैली कधींच रिती नसते.

असे कांहीं असतात, कीं जे उल्हासानें अर्पण करितात, आणि तो उल्हास हेंच त्यांचें पारितोषिक बनतें.

असे कांहीं असतात, कीं जे कष्टानें अर्पण करितात, आणि ते कष्ट हीच त्यांची दीक्षा बनते.

आणि असे कांहीं असतात, कीं जे अर्पण करितात, पण तें अर्पण करितांना त्यांना कष्ट वाटत नाहींत किंवा उल्हासाची अपेक्षा असत नाहीं, अथवा पुण्याच्या जाणीवेनेंहि ते अर्पण करीत नाहींत.

पलीकडच्या दरींतील फुलवेल आपला सुगंध वातावरणांत सर्वत्र पसरविते, त्याप्रमाणें त्यांचें तें अर्पण करणें असतें.

अशांच्या हातांच्या द्वारा ईश्वर बोलतो, आणि त्यांच्या डोळ्यांच्या आडून धरणीवर आपलें स्मित उधळितो.

मागितल्यावर अर्पण करणें हें बरें आहे, पण मागण्यापूर्वीच मनानें जाणून अर्पण करणें अधिक चांगलें.

आणि ज्याचा हात उदार आहे, त्याला अर्पण करण्यापेक्षांहि आपण अर्पिलेलें घेणारा शोधण्यांत अधिक आनंद असतो.

आणि असें काय आहे, कीं जें तुम्ही राखूं शकाल?

तुमच्याजवळ जें कांहीं आहे तें सारें एक दिवस दिलेंच जाणार आहे.

म्हणून तें आतांच देऊन टाका, म्हणजे अर्पण करण्याची संधि तुमच्या वारसांऐवजीं तुम्हांसच मिळूं शकेल.

तुम्ही नेहमीं म्हणतां कीं, "मी अर्पण करीन, पण केवळ सत्पात्र असणारालाच."

तुमच्या बागेंतील फळझाडें अथवा तुमच्या कुरणांतील मेंढ्या असें म्हणत नाहींत.

आपण जगावें म्हणून तीं अर्पण करितात; कारण राखून ठेवणें म्हणजे मरणें.

आपले दिवस आणि आपल्या रात्री मिळविण्याला जो पात्र आहे, तो तुमच्याजवळून बाकीचें सारें मिळविण्याला निःसंशयच पात्र आहे.

आणि जो जीवनसागराचें जल प्राशन करण्याला पात्र गणला

जातो तो तुमच्या चिमुकल्या निर्झरामधून आपला प्याला भरून घेण्याला पात्रच आहे.

आणि अर्पिलेल्याचा स्वीकार करण्याचें मनोधैर्य आणि निःशंकता –नव्हे, औदार्य– दाखविणें याहून अधिक थोर पात्रता ती कोणती ?

आणि तुम्ही असे कोण मोठे आहांत, कीं लोकांनीं त्यांची पात्रता आणि त्यांचा स्वाभिमान तुम्हांला वस्त्रविहीन आणि लज्जाविहीन स्थितींत बघतां यावा म्हणून तुमच्यासमोर आपलें वक्ष चिरावें आणि आपल्या स्वाभिमानावरील पडदा दूर सारावा ?

पहिल्यानें हें बघा, कीं आपण स्वतःच दाता होण्याला आणि दानाचें साधन बनण्याला पात्र आहांत काय ?

कारण, जीवनच जीवनाला अर्पण करीत असतें हेंच सत्य आहे, आणि स्वतःला दाता समजणारे तुम्ही केवळ साक्षी असतां.

आणि तुम्ही स्वीकार करणारे लोकहो,—आणि तुम्ही सर्वच स्वीकार करणारे आहांत—कृतज्ञतेचा भार मानून तुम्ही स्वतःवर आणि दात्यावर ओझ्याचें जूं लादूं नका.

तर, जणुं पंखच मिळाल्याप्रमाणें दात्यासह त्याच्या दानावर उंच उड्डाण करा.

कारण, आपल्या ऋणाची अति जाणीव बाळगणें म्हणजे वसुंधरे-सारखी उदार माता आणि परमेश्वरासारखा पिता ज्याला आहे अशा आपल्या दात्याच्या औदार्याविषयीं शंका प्रदर्शित करणें होय.

# खानपान

त्यानंतर भोजनालय चालविणाऱ्या एका वृद्ध गृहस्थानें म्हटलें, खानपानाविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि तो म्हणाला :

पृथ्वीचा गंध सेवन करून आणि वायुजीवी लतेप्रमाणें किरणपान करून तुम्हांला जगतां आलें असतें, तर किती छान झालें असतें !

पण भक्षण करण्याकरितां हिंसा केल्याशिवाय आणि आपली तृषा शमविण्याकरितां नूतन पाडसाला त्याच्या आईच्या दुधापासून तोडिल्याशिवाय तुम्हांला गत्यंतरच नसेल, तर तुमचें तें कृत्य यज्ञीय भावनेनें होवो.

आणि तुमच्या स्वयंपाकगृहाची वेदी होवो, आणि तिच्यावर वनामधील आणि मैदानावरील शुद्ध आणि निष्पाप जीवांचें मानवांत वसणाऱ्या अधिक शुद्ध आणि अधिक निष्पाप अशा तत्त्वासाठीं हवन केलें जावो.

एकाद्या पशूची हत्या तुम्ही करीत असाल तेव्हां त्याला उद्देशून आपल्या मनांत म्हणा :

" जी सत्ता तुझा वध करीत आहे त्या सत्तेनें मीहि वधिला गेलों आहें; आणि माझेंहि हवन करण्यांत येईल.

" कारण, ज्या नियतीनें तुला माझ्या हातीं आणून सोडिलें आहे, तीच मलाहि बलवत्तर हातांत नेऊन सोडील.

" तुझें रक्त आणि माझें रक्त म्हणजे विश्ववृक्षाला पोषिणाऱ्या जीवनरसाशिवाय दुसरें कांहीं नाहीं."

आणि एकादें फळ तुम्ही दातांखालीं घालाल तेव्हां त्याला उद्देशून आपल्या हृदयांत म्हणा :

" तुझीं बीजें माझ्या शरीरांत जिवंत राहतील,

" आणि तुझ्या भावी कलिका माझ्या हृदयांत प्रफुल्लित होतील,

" आणि तुझा सुगंध माझा श्वास बनेल,

" आणि आपण उभयतां मिळून सर्व ऋतूंत आनंद लुटूं."

आणि सुगीच्या दिवसांत आपल्या द्राक्षलतांचीं द्राक्षें द्राक्षमधूच्या चरकांत घालण्याकरितां तुम्ही गोळा कराल, तेव्हां आपल्या हृदयांत म्हणा :

" मीहि एक द्राक्षोद्यानच आहें आणि माझीं फळें पण द्राक्षमधूच्या चरकाकरितां गोळा करण्यांत येतील,

" आणि नूतन द्राक्षमधूप्रमाणें मलाहि अविनाशी पात्रांमध्यें भरून ठेविण्यांत येईल."

आणि शिशिर ऋतूंत जेव्हां तुम्ही प्राशनाकरितां द्राक्षमधु बाहेर काढाल तेव्हां त्याच्या प्रत्येक प्याल्याकरितां तुमच्या हृदयांत एकेक गीत वसो;

आणि त्या गीतांत सुगीच्या दिवसांची, द्राक्षोद्यानाची आणि द्राक्षमधूच्या चरकाची स्मृति सामावलेली असो.

# श्रम

त्यानंतर एक कृषीवल म्हणाला, श्रमाविषयीं आम्हांला कांहीं ऐकवा.

आणि त्यानें उत्तर दिलें:

जगताच्या आणि जगदात्म्याच्या गतीबरोबर आपली गति राहावी म्हणून तुम्ही श्रम करितां.

कारण, आळशी राहणें म्हणजे ऋतूंना पारखें होणें आणि ऐश्वर्यानें व आत्मनिवेदनाच्या वृत्तीनें अनंताकडे निघालेल्या जीवनाच्या यात्रेंतून बाजूला होणें होय.

तुम्ही श्रम करीत असतां तेव्हां एक बांसरीच बनतां; आणि त्या बांसरीच्या अंतरंगांत घटका स्वतःचा श्वास भरून तिला संगीतमय बनवितात.

अखिल चराचर सुसंवादी स्वरांत वृंदगान करीत असतां, ज्याला

मूक आणि निःस्तब्ध वेळू बनून राहावेसें वाटेल असा तुमच्यापैकीं कोण आहे ?

श्रम म्हणजे शाप आणि कष्ट म्हणजे दुर्दैव, असें तुम्हांला सदैव सांगण्यांत आलें आहे.

पण मी तुम्हांला सांगतों कीं, जेव्हां तुम्ही श्रम करीत असतां तेव्हां पृथ्वीमातेच्या अत्यंत दूरच्या स्वप्नाचा कांहीं अंश तुम्ही सफल करीत असतां; तें स्वप्न जन्माला आलें तेव्हांपासूनच तुमच्या हवालीं करण्यांत आलें आहे.

आणि श्रमाशीं स्वतःचें अनुसंधान राखणें म्हणजे खरोखर जीवनावर प्रेम करणें,

आणि श्रमाच्या द्वारा जीवनावर प्रेम करणें म्हणजे जीवनाच्या गूढतम रहस्याशीं गाढ परिचय करून घेणें.

पण दुःखावेगामुळें जन्म म्हणजे आपत्ति आणि देहधारणा म्हणजे ललाटलिखित शाप असें तुम्ही समजत असाल, तर मी सांगतों कीं, केवळ तुमच्या निढळाच्या घामाशिवाय अन्य कशानेंच तें लिखित धुतलें जाणार नाहीं.

तुम्हांला आणखी असेंहि सांगण्यांत आलें आहे कीं, जीवन अंधकारमय आहे; आणि शिणलेल्या लोकांच्या ह्या म्हणण्याचा पुनरुच्चार स्वतः शिणलेले असतांना तुम्हीहि करितां.

आणि मीहि सांगतों कीं, जीवन खरोखरच अंधकारमय आहे : जर तें प्रेरणाहीन असेल,

आणि सारी प्रेरणादेखील अंध आहे : जर ती ज्ञानयुक्त नसेल.

आणि सारें ज्ञान पण मिथ्या आहे : जर तें श्रमशून्य असेल,

आणि सारे श्रम निरर्थकच आहेत : जर ते प्रेममय नसतील;

आणि तुम्ही प्रेमानें श्रम करितां तेव्हां स्वतः स्वतःशीं, परस्परांशीं आणि परमेश्वराशीं तुम्ही संबद्ध होत असतां.

आणि प्रेमानें श्रम करणें म्हणजे काय ?

प्रेमानें श्रम करणें म्हणजे आपल्या हृदयांतून काढिलेल्या तंतूंचें वस्त्र विणणें, जणुं आपला प्रियतमच तें परिधान करणार आहे;

अथवा प्रीतियुक्त अंतःकरणानें मंदिर उभारणें, जणुं आपला प्रियतमच त्यांत वास करणार आहे;

अथवा हळुंवारपणें बीं पेरणें आणि पिकाची हर्षानें कापणी करणें, जणुं आपला प्रियतमच त्याचें फळ भक्षण करणार आहे.

प्रेमानें श्रम करणें म्हणजे ज्या कांहीं वस्तू तुम्ही घडवितां त्या सर्व वस्तूंना आपल्या आत्म्याच्या श्वासानें चैतन्यमय बनविणें,

आणि सर्व स्वर्गवासी पितृगण आपल्या सभोंवतीं उभे राहून आपणांकडे जागृत नजरेनें बघत आहेत, अशी जाणीव बाळगणें.

जणुं झोपेंत बरळत असल्याप्रमाणें कितीतरी वेळां तुम्हांला

म्हणतांना मीं ऐकलें आहे कीं, "संग-मर्मरी पाषाण खोदून त्यांत आत्मभावनांना साकार स्वरूप देणारा ( शिल्पकार ) जमीन नांगरणाऱ्या शेतकऱ्यापेक्षां अधिक श्रेष्ठ आहे.

"आणि इंद्रधनुष्याचे रंग पकडून ते पडद्यावर मनुष्याकृतींत चित्रित करणारा ( चित्रकार ) आपलीं पायतणें बनविणारापेक्षां अधिक श्रेष्ठ आहे."

पण निद्रेंत नव्हे, तर मध्याह्नीच्या पूर्ण जागृतींत मी सांगतों कीं, वायु अतिक्षुद्र तृणपर्णांशीं जितक्या लडिवाळपणें गुजगोष्टी करितो त्यापेक्षां विशाल वटवृक्षाबरोबर तो कांहीं अधिक लडिवाळपणें त्या करीत नाहीं;

आणि स्वतःच्या प्रेमदानानें वायुवाणीला संगीतमय करून अधिक मधुर बनवितो, तोच एक श्रेष्ठ होय.

श्रम म्हणजे प्रेमाचें मूर्त स्वरूप.

आणि तुम्हांला प्रेमानें श्रम करितां येत नसतील, पण केवळ नीरसतेनेंच तुम्ही ते करीत असाल, तर हें अधिक चांगलें कीं तुम्ही आपलें काम सोडून द्यावें व मंदिराच्या दाराशीं बसावें; आणि जे आनंदानें श्रम करितात त्यांच्याजवळून भिक्षा घ्यावी.

कारण, तुम्ही औदासिन्यानें भाकरी भाजाल तर ती कडू होईल आणि मनुष्याची अर्धीच भूक भागवील.

आणि द्राक्षमधूचा चरक तुम्ही अनिच्छेनें चालवीत असाल, तर तुमची ती अनिच्छा त्या मधूमध्यें विषबिंदू गाळील.

आणि तुम्ही गंधर्वांप्रमाणें गात असाल, पण त्या गायनांत तुम्हांला प्रेम वाटत नसेल, तर दिवसाचे ध्वनी आणि रात्रीचे ध्वनी यांच्या श्रवणाला मनुष्यांचे कान तुम्ही बधिर मात्र करून टाकाल.

# हर्ष आणि शोक

त्यानंतर एक स्त्री म्हणाली, हर्ष आणि शोक यांविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि त्यानें उत्तर दिलें :

तुमचा हर्ष म्हणजे वेष उतरून प्रकट झालेला तुमचा शोकच होय.

आणि ज्या विहिरीमधून तुमचें हास्य उत्स्फूर्त होत असतें, तीच विहीर पुष्कळदां तुमच्या अश्रूंनीं भरून गेलेली होती.

आणि याशिवाय अन्य होऊं तरी कसें शकेल ?

हा शोक तुमचें जीवन जितकें अधिक खोल खोदील तितका अधिक आनंद तुम्हांला त्यांत सांठवितां येईल.

ज्या प्याल्यांत तुम्ही आपला द्राक्षमधु भरितां तोच प्याला कुंभाराच्या भट्टींत भाजून निघालेला नव्हता काय ?

आणि तुमचें चित्त प्रसन्न करणारी बांसरी म्हणजे तुम्ही सुऱ्यांनीं कोरून काढिलेला वेळूचा तुकडाच नव्हे काय ?

तुम्ही हर्षोत्फुल्ल असतां तेव्हां आपल्या हृदयाच्या गाभाऱ्यांत जाऊन बघा; म्हणजे तुम्हांला आढळून येईल, कीं ज्या गोष्टीनें तुम्हांस शोकाकुल केलें होतें तीच तुम्हांला हर्षवीत आहे.

तुम्ही शोकमग्न असतां तेव्हां पुनः अंतर्मुख होऊन बघा; म्हणजे तुम्हांला दिसून येईल, कीं खरोखरच, ज्यामुळें तुम्हांला आनंद वाटत होता त्यामुळेंच तुम्हांला शोक होत आहे.

तुमच्यापैकीं कांहींजण म्हणतात कीं, "शोकापेक्षां हर्ष श्रेष्ठ आहे," आणि दुसरे म्हणतात, "नाहीं, हर्षापेक्षां शोक श्रेष्ठ आहे."

पण मी तुम्हांला सांगतों, कीं ते दोन्ही अविभाज्य आहेत.

ते बरोबरच येतात, आणि त्यांच्यापैकीं एकजण तुमच्या पंक्तीला जेवावयास येऊन बसतो, तेव्हां लक्षांत असूं द्या, कीं दुसरा तुमच्या अंथरुणावर झोंपलेला आहेच.

खरोखरच, तुमचा हर्ष आणि शोक यांमध्यें तुम्ही तराजूप्रमाणें लोंबकळत राहिलेले आहांत.

रिते असाल, तेव्हांच केवळ तुम्ही स्थिर आणि सम असतां.

कोषरक्षक आपलें सोनें-रुपें तोलण्याकरितां तुम्हांला उचलतो, तेव्हां तुमच्या हर्षाचें अथवा तुमच्या शोकाचें पारडें खालीवर जाणें अपरिहार्यच आहे.

# घरें

तदनंतर बांधकाम करणारा एक कारागीर पुढें आला आणि म्हणाला, आम्हांला घरांविषयीं कांहीं सांगा.

आणि त्यानें त्याला उत्तर दिलें :

नगराच्या तटांच्या आंत घर उभारण्यापूर्वी वनामध्यें तुम्ही आपल्या कल्पनांचा कुंज निर्माण करा.

कारण, सायंप्रकाशांत जसे तुम्ही घरीं परततां तद्वत्च सदैव दूर व एकाकी असणाऱ्या तुमच्या अंतरांतील प्रवाशालाहि घरीं परतावें लागतें.

तुमचें घर म्हणजे तुमचें विराट् शरीर.

तें रविकिरणांत विकास पावतें आणि रजनीच्या नीरवतेंत निद्रित होतें; आणि तें स्वप्नरहित पण नसतें. काय, तुमच्या घराला स्वप्नें पडत नाहींत? आणि स्वप्नांमध्यें उपवनांत किंवा गिरि-शिखरावर विहार करण्याकरितां तें नगर सोडून जात नाहीं?

तुमचीं घरें माझ्या हातांत गोळा करितां आलीं असतीं आणि पेरणी करणाराप्रमाणें मला तीं अरण्यांत आणि मैदानांत विखरून टाकितां आलीं असतीं, तर किती छान झालें असतें !

दऱ्याखोरीं हेच तुमचे रस्ते झाले असते, आणि हिरव्यागार वाटाच तुमच्या गल्ल्या झाल्या असत्या, आणि द्राक्षोद्यानांमध्येंच तुम्हांला एकमेकांना भेटण्यास जावें लागलें असतें, आणि पृथ्वीच्या परिमलानें सुगंधित झालेल्या वस्त्रांनींच परतावें लागलें असतें, तर किती छान झालें असतें !

पण या साऱ्या गोष्टी इतक्यांतच होण्यासारख्या नाहींत.

भीतिग्रस्त होऊन तुमच्या पूर्वजांनीं तुम्हांला फारच जवळ आणून ठेविलें आहे; आणि ती भीति आणखी कांहीं काळ टिकेल. तुमच्या नगराचे तट आणखी कांहीं काळ तुमचीं घरें आणि तुमचीं शेतें यांची ताटातूट करतील.

आणि ऑरफालीझवासी जनहो, मला सांगा, कीं या घरांमध्यें तुम्ही काय सांठवून ठेविलें आहे ? आणि दरवाजे अगदीं घट्ट लावून घेऊन तुम्ही कशाचें रक्षण करीत आहांत ?

त्यांत शांति—तुमच्या शक्तीला प्रकट करणारी मूक प्रेरणा—आहे काय ?

त्यांत स्मृती—कल्पनेच्या शिखरांपर्यंत विस्तारलेल्या तेजस्वी कमानी—भरून ठेविल्या आहेत काय ?

त्यांत हृदयाला, काष्ठ-पाषाणांतून निर्माण केलेल्या वस्तूंपासून पवित्र गिरिशिखरापर्यंत पोहोंचविणारें सौंदर्य सांठविलें आहे काय ?

सांगा, हें सर्व तुमच्या घरांत आहे ?

अथवा त्यांत केवळ सुख आणि सुखाची लालसाच आहे, कीं जी तुमच्या घरांत लबाडीनें अतिथि म्हणून प्रवेश करिते, आणि नंतर यजमान बनते, आणि त्यानंतर स्वामी होऊन बसते ?

इतकेंच नव्हे, तर तदनंतर ती पशूंना वठणीवर आणणाराची भूमिका घेते आणि चाबूक व पराणी यानीं तुमच्या उच्चतर आकांक्षांना बाहुल्यांप्रमाणें नाचविते.

तिचे हात रेशमाचे असले, तरी तिचें हृदय लोखंडाचें आहे.

तुमच्या शय्येजवळ उभें राहून तुमच्या देहाच्या प्रतिष्ठेचा उपहास करावा एवढ्याच केवळ हेतूनें तुम्हांला झोंपविण्याकरितां ती अंगाई गाते.

तुमच्या निरामय इंद्रियांचें प्रथम ती विडंबन करिते आणि नंतर कांचेच्या भंगुर भांड्यांप्रमाणें त्यांना ती कांटेरी झुडपांत फेकून देते.

खरोखरच, सुखाची लालसा आत्म्याच्या उत्कट भावनेचा खून करिते, आणि नंतर तिच्या श्मशानयात्रेंत दांत विचकीत चालते.

पण हे आकाशाच्या बालकांनो, शांतीमध्यें अशांत असणारांनो, तुम्ही पिंजऱ्यांत अडकविले जाणार नाहीं अथवा गोठ्यांत बांधिले जाणार नाहीं.

तुमचें घर नांगर न बनतां डोलकाठी बनो.

तें केवळ जखम झांकणारा पापुद्रा न बनतां डोळ्याचें संरक्षण करणारी पांपणी बनो.

दरवाजांतून बाहेर पडतां यावें म्हणून आपले पंख तुम्ही आवरून घेऊं नयेत, तक्तपोशीवर आदळतील म्हणून आपलीं मस्तकें तुम्ही खालीं वांकवूं नयेत, अथवा भिंतींना भेगा पडून त्या कोसळतील म्हणून श्वासोच्छ्वास करण्याला तुम्ही भिऊं नये.

मृतांनीं सजीवांकरिता बांधून ठेविलेल्या थडग्यांत तुम्ही राहूं नये.

आणि भव्य व सुंदर असलें, तरी तुमचें घर तुमच्यांतील गूढ तत्त्वाला धरून ठेवूं शकणार नाहीं, अथवा तुमच्या उत्कट आकांक्षांना थारा देऊं शकणार नाहीं.

कारण, तुमच्यांत जें असीम आहे तें आकाशमंदिरांत वास करितें. प्रभातींचें दंव हें त्या मंदिराचें द्वार आहे आणि रजनीची अनंत संगीतें व अनंत शांति हीं त्याचीं गवाक्षें आहेत.

# वस्त्रें

आणि नंतर एक विणकर म्हणाला, वस्त्रांविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि त्यानें उत्तर दिलें :

तुमचीं वस्त्रें तुमचें पुष्कळसें सौंदर्य लपवून ठेवितात, तथापि तुमची कुरूपता मात्र तीं लपवून ठेवीत नाहींत.

आणि वस्त्रांच्या साहाय्यानें एकांतांत राहण्याच स्वातंत्र्य तुम्ही शोधीत असतां; तरी त्यायोगें आपत्ति आणि बंधन हींच कदाचित् तुमच्या पदरीं पडतात.

सूर्य आणि वायु यांना आपल्या वस्त्रांच्या द्वारा भेटण्यापेक्षां तुम्ही आपल्या त्वचेच्या द्वारा त्यांना अधिक भेटावें हें चांगलें.

कारण, जीवनाचा प्राण सूर्यकिरणांत राहात असतो आणि जीवनाचा हात वायुलहरींत असतो.

तुमच्यापैकीं कांहींजण म्हणतात, "आम्ही परिधान करीत असलेलीं वस्त्रें उत्तरेकडच्या वायूनें विणलेलीं आहेत."

आणि मीहि म्हणतों, होय, खरेंच; तो उत्तरेचाच वायु होता,

पण लज्जा हा त्याचा माग होता, आणि स्नायूंची मृदुलता हे त्याचे तंतू होते.

आणि आपलें काम पूर्ण झाल्यानंतर अरण्यांत जाऊन तो मोठ्यानें हंसला.

विसरूं नका, कीं मलिनांच्या नेत्रांसमोरच लज्जा ढालीप्रमाणें बनते.

पण मलिनजन नाहींसे होतील, त्यावेळीं लज्जा म्हणजे केवळ मनाची बेडी आणि मनाला विकृत करणारी वस्तूच बनणार नाहीं काय ?

आणि लक्षांत असूं द्या, कीं तुमच्या उघड्या पायांना स्पर्श करण्यांतच धरित्रीमातेला आनंद होतो, आणि तुमच्या केसांबरोबर खेळण्याचीच वायूंना इच्छा असते.

# क्रय-विक्रय

आणि एक व्यापारी म्हणाला, क्रय-विक्रय म्हणजे काय तें आम्हांला सांगा.

तेव्हां उत्तर देतांना तो म्हणाला :

वसुंधरा आपलें धनधान्य तुम्हांला अर्पण करीतच असते; आणि आपल्या ओंजळी कशा भरून घ्याव्यात हें एकदां तुम्हांला समजलें म्हणजे तुम्हांला कधीं कमतरता पडणार नाहीं.

पृथ्वीच्या देणग्यांची परस्परांत अदलाबदल करून तुम्हांला समृद्धि आणि संतोष मिळेल.

तथापि, तुमची ही अदलाबदल प्रेम आणि उदार न्यायबुद्धि यांनीं युक्त नसेल, तर ती कांहींजणांचा लोभ आणि इतरांची उपासमारच वाढवील.

समुद्र, शेतें आणि द्राक्षांचे मळे यांत श्रम करणारे तुम्ही जेव्हां

विणकरांना, कुंभारांना आणि मसाल्यांच्या व्यापाऱ्यांना बाजारांत भेटतां,

तेव्हां आपणांमध्यें येण्याकरितां पृथ्वीच्या श्रेष्ठ अंतरात्म्याला तुम्ही आवाहन करा; आणि आपले ताजवे व वस्तूंचें परस्पर-मूल्य ठरविण्याच्या रीती यांना शुद्ध करण्याकरितां त्याची प्रार्थना करा.

आणि जे केवळ रिकाम्या हातांनीं येत असतील व तुमच्या श्रमाचा मोबदला म्हणून केवळ आपले शब्दच विकूं इच्छितील त्यांना आपल्याबरोबर व्यवहार करूं देऊं नका.

अशा लोकांना तुम्ही म्हणावें :

"आमच्याबरोबर शेतांत चला, अथवा आमच्या भाऊंबरोबर समुद्रावर जा आणि तेथें आपलें जाळें टाका;

"कारण, भूमि आणि समुद्र हीं आमच्याप्रमाणेंच तुम्हांलाहि आपलें विपुल औदार्य दाखवितील."

आणि तेथें गाणारे, नाचणारे आणि बांसरी वाजविणारे आले, तर त्यांचे गुणहि खरेदी करा.

कारण, तेहि फळें आणि धूप गोळा करणारे सौदागरच आहेत, आणि त्यांनीं आणिलेलें कल्पनानिर्मित असलें, तरी तें तुमच्या आत्म्याचें अन्न आणि वस्त्र आहे.

आणि बाजारांतून परतण्यापूर्वी कोणीहि रिकाम्या हातानें परत गेला नाहीं, अशी खात्री करून घ्या.

कारण, तुमच्यामधील क्षुद्रांतल्या क्षुद्र जीवाच्याहि गरजा पूर्ण झाल्या नाहींत तोंपर्यंत पृथ्वीचा श्रेष्ठ अंतरात्मा वायुलहरींवर शांततेनें झोंपूं शकणार नाहीं.

# अपराध आणि शासन

त्यानंतर नगराच्या न्यायाधीशांपैकीं एकजण पुढें आला आणि म्हणाला, अपराध आणि शासन यांविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि त्यानें उत्तर दिलें :

जेव्हां तुमचा आत्मा बाहेर वाऱ्यावर भटकण्यास जातो,

तेव्हां तुम्ही एकटे आणि अरक्षित असे होऊन दुसऱ्याचा आणि परिणामीं आपला स्वतःचाच अपराध करितां.

आणि प्रभूच्या दारीं गेल्यावर त्या केलेल्या अपराधाबद्दल तुम्हांला त्याचें दार ठोठावावें लागेल आणि उपेक्षित होऊन त्या दाराशीं जरा ताटकळत बसावें लागेल.

समुद्रासारखा तुमचा दैवीभाव आहे;

तो सदैव शुद्धच राहतो.

आणि आकाशाप्रमाणें केवळ पंख असलेल्यासच तो उंच चढवितो.

सूर्याप्रमाणेंहि तुमचा दैवीभाव आहे;

त्याला चिचुंद्रीचे मार्ग माहीत नसतात, आणि सापांचीं बिळें पण तो शोधीत नाहीं.

परंतु तुमच्यांत केवळ दैवीभावच वसत असतो असें नाहीं.

तुमच्यांत अजून बराचसा मानवभाव आहे, आणि तुमच्यांतील पुष्कळसा अंश तर अजून अमानवीच आहे,

स्वतःची जागृति शोधण्याकरितां धुक्यामधून निद्रितावस्थेंतच भटकणारा तो एक बेढब वामन आहे.

आणि तुमच्यांतल्या मानवभावाविषयीं मी आतां बोलूं इच्छितों.

कारण, तोच अपराध आणि अपराधाचें शासन जाणतो. तुमच्यांतील दैवी भावाला किंवा धुक्यामधील वामनाला त्याची जाणीव असत नाहीं.

अनेकदां मीं तुम्हांला अपराध्याविषयीं अशा रीतीनें बोलतांना ऐकिलें आहे कीं, तो अपराध करणारा जणुं तुमच्यांतला नाहींच; तर तुम्हांला अगदीं परका आणि तुमच्या जगांत अगदीं आगंतुक म्हणून घुसलेला आहे.

पण मी सांगतों, कीं ज्याप्रमाणें कोणीहि पवित्र आणि पुण्यशील पुरुष तुमच्यापैकीं प्रत्येकांत वसत असलेल्या उच्चतम वस्तूपेक्षां अधिक उंच चढूं शकत नाहीं,

त्याप्रमाणेंच कोणीहि दुष्ट आणि दुर्बल तुमच्यामध्येंच वसणाऱ्या अति नीचतेहून अधिक खालीं पडूं शकत नाहीं.

आणि ज्याप्रमाणें वृक्षाचें एकहि पान सबंध वृक्षाच्या मूक जाणिवेवांचून पिवळें पडूं शकत नाहीं,

त्याप्रमाणें तुम्हां सर्वांच्या दडून राहिलेल्या इच्छेशिवाय अपराधी अपराध करूं शकत नाहीं.

एकाद्या मिरवणुकीप्रमाणें तुम्ही सर्वमिळून आपल्या दैवीभावा-कडे जात असतां.

तुम्हीच पंथ आणि पांथहि आहांत.

आणि जेव्हां तुमच्यापैकीं एकादा पडतो, तेव्हां आपल्या पाठी-मागून येणारांकरितां तो पडतो. ठेंचाळविणाऱ्या धोंड्याची सूचनाच ती !

आणि याशिवाय, जे त्याच्या पुढें गेलेले असतात त्यांच्यासाठीं तो पडतो; कारण, अधिक वेगवान् आणि अधिक अचूक असें पाऊल असूनहि त्यांनीं त्या धोंड्याची अडचण काढून टाकिली नाहीं.

आणि माझा शब्द तुमच्या हृदयाला दुःसह होईल तरी हेंहि ऐका :

खुनाला बळी पडलेला आपल्या स्वतःच्या खुनाबद्दल जबाबदार नसतो असें नाहीं,

आणि लुटला गेलेला, लुटला जाण्यांत निर्दोष असतो असेंहि नव्हे.

दुष्टाच्या कृत्यांबद्दल पुण्यशील निष्पाप असत नाहीं,

आणि स्वच्छ हात असलेला पाप्याच्या कर्मांत निष्कलंक नसतो.

होय, अपराधी हा पुष्कळदां दुखावलेल्याचाच बळी असतो.

आणि त्याहूनहि पुष्कळदां, शासन पावलेला हा निरपराध आणि निर्दोष म्हणून ठरलेल्याचा भारवाहक असतो.

न्यायी आणि अन्यायी, त्याचप्रमाणें सज्जन आणि दुर्जन असा भेद तुम्हांला करितां येण्यासारखा नाहीं;

कारण, एकत्र विणलेल्या काळ्या आणि पांढऱ्या धाग्यांप्रमाणें ते सूर्यप्रकाशांत एकत्रच उभे असतात.

आणि काळा धागा तुटला म्हणजे विणकराला सबंध वस्त्र बारकाईनें बघावें लागतें आणि मागाचीहि तपासणी करावी लागते.

तुमच्यापैकीं कोणी एकाद्या पत्नीला ती एकनिष्ठ नाहीं म्हणून शिक्षा ठोठावणार असेल,

तर त्याला तिच्या पतीचेंहि हृदय तराजूंत तोलूं द्या, आणि त्याचा आत्माहि मेजानें मापूं द्या.

आणि जो कोणी अपराध्याला फटके मारणार असेल त्याला ज्याचा अपराध झाला आहे त्याचेंहि अंतरंग तपासूं द्या.

आणि तुमच्यापैकीं कोणी न्यायाच्या नांवानें शासन करण्यास तयार होईल आणि पापवृक्षावर कुऱ्हाड घालण्यास प्रवृत्त होईल, तर त्याला त्या वृक्षाच्या मुळांकडे आपली दृष्टि फेकूं द्या;

म्हणजे त्याला आढळून येईल, कीं खरेंच, चांगल्या आणि वाईट, सफल आणि विफल अशा सर्व वृक्षांच्या मुळाची पृथ्वीच्या शांत हृदयामध्यें एकमेकांत गुंफण झालेली आहे.

आणि हे न्यायी होऊं इच्छिणाऱ्या न्यायाधीशांनो,

तुम्ही त्याला कोणती शिक्षा कराल, कीं जो देहानें प्रामाणिक असून मनानें मात्र चोर आहे?

त्याला तुम्ही काय दंड कराल, कीं जो शरीरानें वध करणारा आहे, पण ज्याच्या स्वतःच्या आत्म्याचाच वध झाला आहे?

आणि त्याच्यावरील खटला तुम्ही कसा चालवाल, कीं जो आचरणांत ठकविणारा आणि जुलूम करणारा आहे,

पण जो स्वतःच दुःख आणि जुलूम यांनीं संत्रस्त झालेला आहे?

आणि त्यांना तुम्ही कोणतें शासन द्याल, कीं ज्यांचा पश्चात्ताप त्यांच्या दुष्कृत्यांहून आधींच मोठा आहे?

पश्चात्ताप म्हणजे ज्या कायद्याची सेवा तुम्ही करूं इच्छितां, त्या कायद्यानें स्वतःच दिलेला न्याय नव्हे काय?

तथापि, तुम्ही निष्पाप जीवावर पश्चात्ताप लादूं शकणार नाहीं आणि अपराध्याच्या हृदयांतून तो काढूं शकणार नाहीं.

मानवांनीं जागृत व्हावें आणि आत्मसंशोधन करावें यासाठीं रात्रीच्या समयीं अनाहूतपणेंच तो भेट देतो.

आणि तुम्ही न्यायाचें स्वरूप समजून घेऊं इच्छितां; पण सर्व

कृत्यें संपूर्ण प्रकाशांत पारखिल्याशिवाय तुम्हांला तें कसें समजूं शकणार ?

त्याच वेळीं तुम्हांला कळून येईल कीं, उभा असलेला आणि पडलेला भिन्न नसून आपल्याच नीच भावाची रात्र आणि दैवी भावाचा दिवस यांच्यामधील संधिप्रकाशांत उभा असणारा तो एकच मानव आहे.

आणि मंदिराची कोणशीला त्याच्या पायामधील सर्वांत खालच्या दगडापेक्षां उच्चतर असत नाहीं.

# कायदे

त्यानंतर एक वकील म्हणाला. पण आमच्या कायद्यांविषयीं काय, गुरुदेव ?

आणि त्यानें उत्तर दिलें :

कायदे घडविण्यांत तुम्हांला आनंद वाटतो,

पण त्यापेक्षां अधिक आनंद ते मोडण्यांत तुम्हांला वाटत असतो.

ज्याप्रमाणें समुद्रकिनाऱ्यावर खेळणारीं मुलें सतत खपून रेतीचे मनोरे बांधितात आणि नंतर मोठ्यानें हंसून ते मोडून टाकितात.

पण तुम्ही आपले रेतीचे मनोरे उभवीत असतां तेव्हां समुद्रहि किनाऱ्यावर अधिक रेती आणून टाकीत असतो, आणि तुम्ही ते मोडून टाकितां तेव्हां समुद्रहि तुमच्याबरोबर खदखदां हंसतो.

खरोखरच, निष्पाप जीवाबरोबर समुद्र नेहमींच हंसत असतो.

पण ज्यांना जीवन समुद्राप्रमाणें वाटत नाहीं आणि मानवी कायदे रेतीच्या मनोऱ्यांप्रमाणें भासत नाहींत,

तर, जीवनाला जे खडक मानितात आणि कायदा म्हणजे त्या खडकांत स्वतःसारखी मूर्ति खोदण्याची एक छिनी असें जे समजतात, त्यांच्याविषयीं काय म्हणावें ?

नाचणारांचा द्वेष करणाऱ्या लंगड्याला काय म्हणावें ?

आपल्या जोखडाचें प्रेम बाळगणाऱ्या आणि अरण्यांतील सांबर व हरिण यांना भटक्ये आणि उनाड म्हणून लेखणाऱ्या बैलाला काय म्हणावें ?

आपली कांत टाकूं न शकणाऱ्या आणि इतरांना मात्र नग्न आणि निर्लज्ज म्हणणाऱ्या म्हाताऱ्या सर्पाला काय म्हणावें ?

लग्नाच्या मेजवानीला आधींच उपस्थित होऊन यथास्थित हात मारून थकल्यावर 'सगळ्या मेजवान्या म्हणजे अत्याचार आहे आणि मेजवान्या झोडणारे सारे कायद्याचा भंग करणारे आहेत' असें म्हणत परतणाराला काय म्हणावें ?

या सर्वांविषयीं, तेहेखील सूर्यकिरणांत उभे आहेत. मात्र सूर्याकडे त्यांनीं आपल्या पाठी फिरविल्या आहेत याशिवाय मी दुसरें काय म्हणूं शकेन ?

त्यांना आपल्या छायाच तेवढ्या दिसतात, आणि त्यांच्या छाया हेच त्यांचे कायदे.

आणि त्यांच्या दृष्टीनें सूर्य म्हणजे केवळ छाया पाडणारा नव्हे. तर काय ?

आणि त्यांनीं कायदे मान्य करणें म्हणजे खालीं वांकून आपल्या छायांची भूमीवर रूपरेखा आंखणें एवढेंच नव्हे, तर काय?

पण सूर्याभिमुख होऊन चालणाऱ्या तुम्हांला भूमीवर काढिलेल्या कोणत्या प्रतिमा पकडून ठेवूं शकतील?

वायूबरोबर भ्रमण करणाऱ्या तुम्हांला कोणतें वातचक्र मार्गदर्शन करील?

आपलें जूं तुम्ही मोडून टाकिलें, पण तें कोणा माणसानें बांधिलेल्या कारागृहाच्या दरवाजावर मोडिलें नाहीं, तर कोणत्या मनुष्याचा कायदा तुम्हांला बद्ध करूं शकेल?

तुम्ही नाचलां, पण नाचतांना कोणा मनुष्याच्या लोहशृंखलावर ठेंचाळलां नाहीं, तर कोणत्या कायद्यांची तुम्हांला भीति आहे?

तुम्ही आपलें वस्त्र फाडून टाकिलें, पण तें कोणा माणसाच्या मार्गांत टाकिलें नाहीं, तर तुम्हांला कोण शिक्षा ठोठावणार आहे?

ऑरफालीझवासी जनहो, तुम्ही ढोल गुरफटून टाकूं शकाल, आणि वीणेच्या ताराहि शिथिल करूं शकाल, पण गाऊं नये म्हणून चंडोलाला कोण आज्ञापूं शकेल?

# स्वातंत्र्य

आणि एक वक्ता म्हणाला, स्वातंत्र्याविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि त्यानें उत्तर दिलें:

नगराच्या वेशीजवळ आणि आपल्या घरांत लोटांगण घालितांना आणि स्वतःच्या स्वातंत्र्याची पूजा करितांना मीं तुम्हांला पाहिलें आहे,

ज्याप्रमाणें गुलाम जुलमी धन्यापुढें नम्र होतात आणि तो त्यांची कत्तल करीत असला तरी त्याची स्तुति करितात.

होय, मंदिराच्या बागेमध्यें आणि बालेकिल्ल्याच्या छायेमध्यें तुमच्यांतल्या अत्यंत स्वतंत्र पुरुषांनाहि जूं आणि हातबेडी यांसारखेंच आपलें स्वातंत्र्य धारण करितांना मीं पाहिलें आहे.

आणि त्यावेळीं माझें हृदय आंतल्या आंत विद्ध झालें आहे; कारण, स्वातंत्र्यशोधनाची इच्छादेखील तुम्हांला बंधनरूप होईल,

आणि स्वातंत्र्य म्हणजे एक ध्येय व सिद्धि असें बोलण्याचें तुम्ही थांबवाल त्याच वेळीं तुम्ही स्वतंत्र होऊं शकाल.

तुमचे दिवस चिंताविहीन नसतील आणि तुमच्या रात्री न्यूनता-हीन व दुःखशून्य नसतील त्यावेळींहि तुम्ही एक प्रकारें स्वतंत्र असूं शकाल,

पण या गोष्टींनीं तुमचें जीवन वेढून टाकिलेलें असतांहि उपाधि-रहित आणि मुक्त होत्साते मनानें त्यांच्यांतून वर उठाल, तेव्हांच तुम्ही खरेखुरे स्वतंत्र व्हाल.

आणि आपल्या ज्ञानाच्या प्रभातकालीं तुम्हीच आपल्या मध्याह्न-कालाच्या भोंवतीं ज्या शृंखला घट्ट आवळल्या आहेत त्या तोडून टाकणार नाहीं, तर आपले दिवस आणि रात्री यांच्या पलीकडे तुम्हांला कसें जातां येईल ?

खरें पाहिलें तर, ज्याला तुम्ही स्वातंत्र्य म्हणून म्हणतां तें स्वातंत्र्य हीच सर्वांत दृढतम शृंखला आहे; मग तिचे दुवे सूर्यकिरणांत कितीहि चकाकोत आणि तुमच्या नेत्रांना कितीहि दिपवोत.

आणि आपण स्वतंत्र व्हावें म्हणून तुम्ही स्वतःच्याच जीवनाचे कांहीं अंश फेकून देणार, दुसरें काय ?

एकादा अन्यायी कायदा तुम्ही रद्द करूं इच्छीत असाल, तर तो कायदा तुम्ही आपल्या स्वतःच्याच हातानें आपल्या ललाटावर लिहिलेला होता.

कायद्याचीं पुस्तकें जाळून आणि तुमच्या न्यायाधीशांचीं ललाटें सगळ्या समुद्राच्या पाण्यानेंहि धुऊन तुम्ही तो पुसून टाकूं शकणार नाहीं.

आणि एखाद्या जुलमी राजाला तुम्ही पदच्युत करूं इच्छीत असाल, तर प्रथम आपल्या अंतःकरणांत उभविलेलें त्याचें सिंहासन नष्ट झालें आहे, हें बघा.

कारण, जर प्रजेच्या स्वतःच्याच स्वातंत्र्याच्या कल्पनेंत जुलमाला आणि स्वाभिमानांत लज्जेला स्थान नसेल, तर अशा स्वतंत्र आणि स्वाभिमानी प्रजेवर जुलमी राजा राज्य कसें करूं शकेल?

आणि एखादी चिंता तुम्ही फेकून देऊं इच्छीत असाल, तर ती चिंता तुमच्यावर लादली गेलेली नसून तुम्ही स्वतःच तिचा स्वीकार केलेला असतो.

आणि एखादी भीति तुम्ही काढून टाकूं इच्छीत असाल, तर त्या भीतीचें स्थान भिवविणाराच्या हातांत नसून तुमच्याच हृदयांत असतें.

खरोखर, सर्व गोष्टी—ज्यांची तुम्ही इच्छा करितां आणि ज्यांची तुम्हांला भीति वाटते, ज्या तुम्हांला अप्रिय वाटतात आणि ज्या हव्याशा वाटतात, ज्यांचा तुम्ही पाठलाग करितां आणि ज्यांच्यापासून दूर पळतां—तुमच्या जीवनांत अर्ध-आलिंगित अशा सदैव हेलावत असतात.

या सर्व गोष्टी परस्परांना आलिंगिणाऱ्या छाया-प्रकाशांप्रमाणें द्वंद्वरूपानें तुमच्यांत विचरत असतात.

आणि छाया क्षीण होते व अंतर्धान पावते, तेव्हां पाठीमागें रेंगाळणारा प्रकाश दुसऱ्या प्रकाशाची छाया बनतो.

आणि याप्रमाणेंच तुमचें स्वातंत्र्य आपल्या बंधनांतून जेव्हां मुक्त होतें, तेव्हां तें स्वतःच उच्चतर स्वातंत्र्याचें बंधन होऊन बसतें.

# विवेक आणि वासना

आणि ती ब्रह्मवादिनी पुनः म्हणाली, विवेक आणि वासना यांच्याविषयीं आम्हांला कांहीं सांग.

आणि त्यानें उत्तर दिलें :

तुमचें अंतःकरण अनेकदां एक रणक्षेत्रच बनतें आणि त्याच्यावर तुमचा विवेक आणि तुमची बुद्धि यांचा तुमची भावना आणि तुमची क्षुधा यांच्याबरोबर संग्राम चाललेला असतो.

तुमच्या वृत्तींतील विसंवाद आणि स्पर्धा यांचें एकतेंत आणि सुसंवादांत पर्यवसान करितां यावें म्हणून तुमच्या अंतःकरणाचा शांति-निर्माता मीं व्हावें असें तर फार वाटतें.

परंतु तुम्हीहि स्वतःच शांति-निर्माते व स्वतःच्या साऱ्या वृत्तींवर प्रेम करणारे नसाल, तर मी तरी शांति-निर्माता कसा होऊं शकेन ?

तुमचा विवेक आणि तुमची वासना म्हणजे तुमच्या समुद्रप्रवासी आत्म्याचें सुकाणूं आणि शिडेंच होत.

तुमचीं शिडें किंवा तुमचें सुकाणूं यांपैकीं कशाचीहि मोडतोड झाली, तर भर समुद्रांत लाटांवर फेकले जाऊन तुम्ही कोठेंतरी वाहवत जाल अथवा जेथल्या तेथेंच थांबाल.

कारण एकट्या विवेकाचेंच अधिराज्य असेल, तर ती एक मर्यादा घालणारी शक्ति बनते आणि वासना मोकाट सुटली, तर ती स्वतःचीच राखरांगोळी करून टाकणारी ज्वाला बनते.

म्हणून तुमच्या आत्म्याला तुमचा विवेक वासनेच्या उंचीइतका उंच चढवूं द्या, कारण तेथून तो गाऊं शकेल;

आणि त्याला विवेकाच्या साहाय्यानें तुमच्या वासनेचें मार्गदर्शन करूं द्या; म्हणजे ती वासना रोज नवा जन्म धारण करून जिवंत राहील, आणि फिनिक्स पक्ष्याप्रमाणें स्वतःच्याच रक्षेमधून वर उठेल.

मला तर असें वाटतें, कीं तुमची बुद्धि आणि तुमची क्षुधा हे तुमच्या घरांतले तुम्हांला प्रिय असलेले दोन पाहुणे आहेत असेंच तुम्ही मानावें.

निःसंशय, एका पाहुण्यापेक्षां दुसऱ्याचा कांहीं अधिक आदर-सत्कार तुम्ही करणार नाहीं; कारण जो एकापेक्षां दुसऱ्याकडे अधिक लक्ष देतो तो दोघांचेंहि प्रेम आणि विश्वास गमावून बसतो.

टेकड्यांवरील हिरव्यागार निंबवृक्षांच्या शीतल छायेखालीं बसून जेव्हां तुम्ही दूरचीं शेतें आणि मैदानें यांच्या प्रशांततेचा व

प्रसन्नतेचा अनुभव घेत असाल, तेव्हां तुमच्या हृदयाला मूकतेंत म्हणूं द्या कीं, " प्रभु विवेकांत विश्रांति घेत आहे."

आणि जेव्हां वादळ येतें, आणि झंझावात अरण्याला गदगदां हलवून सोडितो आणि मेघगर्जना व विद्युलता आकाशाची भव्य-भीषणता घोषित करितात, तेव्हां तुमच्या हृदयाला सादर भीतीनें म्हणूं द्या कीं, " प्रभु भावनेंत संचार करीत आहे."

आणि तुम्ही प्रभूच्या क्षेत्रांतील एक श्वास आणि प्रभूच्या वनांतील एक पान असल्यामुळें तुम्हीहि विवेकांत विश्रांति घ्यावी आणि भावनेंत संचार करावा.

# दुःख


आणि एका स्त्रीनें म्हटलें, दुःख म्हणजे काय तें आम्हांला सांगा.
आणि तो म्हणाला :

तुमच्या ज्ञानाला आच्छादून टाकणाऱ्या कवचाचा भंग म्हणजेच तुमचें दुःख.

सूर्यकिरणांत स्वतःचें हृदय उभें राहावें म्हणून ज्याप्रमाणें फळाच्या टणक बीजाला फुटणें भाग पडतें, त्याप्रमाणें तुम्हीहि दुःख म्हणजे काय, तें जाणून घेतलेंच पाहिजे.

आणि आपल्या जीवनांतील दैनंदिन चमत्कारांमुळें तुमचें हृदय तुम्ही आश्चर्यमग्न ठेवूं शकत असाल, तर तुमचें दुःखहि तुमच्या आनंदापेक्षां तुम्हांला कमी आश्चर्यकारक भासणार नाहीं;

आणि म्हणून तुमच्या शेतांवरून जाणाऱ्या ऋतूंचा तुम्ही जसा सदैव स्वीकार केला आहे, तसा आपल्या हृदयाच्या ऋतूंचाहि तुम्ही स्वीकार करूं शकाल.



‘ तुम्हीहि दुःख म्हणजे काय, तें जाणून घेतलंच पाहिजे ’

आणि आपल्या दुःखाच्या शिशिरांतहि तुम्हांला प्रशांत चित्तानें बघतां येईल.

तुमचें पुष्कळसें दुःख तुम्ही स्वतःच ओढवून घेतलेलें असतें.

तें जणुं कडू औषधच होय. त्यायोगें तुमच्यांत वसत असलेला वैद्य तुमच्या रुग्ण आत्म्याला रोगमुक्त करितो.

म्हणून त्या वैद्यावर विश्वास ठेवा आणि मुकाट्यानें व शांत चित्तानें त्यानें दिलेलें औषध पिऊन टाका.

कारण, त्याचा हात जरी जड आणि कठोर भासला, तरी अव्यक्ताच्या करुण-मृदु हस्तानें तो प्रेरित झालेला आहे,

आणि त्यानें आणिलेला प्याला जरी तुमचे ओठ भाजीत असला तरी महान् कुंभकारानें आपल्या स्वतःच्या पवित्र अश्रूंनीं भिजविलेल्या मातीपासून तो तयार झालेला आहे.

# आत्मज्ञान

आणि एक मनुष्य म्हणाला, आत्मज्ञानाविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि त्यानें उत्तर दिलें :

दिवस आणि रात्री यांच्या रहस्यांना तुमचीं हृदयें मूकतेनें जाणतातच.

पण तुमचे कान तुमच्या हृदयांतील ज्ञानाचा ध्वनि ऐकण्यासाठीं तृषित असतात.

तुम्ही विचारांत जें नित्य जाणिलेलें असतें तें शब्दांत जाणूं इच्छितां.

आपल्या स्वप्नांच्या नग्न शरीराला तुम्ही आपल्या अंगुलींनीं स्पर्श करूं इच्छितां.

आणि तुम्ही तसें इच्छावें हें ठीकच आहे.

तुमच्या आत्म्याच्या गुप्त निर्झराला प्रकट होण्याची आणि कलरव करीत समुद्राकडे वाहात जाण्याची आवश्यकताच असते;

आणि तुमच्या अनंत अगाधतेंत असलेला निधि तुमच्या नेत्रांपुढें प्रकट होणें जरूरच आहे.

पण तुमचा हा अज्ञात निधि तोलण्यासाठीं तुम्ही तराजू आणूं नका;

आणि काठीनें किंवा लांब दोरीनें तुम्ही आपल्या ज्ञानाची खोली शोधूं नका.

कारण आत्मा म्हणजे असीम आणि अपरिमित असा समुद्रच आहे.

तुम्ही असें म्हणूं नये कीं, "मला सर्व सत्य प्राप्त झालें आहे," तर त्याऐवजीं असें म्हणावें कीं, "मला एक सत्य सांपडलें आहे."

तुम्ही असें म्हणूं नये कीं, "मला आत्म्याचा मार्ग सांपडला आहे," तर त्यापेक्षां असें म्हणावें कीं, "माझ्या मार्गावरून चालत असणाऱ्या आत्म्याला मी भेटलों आहे."

कारण, आत्मा सर्व मार्गांवरून चालत असतो.

आत्मा एका रेषेनेंच चालत नाहीं, अथवा कळकासारखा उगवतहि नाहीं.

सहस्रदलकमलाप्रमाणें आत्मा स्वतःला प्रकट करीत असतो.

# अध्यापन

त्यानंतर एक अध्यापक म्हणाला, अध्यापनाविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि तो म्हणाला :

तुमच्या ज्ञानाच्या उषःकालांत आधींपासूनच जें अर्ध-निद्रित असें वसत असतें, त्याशिवाय कोणीहि मनुष्य तुम्हांला अन्य कांहीं दाखवूं शकणार नाहीं.

आपल्या छात्रांसह मंदिराच्या छायेंतून चालणारा अध्यापक आपल्या ज्ञानामधून कांहीं देत नाहीं, तर आपली श्रद्धा आणि प्रेम यांचाच कांहीं अंश तो अर्पण करितो.

तो खराखुरा ज्ञानी असेल तर तुम्हांला आपल्या ज्ञानमंदिरांत प्रवेश करण्याची आज्ञा करीत नाहीं; तर तुमच्या स्वतःच्याच मनाच्या उंबरठ्याकडे तुम्हांला तो घेऊन जातो.

खगोलशास्त्रज्ञ आपल्या आकाशज्ञानाविषयीं तुम्हांला कांहीं सांगूं शकेल, पण आपलें ज्ञान कांहीं तो तुम्हांला देऊं शकणार नाहीं.

गायक दशदिशांना व्यापून राहिलेल्या तालबद्धतेंत तुम्हांला गाऊन दाखवूं शकेल, पण ताल झेलणारा कान किंवा ताल उमटविणारा कंठ मात्र तुम्हांला तो देऊं शकणार नाहीं.

आणि गणितशास्त्रांत जो निष्णात आहे तो वजन आणि परिमाण या विषयांसंबंधीं तुम्हांला कांहीं सांगूं शकेल, पण तुम्हांला तो तेथें घेऊन जाऊं शकणार नाहीं.

कारण, एका मनुष्याला झालेलें दर्शन दुसऱ्या मनुष्याला आपले पंख उसने देऊं शकत नाहीं.

आणि परमेश्वराच्या दृष्टीमध्यें तुमच्यापैकीं प्रत्येकजण जसा पृथक् पृथक् उभा आहे, तद्वत्च तुमच्या परमेश्वरविषयक ज्ञानाच्या आणि या पृथ्वीचें स्वरूप समजून घेण्याच्या बाबतींत तुमच्यापैकीं प्रत्येकानें स्वतंत्रच असलें पाहिजे.

# मैत्री

आणि एका तरुणानें म्हटलें, मैत्रीविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि त्यानें उत्तर दिलें :

तुमचा मित्र म्हणजे तुमच्या गरजांची परिपूर्ति.

तो तुमचें शेतच आहे आणि त्याची तुम्ही प्रेमानें पेरणी करितां आणि कृतज्ञतेनें कापणी करितां.

आणि तोच तुमचें भोजन व तुमचा उबारा आहे.

कारण, तुम्ही क्षुधित होऊन त्याच्याकडे जातां आणि शांतीसाठीं त्याचा शोध करितां.

तुमचा मित्र तुमच्याजवळ आपलें मन मोकळें करितो तेव्हां तुम्हांला आपल्या स्वतःच्या मनांतल्या 'न'काराची भीति वाटत नाहीं, किंवा आपला 'हो'कार तुम्ही आंतल्या आंत दाबून ठेवीत नाहीं.

आणि तो मूक असतो तेव्हां तुमचें हृदय त्याच्या हृदयाचे बोल ऐकण्याचें थांबवीत नाहीं;

कारण मैत्रीमध्यें सारे विचार, सार्‍या आशा, सार्‍या अपेक्षा मूकतेनेंच उपजत असतात आणि संविभागल्या जातात; पण त्यांच्या आनंदाचा गाजावाजा होत नाहीं.

आपल्या मित्रापासून दूर होतांना तुम्ही दुःख मानूं नका;

कारण, त्याच्यामधील जो अंश तुम्हांला अत्यंत प्रिय वाटत असेल, तो त्याच्या पश्चात् तुम्हाला अधिकच स्पष्ट दिसूं लागेल; जसें पर्वतावर चढणाराला त्या पर्वताचें दर्शन मैदानावरूनच अधिक स्पष्टतेनें होतें.

आणि आपली आत्मवृत्ति अधिक गाढ-गंभीर करण्याशिवाय मैत्रीमध्यें अन्य हेतु नसूं द्या.

कारण, जें प्रेम आपल्या स्वतःच्या गूढ स्वरूपाच्या आविष्कारा-हून अन्य कांहींतरी शोधीत असतें तें प्रेम नव्हे, तर पसरलेलें जाळें होय; आणि त्यांत केवळ निरर्थक वस्तूच पकडल्या जातात.

आणि तुमच्याजवळ जें चांगल्यांतलें चांगलें असेल तें आपल्या मित्रासाठीं ठेवा.

तुमच्या जीवनांतील ओहोटी ज्याला जाणावी लागते, त्याला तुमच्या जीवनांतील भरतीहि जाणून घेऊं द्या.

कारण, तुमचा मित्र म्हणजे अशी कोणती वस्तु आहे, कीं व्यर्थ कालक्षेप करण्याकरितांच तुम्ही त्याचा शोध करावा ?

आपला काल कृतार्थ करण्यासाठींच सदैव त्याला शोधा.

कारण, तुमची गरज पुरविणें हा त्याचा धर्म आहे; तुमची रिक्तता भरून काढणें हा नव्हे.

आणि मैत्रीच्या मधुरतेंत हास्य दुमदुमूं द्या, आणि सुखांचा संविभाग असूं द्या.

कारण, लहानलहान गोष्टींच्या दंवबिंदूंमुळें हृदयाची प्रभात उगवते आणि तें ताजेतवानें होतें.

# वार्तालाप

आणि त्यानंतर एक विद्वान् म्हणाला, वार्तालापाविषयीं कांहीं सांगा.

आणि त्यानें उत्तर दिलें :

आपल्या विचारांत तुम्हांला शांति मिळेनाशी होते तेव्हां तुम्ही वार्तालाप करितां;

आणि आपल्या हृदयाच्या एकांतांत अधिक राहणें तुम्हांला अशक्य होतें तेव्हां तुम्ही आपल्या ओष्ठांत राहातां; कारण ध्वनि म्हणजे विरंगुळा आणि करमणूक.

आणि तुमच्या पुष्कळशा बोलण्यांत विचार अर्धमेला होतो.

कारण, विचार हा आकाशपक्षी आहे, आणि शब्दांच्या पिंजऱ्यांत त्याला आपले पंख उघडतां येतात खरे; पण तेथें तो उड्डाण करूं शकत नाहीं.

एकांताचें भय वाटल्यामुळें तुमच्यांतील कित्येकजण बोलक्या लोकांना शोधीत असतात.

एकांताची शांति त्यांच्या नेत्रांना आपल्या सत्य स्वरूपाचें दर्शन करविते आणि तेथून ते पळून जाऊं बघतात.

आणि कित्येकजण असे असतात कीं, अजाणतेपणानें किंवा विचार केल्याशिवायच आपणां स्वतःलाहि न समजणारें सत्य प्रकट करितात.

आणि कित्येकजण असे असतात कीं, त्यांच्या अंतरात्म्यांत सत्य वसत असतें, पण तें सत्य ते शब्दांत व्यक्त करीत नाहींत.

अशांच्या हृदयांत आत्मा तालबद्ध शांतीमध्यें वास करीत असतो.

आपल्या मित्रांना तुम्ही रस्त्यांत किंवा बाजारांत भेटाल, तेव्हां तुमचा आत्मा तुमच्या ओष्ठांना प्रेरीत करो आणि तुमच्या जिव्हेला मार्ग दाखवो.

तुमच्या ध्वनीच्या ध्वनीला त्याच्या कानाच्या कानाबरोबर बोलूं द्या;

कारण, त्याचा आत्मा तुमच्या हृदयाचें सत्य द्राक्षमधूच्या रुचीच्या स्मृतीप्रमाणें सदैव सांभाळून ठेवील,

जरी त्या द्राक्षमधूच्या रंगाची विस्मृति झालेली असते आणि त्याची सुरईहि अतःपर राहिलेली नसते.

# काळ

आणि एक खगोलशास्त्रज्ञ म्हणाला, काळ म्हणजे काय, गुरुदेव ?
आणि त्यानें उत्तर दिलें :

अनंत आणि अपरिमेय अशा काळाचें तुम्ही मोजमाप घेऊं पाहतां.

घटका आणि ऋतू यांच्या अनुरोधानें तुम्ही आपलें वर्तन ठरवूं इच्छितां आणि आपल्या वृत्तीचाहि ओघ वळवूं बघतां.

काळाचा प्रवाह बनवून त्याच्या तीरावर बसावें आणि तो कसा वाहात आहे त्याचें निरीक्षण करावें असें तुम्हाला वाटतें.

तथापि, तुमच्यांतील कालातीत तत्त्वाला जीवनाच्या कालातीततेचें भान असतें.

आणि त्याला माहीत असतें कीं, गतकाळ म्हणजे केवळ आजची स्मृति आहे आणि भविष्यकाळ म्हणजे आजचें स्वप्न आहे.

आणि तुमच्यांत गायन आणि चिंतन करणारें जें तत्त्व आहे तें अद्यापिहि आद्य क्षणाच्या मर्यादांत वास करीत आहे; त्याच आद्य क्षणानें जीवनाच्या प्रारंभीं आकाशांत ताऱ्यांची पखरण केली.

आपली प्रेम करण्याची शक्ति अमर्याद आहे असें तुमच्यांतल्या कोणाला वाटत नाहीं ?

आणि तरीदेखील असें कोणाला भासत नाहीं, कीं तेंच प्रेम अमर्याद असूनहि केवळ आपल्या स्वतःच्याच जीवनाच्या केंद्राभोंवतीं गुरफटून बसलें आहे, आणि एका प्रेमकल्पनेकडून दुसऱ्या प्रेमकल्पनेकडे अथवा एका प्रेमकर्मांतून दुसऱ्या प्रेमकर्मांकडे तें जात नाहीं ?

आणि प्रेमाप्रमाणेंच काळहि अखंड आणि अचल नाहीं काय ?

तथापि जर तुमच्या विचाराच्या दृष्टीनें ऋतूंनीं कालाची गणना करावयाचीच असेल तर प्रत्येक ऋतूमध्यें अन्य साऱ्या ऋतूंचा समावेश होऊं द्या,

आणि वर्तमानाला स्मृतीनें भूतास आणि आकांक्षेनें भविष्यास मिठी मारूं द्या.

# साधुता आणि दुष्टता

आणि नगरीच्या गुरुजनांपैकीं एकजण म्हणाला, साधुता आणि दुष्टता यांविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि त्यानें उत्तर दिलें :

तुमच्यांत वसणाऱ्या साधुतेविषयीं मी सांगूं शकेन; पण दुष्टते-विषयीं मात्र मला सांगतां येणार नाहीं.

कारण दुष्टता म्हणजे आपल्याच क्षुधेनें आणि तृषेनें पीडिलेली साधुताच नव्हे काय ?

खरोखरच, साधुता क्षुधित होते तेव्हां अंधाऱ्या गुहेमध्येंहि ती अन्न शोधिते आणि तृषित होते तेव्हां मेलेलें पाणीहि पिते.

स्वतःशीं एकरूप असतां तेव्हां तुम्ही साधु असतां.

तथापि स्वतःशीं एकरूप नसतां तेव्हां कांहीं तुम्ही दुष्ट असत नाहीं.

कारण, विभागलेलें घर म्हणजे चोरांची गुहा नव्हे; तर तें केवळ विभागलेलें घरच होय.

आणि सुकाणूं नसलेली नौका धोक्याच्या बेटांमध्यें निरर्थक भटकत राहिली तरी बुडून तळाशीं जात नाहीं.

स्वतःचें अर्पण करण्याचा तुम्ही प्रयत्न करीत असतां, तेव्हां तुम्ही साधु असतां.

तथापि स्वतःकरितां लाभ शोधीत असतां तेव्हां कांहीं तुम्ही दुष्ट असत नाहीं.

कारण जेव्हां तुम्ही लाभाकरितां प्रयत्न करीत असतां, तेव्हां पृथ्वीला मिठी मारणाऱ्या आणि तिचें स्तनपान करणाऱ्या मुळा-प्रमाणेंच बनतां.

निःसंशय, फळ मुळाला असें म्हणूं शकणार नाहीं कीं, "परिपक्व, रसपूर्ण आणि स्वतःची समृद्धि अखंड अर्पण करणारें असें माझ्या-सारखें तूं हो."

कारण, समर्पण करणें ही जशी फळाची गरज आहे तशी स्वीकारणें ही मुळाची गरज आहे.

आपल्या वाणीमध्यें पूर्ण जागृत असतां तेव्हां तुम्ही साधु असतां,

तथापि निद्रित असतांना तुमची जिव्हा जेव्हां निष्कारण चांचरते तेव्हां कांहीं तुम्ही दुष्ट असत नाहीं.

आणि अडखळणारी वाणीहि दुर्बल जिव्हेची शक्ति वाढवूं शकते.

आपल्या ध्येयाकडे तुम्ही निश्चयानें आणि धीरानें पाउलें टाकीत जात असतां तेव्हां तुम्ही साधु असतां.

तथापि त्याकडे तुम्ही लंगडत लंगडत जात असतां तेव्हां तुम्ही कांहीं दुष्ट असत नाहीं.

लंगडत चालणारे झाले म्हणून ते कांहीं मागें जात नाहींत.

पण तुम्ही जे कोणी बलवान् आणि चपल असाल ते द्या शास्त्रविण्यासाठीं म्हणून लंगड्यापुढें लंगडत चालूं नका म्हणजे झालें.

अनंत मार्गांनीं तुमची साधुता प्रकट होत असते, आणि साधु नसतां तेव्हां तुम्ही दुष्ट असतां असें नव्हे,

तर, केवळ रेंगाळणारे आणि सुस्त मात्र बनतां.

हरिणांना आपली चपलता कासवांना शिकवितां येत नाहीं हें शोचनीय आहे.

आपलें विराट् स्वरूप प्राप्त करून घेण्याच्या आकांक्षेमध्यें तुमची साधुता वसत असते; आणि ती आकांक्षा तुम्हां सर्वांमध्ये आहे.

पण तुमच्यापैकीं कांहींजणांत ती आकांक्षा, आपणाबरोबर गिरिगुह्यें आणि वनगीतें घेऊन समुद्राकडे धावणाऱ्या वेगवान् लोंढ्याप्रमाणें असते.

आणि इतरांत, समुद्राला मिळण्यापूर्वींच स्वतःच्याच

वळणांवळणांत लुप्त होणाऱ्या आणि रेंगाळणाऱ्या क्षीण निर्झरासारखी ती असते.

तथापि ज्याची आकांक्षा मोठी आहे त्यानें अल्पाकांक्षी मनुष्याला असें म्हणूं नये कीं, “ तुझी गति मंद कां आणि तूं कशासाठीं थबकतोस ? ”

कारण सत्यार्थानें जो साधु आहे, तो विवस्त्र असलेल्याला “ तुझें वस्त्र कोठें आहे ? ” असें विचारीत नाहीं, किंवा घर नसलेल्याला “ तुझ्या घराचें काय झालें ? ” असाहि प्रश्न करीत नाहीं.

# प्रार्थना

त्यानंतर एक उपदेशिका म्हणाली, प्रार्थनेविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि त्यानें उत्तर दिलें :

तुम्ही आपल्या दुःखामध्यें आणि गरजेच्या प्रसंगीं प्रार्थना करितां; पण आपल्या आनंदाच्या पूर्णतेंत आणि आपल्या समृद्धीच्या कालांतहि तुम्ही प्रार्थना कराल तर किती छान होईल !

कारण, प्रार्थना म्हणजे चैतन्यमय आकाशांत स्वतःचाच विस्तार नव्हे, तर काय ?

आणि आपला अंधकार दशदिशांना पसरविण्यांत तुम्हांला समाधान वाटत असेल, तर आपल्या हृदयाच्या उषेलाहि फैलावून देण्यांत तुम्हांला आनंद होईल.

आणि तुमचा आत्मा प्रार्थना करण्याकरितां ज्यावेळीं तुम्हांला

पुकारतो त्यावेळीं अश्रू गाळिल्याशिवाय तुमच्याच्यानें राहवतच नसेल, तर तुम्ही रडत असलां तरी हंसत हंसत बाहेर येईपर्यंत त्यानें तुम्हांला पुनःपुनः प्रेरणा द्यावी.

तुम्ही प्रार्थना करीत असतां, तेव्हां त्याच क्षणीं जे प्रार्थना करीत असतात आणि प्रार्थनेव्यतिरिक्त ज्यांना तुम्ही भेटूं शकत नाहीं, त्यांना भेटण्याकरितां वायुमंडलांत तुम्ही वर चढतां.

म्हणून त्या अव्यक्त मंदिरांतील तुमचा प्रवेश केवळ समाधि आणि मधुर मीलन यांसाठींच असो.

कारण, त्या मंदिरांत प्रवेश करण्यांत याचनेशिवाय तुमचा दुसरा कोणताच हेतु नसेल, तर तुम्हांला कांहीं मिळूं शकणार नाहीं.

आणि केवळ स्वतःला नम्र बनविण्याकरितांच त्यांत तुम्ही प्रवेश कराल, तर तुम्हांला उंच चढविण्यांत येणार नाहीं.

अथवा इतरांचें कल्याण मागून घेण्यासाठीं तुम्ही त्यांत प्रवेश कराल, तरी तुमच्याकडे लक्ष दिलें जाणार नाहीं.

त्या अव्यक्त मंदिरांत तुम्ही केवळ प्रवेश केला म्हणजे पुरे आहे.

शब्दद्वारा प्रार्थना कशी करावी हें मी तुम्हांला शिकवूं शकत नाहीं.

प्रभु स्वतःच जेव्हां तुमच्या ओष्ठांतून बोलतो तेव्हांच तुमचे ते शब्द तो ऐकतो; नुसते तुम्ही उच्चारिलेले शब्द तो ऐकत नाहीं.

आणि समुद्र, अरण्यें व पर्वत जी प्रार्थना करितात तीहि मी तुम्हांला शिकवूं शकत नाहीं.

पण पर्वत, अरण्यें आणि समुद्र यांमधून जन्म पावलेले तुम्ही आपल्या हृदयांतच त्यांच्या त्या प्रार्थनेचा शोध करूं शकाल.

आणि रात्रीच्या शांततेंत जर तुम्ही श्रवण कराल, तर त्यांना मूकतेनें म्हणतांना तुम्ही ऐकाल :

" हे प्रभो, तूंच आमचा उड्डाण करूं पाहणारा जीवात्मा आहेस, आमच्यांत उद्भूत होणारा संकल्प हा तुझाच संकल्प आहे.

" आमच्यांत उत्पन्न होणारी कामना ही तुझीच कामना आहे.

" आमच्या रात्रींचें दिवसांत परिवर्तन करूं पाहणारी आमच्यांतली प्रेरणा ही तुझीच प्रेरणा आहे. त्या रात्री तुझ्या आहेत आणि ते दिवसहि तुझेच आहेत.

" आम्हांला तुजजवळ कांहींच मागावयाचें उरत नाहीं; कारण आमच्या गरजा आमच्यांत उत्पन्न होण्यापूर्वींच तुला माहीत असतात :

" तूंच आमची गरज आहेस, आणि आम्हांला आपला स्वतःचा अंश अधिकाधिक दिल्यानेंच तूं आम्हांला सर्व कांहीं देतोस."

# सुख

त्यानंतर वर्षातून एकदांच नगरांत येणारा एक अरण्यवासी साधु पुढें आला आणि म्हणाला, सुखाविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि त्यानें उत्तर दिलें :

सुख हें स्वातंत्र्य-गीत आहे,

तथापि तें कांहीं स्वातंत्र्य नव्हे.

तें तुमच्या कामनांचें पुष्प आहे,

तथापि तें त्यांचें फळ नव्हे.

तें उच्चतेला आवाहन करणारी सखोलता आहे,

तथापि तें उच्चहि नव्हे अथवा सखोलहि नव्हे.

तें पंजरबद्धाच्या पंखाचा फडफडाट आहे,

तथापि तें परिवेष्टिलेला प्रदेश नव्हे.

होय, खरोखरच, सुख हें स्वातंत्र्य-गीत आहे.

आणि हृदयाच्या तल्लीनतेनें तुम्ही तें गावें अशी माझी इच्छा आहे; तथापि त्या गानांत तुम्ही आपलीं हृदयें गमावून बसावेंसें मला वाटत नाहीं.

तुमच्यापैकीं कांहीं तरुण जणुं मजा हेंच सर्वस्व आहे असें मानून तिचा शोध करीत फिरतात, आणि त्यांच्यावर टीका केली जाते आणि त्यांची निंदा करण्यांत येते.

मी त्यांच्यावर टीका करणार नाहीं किंवा त्यांची निंदा करणार नाहीं. मी त्यांना तिचा शोध करूं देईन.

कारण त्यांना ती सांपडेल, पण ती एकटीच असणार नाहीं;

तिच्या सात बहिणी आहेत, आणि त्यांच्यांतील सर्वांत लहान मजेपेक्षां अधिक सुंदर आहे.

कंदमुळांसाठीं जमीन खोदणाराला द्रव्य सांपडलें, ही गोष्ट तुम्ही ऐकिली नाहीं का ?

आणि तुमच्यांतील कांहीं वडिलधारी मंडळी दारूच्या नशेंत केलेल्या पापांप्रमाणें आपण उपभोगिलेल्या सुखांचें खेदानें स्मरण करितात.

पण खेद म्हणजे मनावर पसरलेलें अभ्रपटल होय; प्रायश्चित्त नव्हे.

ग्रीष्मामधील पिकाच्या स्मरणाप्रमाणें त्यांनीं आपल्या सुखांचें कृतज्ञतेनें स्मरण करावें.

तथापि, खेद करण्यानेंच त्यांना समाधान मिळत असेल तर त्यांना तें खुशाल मिळवूं द्या.

आणि तुमच्यांतले कांहींजण सुख शोधण्याइतके तरुण नाहींत अथवा त्याचें स्मरण करण्याइतके वृद्धहि नाहींत.

आणि शोधण्याच्या आणि स्मरण होण्याच्या भीतीमुळें ते सर्व सुखांचा तिरस्कार करितात; जणुं आपल्या आत्म्याची हेळसांड होईल अथवा त्याचा अपराध घडेल असेंच त्यांना वाटतें.

पण त्यांच्या या त्यागांतहि त्यांना सुखच लाभतें.

आणि अशा रीतीनें लटलटणाऱ्या हातांनीं ते कंदमुळांकरितां शोधीत असले तरी त्यांनाहि द्रव्य सांपडतें.

पण आत्म्याचा अपराध करूं शकेल असा कोण आहे, हें मला सांगा.

कोकिळा रात्रीच्या नीरवतेचा अथवा खद्योत तारकांचा अपराध करूं शकेल काय ?

आणि तुमची ज्योत किंवा धूर वायूला भारभूत होणें शक्य आहे काय ?

तुम्हांला असें वाटतें काय, कीं आत्मा म्हणजे पाण्याचें एक लहानसें शांत कुंड आहे आणि तें तुम्ही काठीनें ढवळून खराब करूं शकाल ?

सुखाचा त्याग करण्यांत तुम्ही आपली इच्छा आपल्या हृदयाच्या आंतल्या कप्प्यांत दडवून मात्र ठेवितां.

कोणास माहीत, कीं ज्याचा आज त्याग केल्यासारखा दिसत आहे, तेंच उद्यांची प्रतीक्षा करीत असणार नाहीं ?

तुमच्या शरीरालाहि आपल्या संस्काराचें आणि आपल्या योग्य गरजेचें ज्ञान असतें आणि तें वंचित केलें जाणार नाहीं.

आणि तुमचें शरीर म्हणजे तुमच्या आत्म्याची वीणाच होय,

आणि तिच्यांतून मधुर संगीत निर्माण करणें अथवा बेसूर कोलाहल निपजविणें हें तुमच्या हातीं आहे.

आणि आतां तुम्ही आपल्या हृदयाला विचारा कीं, "सुखांमध्यें चांगलें कोणतें आणि वाईट कोणतें हें आम्हांला कसें ओळखतां येईल ?"

आपल्या शेतांत आणि आपल्या बागांत जा, आणि तुम्हांला असें आढळून येईल, कीं फुलांमधील मध गोळा करण्यांत मधमाशीचें सुख आहे,

तसेंच मधमाशीला आपला मध अर्पण करण्यांत फुलाला सुख आहे.

कारण, मधमाशीला फूल म्हणजे जीवनाचें कारंजेंच होय,

आणि फुलाला मधमाशी म्हणजे प्रेमाची दूतिकाच होय.

आणि मधमाशी व फूल या उभयतांनाहि सुख देणें आणि सुख

भोगणें या दोन्ही गोष्टींची जरूरी असते आणि तोच त्यांचा परम आनंद असतो.

ऑरफालीझवासी जनहो, आपल्या सुखाच्या बाबतींत तुम्ही फुलें आणि मधमाशा यांचें अनुकरण करा.

# सुंदरता

आणि एक कवि म्हणाला, सुंदरतेविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि त्यानें उत्तर दिलें:

सुंदरता स्वतःच तुमचा पथ आणि पथदर्शक बनणार नाहीं, तर तुम्ही ती कोठें शोधाल आणि कशी मिळवाल ?

आणि ती स्वतःच तुमच्या वाणीची गुंफण करणार नाहीं, तर तिचें वर्णन तुम्ही कसें कराल ?

पीडित आणि विद्ध म्हणतात, " सुंदरता कृपाळु आणि मृदुल आहे.

" आपल्या वैभवानें अर्ध-लज्जित असलेल्या तरुण मातेप्रमाणें ती आपणांत वावरते."

आणि भोगलोलुप म्हणतात, " नाहीं, सुंदरता म्हणजे प्रबल आणि भयंकर वस्तु आहे.

"प्रचंड झंझावाताप्रमाणें ती आपल्याखालची भूमि व आपल्यावरचें आकाश यांना हादरवून सोडिते."

श्रांत आणि शिणलेले म्हणतात, "सुंदरता गुलगुल गोष्टी करणारी आहे. ती आमच्या आत्म्याशीं वार्तालाप करिते.

"छायेच्या भीतीनें कांपणाऱ्या मंद प्रकाशाप्रमाणें तिचा ध्वनि आमच्या मूकतेला वश होतो."

पण चंचल म्हणतात, "आम्ही तिला पर्वतांमध्यें गर्जना करितांना ऐकिलें आहे,

"आणि तिच्या गर्जनांबरोबर खुरांचा खडखडाट, पंखांचा फडफडाट आणि सिंहगर्जनांचा गडगडाट आमच्या कानीं आला आहे."

रात्रीच्या वेळीं नगरीचे रखवालदार म्हणतात, "पूर्वेकडून उषेसह सुंदरतेचा उदय होईल."

आणि मध्याह्नकाळीं श्रमजीवी आणि प्रवासी म्हणतात, "सूर्यास्ताच्या गवाक्षांमधून पृथ्वीवर डोकावून बघतांना आम्ही तिला पाहिलें आहे."

शिशिर ऋतूंत हिमवृष्टीनें काकडून गेलेले म्हणतात, "सुंदरता टेकड्यांवरून उड्या मारीत वसंतासह येईल."

आणि ग्रीष्माच्या कडाक्यांत कापणी करणारे म्हणतात, "हेमंतांतल्या पल्लवांबरोबर नृत्य करीत असतांना आम्ही सुंदरतेला

पाहिलें आहे, आणि तिच्या केशभारांत असलेला हिमगुच्छहि आम्ही पाहिला.

सुंदरतेविषयीं इतकें सारें तुम्ही बोलला आहांत;

पण खरें म्हटलें म्हणजे, सुंदरतेविषयीं तुम्ही बोललां नाहीं, तर आपल्या अतृप्त आकांक्षा मात्र तुम्ही व्यक्त केल्या.

पण, सुंदरता म्हणजे आकांक्षा नव्हे, तर समाधि आहे.

ती तृषित मुख नव्हे किंवा पसरलेला रिक्त हस्तहि नव्हे,

तर, ती प्रदीप्त हृदय आणि मंत्रमुग्ध आत्मा आहे.

ती तुम्हांला बघतां येईल अशी मूर्ति नव्हे अथवा ऐकतां येईल असें गीतहि नव्हे,

तर, ती अशी मूर्ति आहे, कीं आपले नेत्र तुम्ही मिटून घेतले तरीहि तिचें तुम्हांला दर्शन होतें आणि असें गीत आहे, कीं तुम्ही आपले कान बंद करून घेतले तरीहि तें तुम्हांस ऐकूं येतें.

सुंदरता सुरकुतलेल्या सालींतला रस नव्हे. अथवा नखाला जोडिलेला पंखहि नव्हे,

तर, ती अखंड प्रफुल्लित असलेलें उद्यान आहे, आणि सदैव भरारी मारीत असलेला देवदूतांचा समूह आहे.

ऑरफालीझवासी जनहो, सुंदरता म्हणजे जीवन : जीवनानें आपल्या पवित्र मुखावरील आवरण बाजूला सारून दिलेलें दर्शन.

पण तुम्हीच जीवन आहांत आणि तुम्हीच आवरणहि आहांत.

सुंदरता म्हणजे दर्पणांत स्वतःचेंच निरीक्षण करणारी चिरंतनता.

पण तुम्हीच चिरंतनता आहांत आणि तुम्हीच दर्पणहि आहांत.

# धर्म

आणि एक वृद्ध उपदेशक म्हणाला, धर्माविषयीं आम्हांला कांहीं सांगा.

आणि तो म्हणाला :

आज मी दुसऱ्या कशावर बोललों आहे ?

सकल कर्म आणि सकल चिंतन म्हणजेच धर्म नव्हे काय ?

आणि कर्म नव्हे अथवा चिंतनहि नव्हे असा हृदयांत सदैव उद्भूत होणारा चमत्कार आणि आश्चर्य हा देखील धर्मच नव्हे काय ?

मग तो चमत्कार हातांनीं दगड घडवितांना अथवा माग सांभाळतांना का उत्पन्न झालेला असेना.

आपल्या कर्मांपासून आपली निष्ठा आणि आपल्या व्यवसायांपासून आपली श्रद्धा कोणाला वेगळी करितां येईल ?

आपल्या कालाचे विभाग पाडून " हा विभाग ईश्वराचा आणि

हा माझा; हा माझ्या आत्म्याकरितां आणि हा बाकीचा माझ्या शरीराकरितां " असें कोणाला म्हणतां येईल ?

तुमचीं सर्व घटकापळें म्हणजे आकाशांत आत्म्याकडून आत्म्याकडे संचार करणारे पंखच होत.

आपली नीति हें एक उंची वस्त्र आहे असें समजून जो तिचें धारण करतो, त्यानें त्यापेक्षां उघडें राहिलेलें बरें.

वायु आणि सूर्य त्याच्या त्वचेला छिद्रें पाडणार नाहींत.

आणि जो आपलें वर्तन नीतिनियमानें मर्यादित करीत असतो तो आपल्या गाणाऱ्या पक्ष्याला पिंजऱ्यांत बंदिवान् करितो.

अत्यंत मनमोकळें गाणें गज आणि जाळ्या यांतून येत नाहीं.

आणि पूजा म्हणजे उघडझांक करितां येणारी खिडकीच असें ज्याला वाटतें त्यानें आपल्या आत्म्याच्या मंदिरांत अद्याप प्रवेश केलाच नाहीं; कारण, आत्म-मंदिराच्या खिडक्या एका उषेपासून दुसऱ्या उषेपर्यंत पसरलेल्या असतात.

तुमचें रोजचें जीवन हेंच तुमचें मंदिर आणि हाच तुमचा धर्म.

जेव्हां जेव्हां तुम्ही त्यांत प्रवेश कराल तेव्हां तेव्हां आपलें सर्वस्व बरोबर घेऊन जा.

आपला नांगर आणि ऐरण आणि हातोडा आणि वीणा,

उपयुक्ततेसाठीं अथवा आनंदासाठीं ज्या वस्तू तुम्ही निर्माण केल्या आहेत त्या साऱ्या घेऊन जा.

कारण, ध्यानधारणेंत तुम्ही आपल्या यशःसिद्धींपेक्षां अधिक वर चढूं शकणार नाहीं आणि आपल्या अपयशांपेक्षां अधिक खालीं पडूं शकणार नाहीं.

आणि आपणाबरोबर सर्व मानवांना घ्या :

कारण, पूजा करितांना त्यांच्या आशांपेक्षां तुम्ही अधिक उंच उड्डाण करूं शकणार नाहीं आणि त्यांच्या निराशेपेक्षां अधिक खालीं उतरूं शकणार नाहीं.

आणि तुम्ही प्रभूला जाणूं इच्छीत असाल, तर गूढ समस्या उकलण्याच्या भानगडींत पडूं नका.

तर आपल्या आजुबाजूला बघा; आणि तुमच्या मुलांबाळांबरोबर हंसत-खिदळत असलेला तो तुम्हांस दिसेल.

आणि आकाशांत बघा; मेघमालेंत संचार करीत असलेला, विद्युलतेंत आपले बाहू पसरवीत असलेला आणि पर्जन्यांतून खालीं उतरत असलेला तुम्हांला तो दिसेल.

फुलांमध्यें हंसत असलेला आणि झाडांवर चढून आपले हात नाचवीत असलेला तो तुम्हांला आढळेल.

# मृत्यु

त्यानंतर अल्मित्रा म्हणाली, आतां आम्ही मृत्यूबद्दल विचारूं इच्छितों.

आणि तो म्हणाला :

तुम्ही मृत्यूचें रहस्य जाणूं इच्छितां;

पण जीवनाच्या हृदयांतच शोधिल्याशिवाय तुम्हांला तें कसें सांपडूं शकेल ?

रात्रीनें डोळे बांधिल्यामुळें दिवसाला आंधळ्या बनलेल्या घुबडाला प्रकाशाचें कोडें उलगडतां येणें अशक्य आहे.

तुम्ही खरोखरच मृत्यूचें स्वरूप बघूं इच्छीत असाल, तर आपलें हृदय जीवनाच्या शरीरासमोर पूर्णपणें उघडें करा.

कारण, सरिता आणि समुद्र यांप्रमाणेंच जीवन आणि मृत्यु एकच आहेत.

तुमच्या आशा आणि इच्छा यांच्या मुळाशीं पारलौकिकाचें ज्ञानच लपलेलें असतें;

आणि बर्फाखालीं असलेल्या बीजांप्रमाणें तुमच्या हृदयाला वसंताचीं स्वप्नें पडत असतात.

त्या स्वप्नांवर श्रद्धा ठेवा; कारण, शाश्वततेचें द्वार त्यांत दडून राहिलेलें आहे.

तुमची मृत्यूची भीति ही त्या धनगराच्या भीतीसारखी आहे; राजा स्वहस्तानें आपला सन्मान करणार आहे हें जाणूनहि त्याच्या-पुढें उभें राहतांना तो थरथर कांपत होता.

पण थरथर कांपत असतांहि राजकृपेचें चिन्ह आपण धारण करणार आहोंत या भावनेनें आंतून तो हर्षोत्फुल्ल असत नाहीं काय?

आणि तरीहि आपल्या थरथरण्याचीच त्याला अधिक जाणीव असत नाहीं काय?

कारण, मरणें म्हणजे वायूंत उघडें उभें राहणें आणि सूर्यतेजांत विलीन होणेंच नव्हे, तर काय?

आणि श्वसन थांबणें म्हणजे तरी काय? प्राणवायूनें उपाधिरहित होऊन वर चढावें, विशाल व्हावें आणि प्रभूला शोधावें यासाठीं त्याला अविश्रांत स्पंदनांतून मुक्त करणें, हेंच कीं नाहीं?

मौनाच्या सरितेमधून प्राशन कराल, तेव्हांच तुम्ही खरोखर गाऊं शकाल.

आणि पर्वताच्या शिखरावर पोहोंचल्यानंतरच आरोहणाला तुम्ही प्रारंभ करूं शकाल.

आणि पृथ्वीनें तुमचे अवयव आपणांत सामावून घेतले म्हणजेच तुम्ही खरेखुरें नृत्य करूं शकाल.

# निरोप

आणि आतां संध्याकाळ झाली होती.

आणि ब्रह्मवादिनी अलमित्रा म्हणाली, आजचा हा दिन आणि हें स्थळ आणि अमृतवाणी स्रवणारा तुझा आत्मा हीं धन्य होत.

आणि तो बोलला, मी केवळ प्रवक्ताच होतों ?

मी एक श्रोताहि नव्हतों का ?

तदनंतर तो मंदिराच्या पायऱ्या उतरला आणि सगळे लोक त्याच्या पाठीमागून चालले. आणि तो आपल्या नौकेजवळ जाऊन पोहोंचला आणि तिच्या सोपानतलावर उभा राहिला.

आणि लोकांकडे पुनः मुख वळवून, आपला स्वर उच्च करून तो म्हणाला :

ऑरफालीझवासी जनहो, पवन मला तुमचा निरोप घेण्याची आज्ञा करीत आहे.

पवनाइतकी मला त्वरा नाहीं, तथापि मला गेलेंच पाहिजे.

आम्ही तर एकांताचा मार्ग सदैव शोधणारे भटक्ये ! ज्या ठिकाणीं आम्ही एक दिवस संपवितों त्या ठिकाणीं दुसरा दिवस उगवूं देत नाहीं; आणि सूर्यास्त ज्या ठिकाणीं आम्हांला सोडतो त्या ठिकाणीं सूर्योदयाला आम्ही सांपडत नाहीं.

पृथ्वी निद्रामग्न असतांहि आम्ही फिरतच असतों.

आम्ही चिवट वृक्षाचीं बीजें आहोंत, आणि आमचें हृदय परिपक्व होऊन पूर्णतेला गेलें म्हणजे आम्हांला वायूच्या हवालीं करण्यांत येतें आणि विखरून टाकिलें जातें.

किती अल्पकाळच मी तुमच्यांत राहिलों, आणि त्याहूनहि अल्प शब्द मी तुमच्याशीं बोललों.

पण तुमच्या श्रवणांमधील माझा ध्वनि क्षीण झाला आणि तुमच्या स्मृतींतील माझें प्रेम लुप्त झालें तर मी पुनः येईन.

आणि अधिक समृद्ध हृदयानें आणि आत्म्याला अधिक वश होणाऱ्या ओष्ठांनीं बोलेन.

निःसंशय, सागराच्या भरतीबरोबर मी परत येईन,

आणि मृत्यूनें मला लपविलें आणि महान् मूकतेनें आच्छादिलें, तरी पुनः मी तुमच्या बुद्धीचा शोध करीन.

आणि माझें शोधणें व्यर्थ जाणार नाहीं.

मीं सांगितलेलें जर कांहीं सत्य असेल, तर तें सत्य स्पष्टतर

आवाजांत आणि तुमच्या विचारांना अधिक अनुरूप अशा शब्दांत स्वतःच प्रकट होईल.

मी वायूबरोबर जात आहें, पण ऑरफालीझवासी जनहो, शून्यतेच्या खोल दरींत मी जात नाहीं;

आणि आजचा दिवस जर तुमच्या गरजा आणि माझें प्रेम यांच्या कृतार्थतेचा होणार नसेल, तर तो दुसऱ्या दिवसाच्या आगमनाचें अभिवचन होवो.

मनुष्याच्या गरजा बदलतात, पण त्याचें प्रेम बदलत नाहीं, अथवा आपल्या प्रेमानें आपल्या गरजा तृप्त करून घेण्याची त्याची इच्छाहि बदलत नाहीं.

म्हणून अधिक मोठ्या मूकतेंतून मी परत येईन याविषयीं निःशंक असा.

शेतांमध्यें दंवबिंदूंची पखरण करून प्रभातकाळीं वितळून जाणारें धुकें उंच चढतें व मेघामध्यें एकत्रित होतें आणि नंतर पर्जन्यमिषानें खालीं पडतें.

आणि त्या धुक्याहून मी कांहीं निराळ्या प्रकारचा नाहीं.

रात्रीच्या प्रशांततेंत मी तुमच्या मार्गांतून फिरलों आहे, आणि माझ्या आत्म्यानें तुमच्या गृहांत प्रवेश केला आहे.

आणि तुमच्या हृदयांतले ठोके माझ्या हृदयांत पडले आहेत, आणि तुमचा उच्छ्वास माझ्या मुखाला भासला आहे आणि मीं तुम्हां सर्वांना जाणिलें आहे.

होय, तुमचा आनंद आणि तुमचें दुःख मीं जाणिलें आहे, आणि तुमच्या निद्रेमधील तुमचीं स्वप्नें हीं माझीं स्वप्नें बनलीं आहेत.

आणि अनेकदां पर्वतांतील सरोवराप्रमाणें मीं तुमच्यांत वास केला आहे.

तुमचीं शिखरें आणि तुमच्या नागमोडी उतरणी, इतकेंच काय, पण तुमच्या विचारांचे आणि तुमच्या वासनांचे धावते कळप या सर्वांचीं प्रतिबिंबें मीं उमटविलीं आहेत.

आणि माझ्या शांतीकडे निर्झररूपानें तुमच्या बालकांचें हास्य, आणि सरितारूपानें तुमच्या तरुणांच्या आकांक्षा आल्या आहेत.

आणि माझ्या अथांगतेंत प्रवेश केल्यावरहि त्या निर्झरांच्या आणि सरितांच्या गानाला खंड पडलेला नाहीं.

पण हास्याहून मधुरतर आणि आशा-आकांक्षांहूनहि अधिक थोर असें तुमचें कांहींतरी मजकडे आलें आहे.

तें म्हणजे तुमच्यांतील असीम तत्त्व;

त्या विराट् पुरुषामधील तुम्ही सर्व केवळ स्नायू आणि पेशीच आहांत;

त्याच्या सुरांत तुमचें सारें गायन म्हणजे केवळ निःशब्द कंपनच होय.

त्या विराट् पुरुषामध्येंच तुम्ही विराट् असतां,

आणि त्याच्या दर्शनांत मीं तुमचें दर्शन घेतलें आणि तुमच्यावर प्रेम केलें.

कारण, त्या विराट् क्षेत्रांत नसलेले कोणते टप्पे प्रेमाला गांठतां येतील ?

कोणतीं दर्शनें, कोणत्या आशा आणि कोणत्या कल्पना त्या विराटाच्या उड्डाणापलीकडे जाऊं शकतील ?

मधुमंजरींच्या बहरानें आच्छादून गेलेल्या एकाद्या भव्य वृक्षा-प्रमाणें तो विराट् पुरुष तुमच्यांत वसत आहे.

त्याची शक्ति तुम्हांला पृथ्वीशीं जखडून टाकिते, त्याचा सुगंध तुम्हांला आकाशांत उंच नेतो आणि त्याच्या चिरंजीवितेंत तुम्ही अमर असतां.

तुम्हांला सांगण्यांत आलें आहे कीं, सांखळीप्रमाणेंच तुम्हीहि आपल्या अतिदुर्बल दुव्याइतके दुर्बल आहांत.

हें केवळ अर्धसत्य आहे. तुम्ही आपल्या दृढतम दुव्याइतके दृढ आहांत.

तुमच्या अतिक्षुद्र कार्यावरून तुमचें मोजमाप करणें म्हणजे समुद्राच्या शक्तीची त्याच्या फेसाच्या भंगुरतेवरून गणना करणेंच होय.

तुमच्या अपयशांवरून तुमच्याविषयीं मत बनविणें म्हणजे ऋतूंना त्यांच्या चांचल्याबद्दल दोष देणेंच होय.

खरेंच, तुम्ही समुद्रासारखे आहांत,

आणि ओहोटीनें लादलेलीं गलबतें तुमच्या किनाऱ्यांवर भरतीची वाट बघत उभीं असलीं, तरी समुद्राप्रमाणेंच तुम्ही आपल्या भरतीला त्वरा करूं शकत नाहीं.

आणि तुम्ही ऋतूंसारखेहि आहांत,

आणि आपल्या शिशिरामध्यें तुम्ही आपल्या वसंताचें अस्तित्व नाकारलें,

तरी तुमच्यांत सुप्त असलेला वसंत आपल्या गुंगीमध्यें हंसत असतो आणि तुमच्यावर रागावत नाहीं.

" त्यानें आमची चांगल्या प्रकारें स्तुति केली, त्यानें आमच्यांतलें चांगलें तेवढेंच बघितलें, " असें तुम्ही परस्परांना सांगावें म्हणून या गोष्टी मी तुम्हांस सांगत आहे असें समजूं नका.

आपल्या अंतःकरणांत तुम्हांलाच जें माहीत आहे तेंच केवळ शब्दांमध्यें मी तुम्हांला सांगत आहे.

आणि शब्दमय ज्ञान म्हणजे शब्दातीत ज्ञानाची छायाच नव्हे, तर काय ?

तुमचे विचार आणि माझे शब्द म्हणजे मोहोरबंद स्मृतीचे तरंगच होत. त्या स्मृतींत आपल्या गत दिवसांची,

आणि पृथ्वीला स्वतःचें अथवा आपणां सर्वांचें ज्ञानहि झालें नव्हतें तेव्हांच्या प्राचीन दिनांची,

आणि पृथ्वी गडबडीनें प्रथमच निर्माण झाली तेव्हांच्या रात्रींची नोंद केलेली असते.

ज्ञानी पुरुष आपलें ज्ञान तुम्हांला देण्याकरितां तुमच्याकडे येऊन गेले आहेत; मी तुमच्यापासून ज्ञान मिळविण्याकरितां आलों होतों :

आणि बघा, ज्ञानापेक्षांहि उच्चतर वस्तु मला मिळाली आहे.

ती म्हणजे सदैव अधिकाधिक प्रज्वलित होणारी तुमच्यांतील चैतन्यज्योति,

पण तुम्ही मात्र तिच्या वृद्धीकडे दुर्लक्ष करून आपले दिवस कमी होत आहेत म्हणून शोक करीत आहांत.

ती चैतन्यज्योति म्हणजे थडग्याला भिणाऱ्या शरीरांतील जीवनाचा शोध करणारें जीवन.

येथें थडगीं मुळीं नाहींतच.

हे पर्वत आणि मैदानें जणुं पाळणा आणि चढण्याची पायरी आहेत.

आपल्या पूर्वजांच्या स्मशानभूमीवरून जेव्हां जेव्हां तुम्ही जाल तेव्हां तेव्हां तेथें लक्षपूर्वक बघा, म्हणजे तुम्ही आणि तुमचीं मुलेंबाळें हातांत हात घालून नाचत आहांत असें तुम्हांला आढळून येईल.

खरेंच, पुष्कळदां तुम्ही अजाणतांच आनंदोत्सव करीत असतां.

तुमच्याकडे कित्येक असेहि येऊन गेले आहेत, कीं ज्यांनीं तुमच्या श्रद्धेला सुवर्णमय अभिवचनें दिलीं; आणि त्यांचा मोबदला म्हणून तुम्हीं त्यांना संपत्ति आणि सत्ता आणि ऐश्वर्य समर्पण केलें आहे.

असें अभिवचनहि मीं तुम्हांला दिलेलें नाहीं; आणि तरीहि तुम्हीं मला अधिक औदार्य दाखविलें आहे.

तुम्ही जीवनाविषयींची गाढतर तृषा मला दिली आहे.

निःसंशय, मनुष्याच्या सर्व हेतूंचें सुकलेल्या ओठांत आणि त्याच्या साऱ्या जीवनाचें निर्झरणींत रूपांतर करणाऱ्या देणगीहून दुसरी कोणतीच मोठी देणगी असणार नाहीं.

आणि माझा सन्मान आणि माझें पारितोषिक यांतच आहे,—

जेव्हां जेव्हां त्या निर्झरणीवर प्राशन करण्याकरितां मी येतों तेव्हां तेव्हां तें चैतन्यमय जल स्वतःच तृषित असलेलें मला आढळून येतें;

आणि मी त्याला पिऊं लागलों कीं तेंहि मला पिऊं लागतें.

देणग्यांचा स्वीकार करण्यांत मी मानी आणि अति लाजरा आहे असें तुमच्यापैकीं कित्येकांना वाटलें आहे.

मजुरी घेण्यांत मी मानी आहे खरा, पण देणग्या स्वीकारण्यांत नाहीं.

आणि आपल्या पंक्तीला घेण्याचें तुम्ही इच्छीत असतांहि मीं डोंगरांमध्यें जाऊन बोरें खाल्लीं आहेत,

आणि तुम्हीं मोठ्या आनंदानें मला आश्रय दिला असतां, हें जाणूनहि मंदिराच्या ओरींत मी झोंपलों आहे.

तथापि, माझ्या दिनरात्रींविषयीं तुम्ही प्रेमपूर्ण चिंता वाहात होतां;

आणि तिनेंच माझ्या मुखांतील अन्न मधुर बनविलें आणि माझ्या निद्रेला मधुर स्वप्नांनीं परिवेष्टित केलें, असें नाहीं काय ?

यासाठीं माझे तुम्हांला उदंड आशीर्वाद आहेत :

तुम्ही पुष्कळ अर्पण करितां, पण आपण अर्पण केलें आहे याची तुम्हांला जाणीवहि नसते.

खरोखरच, आरशामध्यें स्वतःचेंच प्रतिबिंब पाहणारी करुणा पाषाण बनते,

आणि सत्कृत्य स्वतःलाच नाजुक नांवांनीं संबोधूं लागलें, कीं तें शापाचें जनक बनतें.

तुमच्यांतील कित्येकांनीं मला एकलकोंडा आणि आपल्या एकाकीपणांत मस्त असणारा असें म्हटलें आहे,

आणि तुम्ही म्हणाला आहांत कीं, " तो अरण्यांतील वृक्षांबरोबर संभाषण करितो, पण मनुष्यांबरोबर करीत नाहीं.

" तो एकटाच गिरीशिखरांवर बसतो आणि तेथून आमच्या नगरीकडे ( तुच्छतेनें ) बघतो."

मीं पर्वतांवर आरोहण केलें आहे आणि दूरच्या प्रदेशांत हिंडलों आहे, हें खरेंच.

खूप उंच किंवा खूप दूर गेल्याशिवाय मला तुम्हांला कसें बघतां आलें असतें ?

खरोखर, दूर गेल्याशिवाय निकट कसें येतां येईल ?

आणि तुमच्यांतील बाकीचे मला संबोधून–शब्दांत नव्हे– म्हणाले:

"हे अपरिचिता, अगम्य शिखरांचें प्रेम बाळगणाऱ्या परस्था, गरुड आपलीं घरटीं बांधितात त्या पर्वतशिखरांवर तूं कां वास करीत आहेस ?

"तूं अप्राप्याचा कां शोध करीत आहेस ?

"कोणत्या झंझावातांना तूं आपल्या जाळ्यांत पकडूं इच्छीत आहेस,

"आणि कोणत्या बाष्पमय पक्ष्यांची आकाशांत पारध करणार आहेस ?

"ये आणि आमच्यांतला एक हो.

"खालीं उतर आणि आमच्या भाकरीनें आपली क्षुधा आणि आमच्या द्राक्षमधूनें आपली तृषा शांत कर."

आपल्या आत्म्याच्या एकांतांत त्यांनीं इतकें सगळें म्हटलें;

पण त्यांचा एकांत अधिक गाढ असता, तर त्यांनीं हें जाणिलें असतें कीं, केवळ तुमच्या आनंदाचें आणि दुःखाचें रहस्यच मी शोधीत होतों,

आणि आकाशांत संचरणाऱ्या तुमच्या विराट् रूपांचीच केवळ मी पारध करीत होतों.

पण पारध करणाराची देखील पारध झाली;

कारण माझे पुष्कळसे बाण केवळ माझ्या हृदयाचा ठाव घेण्याकरितांच माझ्या धनुष्यांतून सुटले होते.

आणि उड्डाण करणारा सरपटणाराहि होता;

कारण, सूर्यकिरणांत माझे पंख पसरले तेव्हां त्यांची छाया पृथ्वीवर कांसव बनली.

आणि मी जसा श्रद्धावान् होतों तसा संशयात्माहि होतों;

कारण, तुमच्यावर माझी अधिक श्रद्धा बसावी आणि तुमचें मला अधिक ज्ञान व्हावें एवढ्याकरितां मीं आपली अंगुली आपल्या स्वतःच्याच व्रणांत अनेकदां घातली आहे.

आणि याच श्रद्धेनें आणि ज्ञानानें मी सांगतों :

तुम्ही आपल्या शरीरांत बंदिस्थ झालेले नाहीं, अथवा आपलीं घरें आणि शेतें यांनीं मर्यादित झालेले नाहीं.

तुमचें जें खरें स्वरूप आहे तें पर्वतावर वास करितें आणि वायूसंगें भ्रमण करितें.

उबेसाठीं उन्हांत रांगणारी अथवा सुरक्षिततेसाठीं अंधारांत बिळें करणारी ती वस्तु नाहीं,

तर ती एक मुक्त वस्तु आहे; पृथ्वीला व्यापून आकाशांत संचार करणारें तें एक चैतन्य आहे.

हे शब्द अस्पष्ट असतील तर ते स्पष्ट करण्याचा प्रयत्न करूं नका.

वस्तुमात्राचा आरंभ अस्पष्ट आणि आकारहीन असतो, पण त्याचा अंत तसा असत नाहीं.

आणि आरंभ म्हणूनच तुम्ही माझें स्मरण ठेवावें अशी माझी इच्छा आहे.

जीवनाची, आणि चैतन्यमय अशा सर्व वस्तूंची गर्भधारणा द्रव-बिंदूंत होत असते; स्फटिकांत ती होत नाहीं,

आणि स्फटिक म्हणजे क्षय पावणारा द्रवबिंदूच नसेल हें कोण सांगूं शकेल ?

माझें स्मरण करीत असतांना तुम्ही हें स्मरणांत ठेवावें अशी माझी इच्छा आहे :

तुमच्यांत जें अत्यंत दुर्बल आणि बावरलेलें भासतें तेंच अत्यंत बलवान् आणि दृढनिश्चयी असतें.

तुमच्या अस्थींच्या सांगाड्याला उभारणारा आणि दृढ करणारा तुमचा श्वासच नसतो काय ?

आणि जें स्वप्न पडल्याची तुम्हांला कोणालाच आठवण नाहीं, अशा एका स्वप्नानेंच नाहीं का तुमची नगरी निर्मिली आणि तिच्यां-तील सारें कांहीं निर्माण केलें ?

त्या श्वासाचे तरंग तुम्हांला बघतां येतील, तर इतर सारें बघ-ण्याचें तुम्ही सोडून द्याल.

आणि त्या स्वप्नाची कानगोष्ट जर तुम्ही ऐकाल, तर तुम्हांला इतर ध्वनी ऐकण्याची इच्छा उरणार नाहीं.

पण तुम्हांला बघतां येत नाहीं, अथवा ऐकतां येत नाहीं, आणि तेंच चांगलें आहे.

तुमच्या नेत्रांवरचें आवरण ज्या हातांनीं विणिलें आहे त्याच हातांनीं तें दूर केलें जाईल,

आणि तुमचे कान बुजवून टाकणारी माती ज्या बोटांनीं मळली आहे त्याच बोटांनीं ती कोरून काढिली जाईल.

आणि तुम्हांला दिसूं लागेल,

आणि तुम्हांला ऐकूं येईल.

तथापि, आपण अंध होतों म्हणून तुम्ही खेद करूं नका आणि बधिर होतों म्हणून दुःख मानूं नका.

कारण, त्या दिवशीं सर्व वस्तूंचीं गूढ प्रयोजनें तुम्हांला समजतील,

आणि म्हणून प्रकाशाप्रमाणेंच अंधकारालाहि तुम्ही धन्यवाद द्याल.

हें सर्व बोलल्यावर त्यानें आपल्या सभोंवतीं अवलोकन केलें, आणि आपल्या सुकाणूंजवळ उभा राहून क्षणांत आतुर झालेल्या शिडांकडे, तर क्षणांत गांठावयाच्या अंतराकडे बघत असलेला आपल्या नौकेचा कर्णधार त्याच्या दृष्टीस पडला.

आणि तो म्हणाला :

धीराचा, खूपच धीराचा, माझा कर्णधार आहे.

वारा वाहूं लागला आहे, आणि शिडें अगदीं अधीर झालीं आहेत;

सुकाणूंदेखील दिग्दर्शनाची आराधना करीत आहे;

तथापि माझा कर्णधार माझें भाषण संपण्याची शांत चित्तानें वाट बघत आहे.

आणि ज्यांनीं महासागराचें वृंदगान श्रवण केलें आहे अशा माझ्या या खलाशांनींहि माझें भाषण अधीर न होतां ऐकिलें आहे.

आतां त्यांना अधिक थांबावें लागणार नाहीं.

मी तयार आहें.

निर्झर सागराला मिळाला आहे, आणि पुनः एकदां जगज्जननी आपल्या बालकाला आपल्या हृदयाशीं धरीत आहे.

*

नमस्ते, ऑरफालीझवासी जनहो,

आजचा दिन समाप्त झाला आहे.

पुनः प्रातःकाळ होईपर्यंत पद्म ज्याप्रमाणें मिटून राहातें त्याप्रमाणें दिवस आपणांवर मावळत आहे.

आपणांला येथें जें कांहीं अर्पण करण्यांत आलें आहे तें आपण जतन करून ठेवूं.

आणि तें पुरेसें नसेल, तर पुनः आपणांला एकत्रित आलें



' मी तुमच्याकडे पुनः परत येईन '

पाहिजे आणि एकत्रित होऊन दात्यापुढें आपले हात पसरिले पाहिजेत.

विसरूं नका, मी तुमच्याकडे पुनः परत येईन.

आणखी थोडा वेळ, आणि माझी वासना अन्य शरीराकरितां मृत्तिका आणि जल एकत्रित करील.

आणखी थोडा वेळ, वायूवर एक क्षणभर विश्रांति, आणि एक अन्य माता मला धारण करील.

तुम्हांला आणि तुमच्याबरोबर घालविलेल्या यौवनाला प्रणाम.

केवळ कालच स्वप्नामध्यें आपलें मीलन झालें होतें.

माझ्या एकाकीपणांत तुम्ही मला गीतें गाइलीं आहेत, आणि मीं तुमच्या कामनांचा मनोरा आकाशांत उभाविला आहे.

पण आतां आपली निद्रा उडून गेली आहे, आणि आपलें स्वप्न विरून गेलें आहे, आणि प्रभात केव्हांच संपली आहे.

मध्याह्न समीप आला आहे आणि आपल्या अर्ध-जागृतीचें पूर्ण दिवसांत रूपांतर झालें आहे, आणि आतां आपणांला निरोप घेतलाच पाहिजे.

स्मृतीच्या संधिप्रकाशांत जर पुनः एकदां आपलें मीलन होईल, तर पुनः आपण परस्परांशीं वार्तालाप करूं आणि तुम्ही मला अधिक गाढ गीत गाल.

आणि जर दुसऱ्या एकाद्या स्वप्नांत आपले कर जुळले, तर आपण आणखी एक मनोरा आकाशांत उभारूं.

असें म्हणून त्यानें आपल्या खलाशांना इषारा केला, आणि लागलीच त्यांनीं नांगर वर खेंचला आणि बांधिलेल्या दोरांपासून नौका मोकळी केली, आणि ते पूर्वेकडे चालले.

आणि जणुं एकाच हृदयांतून निघावा त्याप्रमाणें लोकांमधून शोक-ध्वनि निघाला, आणि तो संध्येच्या छायेमध्यें फैलावला आणि तुतारीच्या एकाद्या महान् ध्वनीप्रमाणें समुद्रावर सर्वत्र पसरला.

अल्मित्रा तेवढी शांत होती; धुक्यामध्यें नौका अदृश्य होईपर्यंत तिच्याकडे ती एकाग्र दृष्टीनें बघत राहिली होती.

आणि सर्व लोकांची पांगापांग झाल्यावर समुद्रतटावर एकटीच उभी राहून आपल्या हृदयांत ती अल्-मुस्तफाच्या वचनाचें स्मरण करीत होती :

"आणखी थोडा वेळ, वायूवर एक क्षणभर विश्रांति, आणि एक अन्य माता मला धारण करील."

# परिशिष्ट

[ पुढील पांच उताऱ्यांपैकीं पहिले चार उतारे 'विहंगम' मासिकांतून घेतले असून ते आचार्य काकासाहेब कालेलकर यांनीं अनुवादिले आहेत. ]

## मी वेडा कसा झालों ?

'मी वेडा कसा झालों ?' ऐका सांगतों. गोष्ट अशी झाली कीं, फार पूर्वी, जेव्हां बरेचसे देव जन्मलेहि नव्हते, तेव्हां एकदां गाढ झोपेंतून मी उठलों आणि पाहतों तों माझे सगळेच मुखवटे चोरीस गेलेले आहेत. —मीं सात मुखवटे तयार केले होते; सात जन्म वापरत आलों होतों— आतां काय करावें ? मी गोंधळलों आणि "चोर, चोर, कंबक्त चोर," असें ओरडत रस्त्यानें लोकांच्या गर्दींतून धावूं लागलों. अगदीं उघडानागडा; कारण माझे मुखवटेच मजजवळ नव्हते.

रस्त्यावरील स्त्री-पुरुष मला पाहून हंसूं लागले. कांहींना माझी भीति वाटली, आणि ते आपापल्या घरांत शिरले. जेव्हां मी बाजारांत पोंचलों, तेव्हां काय झालें, एका घराच्या गच्चीवर एक तरुण उभा होता तो ओरडला, "अरे हा वेडा आहे." त्या तरुणाकडे पाहण्यासाठीं मीं मान वर केली, आणि अगदीं पहिल्यानें सूर्यकिरणांनीं माझ्या उघड्या चेहेऱ्याला गोंजारलें. अगदीं पहिल्यानें सूर्यनारायणानें आपल्या कोमल करांनीं माझा उघडा चेहेरा गोंजारला. आणि एकदम सूर्यनारायणाविषयींच्या भक्तीची ज्योत माझ्या हृदयांत प्रकट झाली. एकाएकीं मला मुखवटे नकोसे

वाटूं लागले. भावावेशांत येऊन मी उद्गारलों, "ज्यांनीं माझे मुखवटे चोरले त्या चोरांचें कल्याण असो. कल्याण असो."

अशा रीतीनें मी पागल बनलों.

या वेडेपणामुळें मला माझी स्वतंत्रताहि मिळाली आणि निर्भयताहि मिळाली—अगदीं एकटें एकाकी असण्याची स्वतंत्रता मिळाली. आणि कोणीहि माझे म्हणणें बरोबर समजेल अशी भीतीहि उरली नाहीं. कारण गोष्ट अशी आहे कीं, आपलें म्हणणें कोणालाहि ज्या मानानें समजतें तितक्या मानानें ते आपल्याला—आपल्या तेवढ्या अंशाला—दास बनवितात.

पण मला मिळालेल्या निर्भयतेचा, या सुरक्षिततेचा अभिमान बाळगतां कामा नये. तुरुंगांतदेखील एक चोर दुसऱ्या चोरापासून सुरक्षित असतोच कीं नाहीं!

## राजा

सादीक देशच्या नागरिकांनीं राजवाड्याला वेढा दिला आणि त्यांनीं जोरजोरानें बंड पुकारलें. तेव्हां राजा एका हातांत आपला मुकुट आणि दुसऱ्या हातांत राजदंड असे घेऊन राजवाड्याच्या पायऱ्या उतरत बाहेर आला. राजाची ती तेजःपुंज मुद्रा बघून लोकांचा जमाव दबला गेला आणि त्यांचा ओरडा शांत पडला. लोकांपुढें उभा राहून राजा म्हणाला :

"मित्रहो, कारण तुम्ही आतां माझे प्रजाजन नाहीं आहांत; हा मी माझा मुकुट आणि राजदंड तुमचा तुम्हांला परत देतों. मला तुमच्यापैकींच एक होऊन राहावयाचें आहे. मी काय एकटा गडी. तरी परंतु तुमच्यापैकींच एक होऊन कांहींतरी करावें, आणि

आपली सर्वांची स्थिति सुधारावी असें मला वाटतें. राजाची जरूरच काय आहे? आपल्याला राजा नकोच. आपण शेतांत जाऊं, बगीच्यांत जाऊं, आणि हातांत हात घालून कामाला लागूं. फक्त तुम्ही आतां मला एवढेंच सांगा कीं, मीं कोणत्या शेतांत किंवा बगीच्यांत किंवा बागेंत काम करावें ? आतां तुम्ही सर्वचजण राजे आहांत."

लोक आश्चर्यानें दंग झाले. त्यांना कांहींच बोलवेना. त्यांना वाटत होतें कीं, आपल्या असंतोषाचें मूळ राजाच आहे; आणि तो तर आपला मुकुट आणि आपला राजदंड देऊन टाकून आपल्यापैकींच एकजण होऊं पाहात आहे.

इतकें झाल्यावर प्रत्येकजणानें आपला रस्ता धरला आणि राजादेखील एका मनुष्याबरोबर शेतांत गेला.

पण सादीकच्या राज्यांत राजा नसल्यानें लोकांची स्थिति कांहीं सुधारली नाहीं आणि असंतोषाचें धुकें सगळ्या देशभर पुनः पसरलें. शेवटीं लोक बाजारांत आणि चावडींत येऊन उद्वेगानें पुकार करूं लागले कीं, "आम्हांला राजा पाहिजेच. आम्हांला आमच्या डोक्यावर राज्य हवें आहे." आणि मग वृद्ध आणि तरुण दोघेहि म्हणूं लागले कीं, "आम्हांला आमचा राजा परत हवाच आहे."

शेवटीं निघाले सगळे राजाला शोधायला. त्यांना तो एका शेतांत नांगर हाकीत असलेला दिसला. त्यांनीं त्याला बोलावून सिंहासनावर स्थपिलें. त्याचा तो मुकुट आणि राजदंड त्याला परत दिला; आणि म्हणाले, "आपली सर्व शक्ति आणि न्यायबुद्धि वापरून आमच्यावर राज्य करा."

राजा म्हणाला, "माझी जी कांहीं शक्ति असेल ती सर्व वापरून मी राज्य करीनच; पण माझें राज्य न्यायाचें व्हावें म्हणून मी सर्व पृथ्वीवरील आणि स्वर्गातील देवांची प्रार्थना करतों."

लोकांनीं मोठ्या आनंदानें त्याला पुनः राज्याभिषेक केला. थोड्याच दिवसांत कांहीं स्त्री-पुरुषांचा घोळका राजाजवळ आला आणि एक जमीनदार आमचा फार छळ करतो, त्यानें आम्हांला अगदीं शेती करणारे गुलाम करून टाकिलें आहे अशी तक्रार केली. राजानें ताबडतोब त्या जमीनदाराला आपल्यासमोर बोलावून आणिलें आणि सांगितलें, "देवाच्या दृष्टीनें सगळीं माणसें सारखीं. देवाच्या तराजूंत एक मनुष्य लहान आणि एक मोठा असा भेद नाहीं. तुला आपल्या जहागिरींत राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या आणि बागवानांच्या जिंदगीची किंमत कळत नाहीं म्हणून तुला हद्दपार करण्यांत येत आहे. या क्षणींच हें राज्य सोडून चालता हो."

दुसऱ्या दिवशीं इतर लोकांनीं येऊन फिर्याद केली कीं, या डोंगराच्या पलीकडच्या बाजूला राहणाऱ्या एका सरदारिणीनें अगदीं कहर करून सोडिला आहे. राजानें तिलाहि बोलावून आणिलें आणि सांगितलें, "हे लोक शेतांत राबतात आणि बागेंत मशागत करतात. यांनीं तयार केलेलें अन्न आणि आणून दिलेलें दूध आपण फुकटचें बसून खातों. तेव्हां खरोखर आपल्यापेक्षां हे लोकच उच्च कुळीचे म्हटले पाहिजेत. या लोकांचें घराणें आपल्यापेक्षां निःसंशय थोर आहे, हें तुला पटत नाहींसें दिसतें. तेव्हां तूंहि हें राज्य सोडून गेलें पाहिजेस. माझें राज्य तर सोडच, पण या राज्यापासून जितकें दूर जाऊन राहतां येईल तितकें दूर जा आणि पुनः या बाजूला फिरकूं नकोस."

एवढें आटपतें न आटपतें तोंच लोकांचा एक तिसरा जमाव येऊन म्हणूं लागला कीं, "महाराज, आमचा पाद्री (धर्मगुरु) आम्हांला वेठीला धरून आमच्याकडून मोठमोठे धोंडे आणवतो आणि देऊळ बांधण्यासाठीं आमच्याकडून ते फोडून घेतो. या पाद्र्याच्या खजिन्यांत रुपये आणि मोहरा तुडुंब भरल्या आहेत. आणि आमच्या पोटांत भुकेची नुसती आग भरली आहे. इतकें असून हा आम्हांला कांहींच मजुरी देत नाहीं." राजानें पाद्र्याला बोलावलें आणि सांगितलें कीं, "प्रभु ख्रिस्ताच्या नांवानें हा जो क्रूस तूं आपल्या गळ्यांत बांधिला आहेस त्यानें लोकांना जीवन प्राप्त झालें पाहिजे. हें त्यागाचें द्योतक आहे; बलिदानाचें द्योतक आहे. जिवास जीव देण्याच्याऐवजीं तूं तर या जिवांचा जीवच घेत आहेस आणि तुझ्याकडून त्यांना कष्ट आणि यातना यांखेरीज कांहींच मिळत नाहीं. या क्षणीं माझ्या राज्यांतून चालता हो आणि खबरदार पुनः येथें पाऊल टाकलेंस तर."

अशा रीतीनें एक महिनाभर स्त्री-पुरुषांनीं येऊन आपापलीं गाऱ्हाणीं राजापुढें मांडलीं आणि रोजरोज एक महिनाभर कोणी ना कोणी जुलूमगार हद्दपार केला गेला.

सादीकच्या रहिवाशांना राजाची ही न्यायनिष्ठुरता पाहून आनंद झाला.

पुढें एके दिवशीं शहरांतले सर्व वृद्ध आणि सर्व तरुण राजवाड्यासमोर आले आणि त्यांनीं राजाला हांक मारली. एका हातांत मुकुट आणि एका हातांत राजदंड घेऊनच राजा बाहेर आला आणि म्हणाला, "आतां मीं काय करावें अशी तुमची इच्छा आहे ? तुम्ही मला धारण करावयास सांगितलेल्या वस्तू या पाहा मी तुम्हांला परत करीत आहें."

पण नागरिक म्हणाले, " छे छे ! तुम्हीच आमचे खरे राजे आहांत. तुम्ही सबंध राज्यांतील कृष्णसर्प मारून टाकलेत आणि सगळ्या लांडग्यांचा नाश केला आहे. आम्ही फक्त तुमचा जयजयकार करण्यासाठीं आलों आहों. तेव्हां राजदंड तुमच्या हातांतच असणें योग्य आहे. आणि हा मुकुट तुम्हांलाच शोभतो."

राजा म्हणाला, " तुम्ही चुकतां आहांत. राजा मी नव्हे, राजत्व खरोखर तुमचें आहे. जेव्हां तुम्हांला वाटलें होतें कीं, मी दुर्बल आहे आणि बरोबर राज्य करीत नाहीं, तेव्हां खरोखर तुम्हीच दुर्बल होतां; आणि तुम्हांलाच बरोबर वागतां येत नव्हतें. आणि आतां राज्याची भरभराट आहे याचें कारणहि तुमचा संकल्पच आहे. मी म्हणजे तुम्हां सर्वांच्या मनांतील विचार. तुम्हां सर्वांच्या क्रियेंतच माझें अस्तित्व आहे. राज्यकर्ता म्हणून कोणी व्यक्ति नसतेच. प्रजाच प्रजेवर राज्य करीत असते."

असें म्हणून आपला मुकुट आणि राजदंड घेऊन राजा आपल्या महालांत परत गेला आणि ते सर्व वृद्ध-तरुण संतुष्ट होऊन आपापल्या मार्गानें गेले.

आणि तेव्हांपासून प्रत्येक नागरिकाला वाटूं लागलें, कीं एका हातांत राजदंड आणि एका हातांत मुकुट असलेले आपण राजेच आहोंत.

## सुधारणा

तीन कुत्रे उघड्यावर ऊन खात आणि आपापसांत गप्पा मारीत बसले होते.

पहिला कुत्रा अर्धवट झोपेंत म्हणतो, " हल्लींच्या श्वानयुगांत जन्म येणें हें किती धन्यतेचें आहे ! आतां आपण किती सहज

समुद्रांतून प्रवास करूं शकतों! पृथ्वीची सफर करतों आणि आकाशमार्गानें देखील जाऊं शकतों! आणि कुत्र्यांच्या सुखासाठीं, आपल्या डोळयांना, कानांना आणि नाकांना बरें वाटावें म्हणून कितीतरी शोध होत आहेत, याचाहि विचार करा. खरोखर हें धन्य युग आहे."

यावर दुसरा कुत्रा म्हणतो, "हल्लींच्या या सुधारणा-युगांत आपण कलेकडे देखील विशेष लक्ष देतों. चंद्राला बघून भुंकतांना आपल्या पूर्वजांच्या भोंकण्यापेक्षां आपलें भोंकणें अधिक तालबद्ध असतें. आणि जेव्हां पाण्यांत आपण आपलें प्रतिबिंब पाहतों तेव्हां दिवसेंदिवस आपली मुद्रा अधिकाधिक सुरेख दिसते."

यावर तिसरा कुत्रा म्हणतो, "मला सर्वांत आकर्षक वस्तु वाटते ती ही कीं, हल्लीं निरनिराळ्या श्वानराज्यांमध्यें सलोख्याची शांति नांदत आहे. यामुळें मला मोठें सुख वाटतें."

तिघांचा असा सुखसंवाद चालू आहे इतक्यांत डोळे उघडून पाहतात तों काय? अरे बाप रे! कुत्रीं पकडणारा कातोडी हातांत फास घेऊन येत आहे!

तिघांहि कुत्र्यांनीं एकदम टण्‌दिशी उडी मारिली आणि गल्लींतून त्यांनीं जीव घेऊन पळ काढिला. पळतां पळतां तिसरा कुत्रा म्हणतो, "पळा रे पळा; जीव घेऊन पळा. सुधारणा आपला पाठलाग करीत आहे!"

## दुसरा अतिथि

एकदां रस्त्यावर मला दुसरा मनुष्य भेटला. तोदेखील थोडासा वेडसरच होता. मला म्हणाला, "मी एक फिरस्ता आहे—परिव्राजक. पुष्कळ वेळां मला वाटतें, या पृथ्वीवर माझ्या आसपास

सारे वालखिल्यच ( pigmies ) आहेत. त्यांच्यापेक्षां माझें डोकें पृथ्वीहून सत्तर हात उंच असल्यानें माझ्या डोक्यांत उच्च आणि स्वतंत्र विचार येतात.

" खरें सांगावयाचें म्हणजे मी लोकांमध्यें वावरत नसून त्यांच्याहून उंच अशा भूमिकेवर विचरत आहें. मैदानांत उमटलेलीं माझीं पावलेंच काय तीं त्यांना दिसतात.

" आणि पुष्कळ वेळां माझ्या पावलांच्या मापाविषयीं आणि आकाराविषयीं आपापसांत हुज्जत घालतांना त्यांना मी ऐकतों. कांहींजण म्हणतात, 'हीं पावलें इतिहासपूर्वकालीं या पृथ्वीवर हिंडणाऱ्या अगडबंब जनावरांचीं ( Mammoth ) आहेत.' आणि दुसरे म्हणतात, 'छे छे! या ठिकाणीं दूरच्या ताऱ्यांवरून उल्का पडल्या होत्या त्यांच्या या खुणा उमटल्या आहेत.'

" पण मित्रा, तुला तर पूर्णपणें ठाऊक आहे, कीं हीं या एका अतिथीचीं पावलें आहेत. दुसरें तिसरें कांहीं नाहीं."

## राष्ट्र

आणि हाफिज नांवाचा त्याचा एक शिष्य त्याला म्हणाला, गुरुदेव, ऑरफालीझ नगरीविषयीं, आणि जेथें तुम्हीं तीं बारा वर्षें घालविलीत त्या भूमीविषयीं आम्हांला सांगा.

आणि अल्-मुस्तफा स्तब्ध राहिला, त्यानें डोंगरांकडे व अनंत आकाशाकडे पाहिलें; त्याच्या मूकतेंत द्वंद्व चाललेलें होतें.

नंतर तो म्हणाला, " माझ्या मित्रांनो आणि सह-यात्रिकांनो, श्रद्धांनीं परिपूर्ण पण धर्मानें शून्य असें राष्ट्र अनुकंपनीय होय.

" स्वतःच विणलेलें वस्त्र जें वापरीत नाहीं, स्वतःच पिकविलेल्या धान्याची भाकरी जें खात नाहीं आणि स्वतःच्याच चरकामधून गाळिलेला मधु जें पीत नाहीं तें राष्ट्र अनुकंपनीय होय.

" भेकड आणि जुलमी पुरुषाचा जें वीरपुरुष म्हणून गाजावाजा करितें, आणि झगमगणाऱ्या जेत्याला जें उदार मानितें तें राष्ट्र अनुकंपनीय होय.

" विकाराचा आपल्या स्वप्नामध्यें जें तिरस्कार करितें, पण आपल्या जागृतींत जें त्याच्या आहारीं जातें तें राष्ट्र अनुकंपनीय होय.

" केवळ स्मशानयात्रेमध्यें चालतांनाच जें आपला आवाज उंच चढवितें, केवळ स्वतःच्या विनाशाच्या वेळींच जें बढाई मारितें, आणि स्वतःचा कंठ तलवारीच्या धारेखालीं गेला म्हणजेच जें बंड करून उठतें तें राष्ट्र अनुकंपनीय होय.

" कोल्हा हा ज्याचा मुत्सद्दी आहे, गारुडी हा ज्याचा तत्त्ववेत्ता आहे, ठिगळें लाविण्याचें व भ्रष्ट अनुकरण करण्याचें कौशल्य हीच ज्याची कला आहे तें राष्ट्र अनुकंपनीय होय.

" आपल्या नव्या राज्यकर्त्याचें जें तुताऱ्यांनीं स्वागत करितें, आणि पुनः तसल्याच तुताऱ्यांनीं दुसऱ्या राज्यकर्त्याचें स्वागत करण्याकरितां पहिल्याची निषेधप्रदर्शक आरोळ्यांनीं जें बोळवण करितें तें राष्ट्र अनुकंपनीय होय.

" वृद्धत्वामुळें ज्याच्या ऋषींची वाचा गेली आहे, आणि ज्याचे बलाढ्य पुरुष अद्यापि पाळण्यांतच आहेत तें राष्ट्र अनुकंपनीय होय.

" ज्या राष्ट्राचे तुकडे उडाले आहेत आणि ज्यांतील प्रत्येक तुकडा स्वतःलाच राष्ट्र समजत आहे तें राष्ट्र अनुकंपनीय होय. "

## आगामी प्रकाशन

१ कल्की अर्थात् संस्कृतीचें भवितव्य : एस्. राधाकृष्णन्
२ ग्रामोद्योगांचें पुनरुज्जीवन : जे. सी. कुमारप्पा
३ बापू : घनश्यामदास बिर्ला

महाराष्ट्राचे लोकप्रिय साहित्यिक

# श्री. साने गुरुजी यांचा अभिप्राय

श्री. **र. ग. जोशी** यांनीं जगद्विख्यात सीरियन कवि **खलिल गिब्रान** याच्या 'Prophet' या पुस्तकाचा केलेला मराठी अनुवाद मीं वाचून पाहिला होता. रवीन्द्रनाथांच्या गीतांजलीप्रमाणें खलिल गिब्रानचें हें पुस्तक सर्वत्र डोक्यावर घेतलें गेलें आहे. हें काव्यात्मक तत्त्वज्ञान आहे, तत्त्वज्ञानात्मक काव्य आहे. इक्बाल, रवीन्द्रनाथ, कबीर वगैरे महाकवींची आठवण हें काव्य वाचतांना पदोपदीं येई. हें जीवनाचें उपनिषद् आहे. श्रीभगवद्गीतेंतील सारें तत्त्वज्ञान या अमर पुस्तकांत आहे. श्री. जोशी यांनीं केलेला हा अनुवाद मी माझ्या मित्रांना वाचून दाखवीत असें. दररोज रात्रीं हा अनुवाद मी वाचून दाखवीत असें. बाहेर चांदणें पडलें असावें, वारा वाहात असावा व भावमधुर व भावगंभीर असें हें काव्य वाचतांना व ऐकतांना आम्ही सारे तन्मय होत जात असूं. जीवनांतील असा एकहि प्रश्न नाहीं, कीं जो उत्कटपणें येथें मांडलेला नाहीं. या कविश्रेष्ठाची अंतर्भेदी खोल प्रतिभा येथें उत्कट रीतीनें दिसून येते. प्रेमावरचे विचार किंवा मुलांविषयींचे विचार, मरणाविषयींचे विचार किंवा ज्ञानाविषयींचे विचार, मानवी कायद्यांवरचे विचार किंवा सौंदर्यावरचे विचार कोठलेंहि प्रकरण काढा. ते ते विचार वाचतांना आपण गंभीर होतों. कधीं डोळ्यांत अश्रू येऊन आपण सद्गदित होतों, तर कधीं अधिक खोल विचार करूं लागतों. किती समर्पक उपमा व दृष्टांत ठायीं ठायीं दिसून येतात. किती अर्थपूर्ण वाक्यें आढळतात :

"तुम्ही मुलांना आपलें प्रेम द्या, पण आपले विचार देऊं नका."

"एकाद्या जुलमी राजाला तुम्ही पदच्युत करूं इच्छीत असाल तर प्रथम आपल्या अंतःकरणांत उभविलेलें त्याचें सिंहासन नष्ट झालें आहे, हें बघा."

"पतिपत्नींनीं परस्परांवर प्रेम करावें, परंतु आपल्या प्रेमाची बेडी बनवूं नये."

किती [illegible] वचनें, कीं ज्यांतील एकेकांत अर्थसिंधु भरलेला आहे. एकेका वचनावर एकेक निबंध लिहितां येईल. एकेका वचनांत एकेक तत्त्वज्ञान भरलेलें दिसेल. गीतेंतील कर्मयोग या पुस्तकांत आहे. कर्माविषयींचे, दानाविषयींचे किंवा इतर आध्यात्मिक विचार वाचतांना भगवद्गीता डोळ्यांसमोर उभी राहते.

असें हें अमोल व अमर पुस्तक मराठी भाषेंत आतांपर्यंत आलें नाहीं याचें आश्चर्य वाटलें. परंतु श्री. जोशी यांनीं हा अनुवाद करून मराठी वाचकांवर उपकार केले आहेत. हा अनुवाद उत्कृष्ट झाला आहे. भाषा ओघवती आहे. अनुवादकाला वेंचक संस्कृत शब्द योजिण्याची सुंदर हातोटी साधली आहे. योग्य शब्द योग्य ठिकाणीं घालण्यांत त्यांनीं सरसता दाखविली आहे. हा अनुवाद मला वेड लाविता झाला. मीं ज्यांना हा अनुवाद वाचून दाखविला त्यांतील कितीकांनीं तरी हा अनुवाद उतरून घेतला; कांहींनीं तर सर्व अनुवाद उतरून घेतला. छापून होईल तेव्हां होईल; आतांच हें "**जीवन-दर्शन**"—हें जीवनाचें मधुर-गंभीर तत्त्वज्ञान, प्रेरणा देणारें, दृष्टि देणारें, विचार करायला लावणारें तत्त्वज्ञान—घेऊन जाऊं या असें जणुं त्या मित्रांना वाटे. हा अनुवाद अशा रीतीनें छापण्याचे आधींच घरोघर जाऊं लागला होता. आतां प्रकाशित होऊन सर्वत्र जावो. सर्वांचीं जीवनें सुंदर करो. श्री. जोशी यांनीं हा अनुवाद अति काळजीपूर्वक केला आहे. तो सर्वांना आवडो.

—**पां. स. साने**

# आमचें प्रकाशन

* १, २ **सत्याचे प्रयोग** (खंड १ तृतीयावृत्ति; खंड २ द्वितीयावृत्ति) :
लेखक : म. गांधी मूल्य प्रत्येक खंडास १ रु.

* ३ **खादी-मीमांसा** (सुधारून वाढविलेली दुसरी आवृत्ति) :
लेखक : बाळूभाई मेहता मूल्य १॥ रु.

४ **स्वराज्य-शिपाई** : म. गांधी (शिल्लक नाहीं) मूल्य ६ आणे

५ **संयम कीं स्वैराचार?** म. गांधी ( ,, ,, ) मूल्य ८ आणे

६ **हिंडलग्याचा प्रसाद** :
लेखक : काका कालेलकर ( ,, ,, ) मूल्य ९ आणे

* ७ **हिंदुधर्माचीं मूलतत्त्वें व पुनर्घटना** :
लेखक : एस्. राधाकृष्णन् मूल्य १ रु.

* ८ **उपनिषदांतील दहा गोष्टी** (द्वितीयावृत्ति) :
लेखक : शंकरराव देव मूल्य ६ आणे

* ९ **विद्यार्थी-जीवन** (द्वितीयावृत्ति) :
लेखक : श्री. स. महाजन मूल्य ८ आणे

*१० **फिलिफाइन्सच्या स्वातंत्र्याचा इतिहास** :
लेखक : त्र्यं. र. देवगिरीकर मूल्य १ रु.

११ **काँग्रेसचा इतिहास** (द्वितीयावृत्ति) :
लेखक : डॉ. पट्टाभि सीतारामय्या मूल्य २ रु.

१२ **समाजवादच कां?**
लेखक : जयप्रकाश नारायण मूल्य १० आणे

१३ **खानबंधूंचा अल्प परिचय** :
लेखक : महादेवभाई देसाई मूल्य ९ आणे

१४ **जवाहरलाल नेहरू** (आत्मचरित्र) :
अनुवादक : ना. ग. गोरे मूल्य ५ रु.

*१५ **विश्राम** (द्वितीयावृत्ति) : साने गुरुजी मूल्य १२ आणे

*१६ भारतीय संस्कृति : साने गुरुजी मूल्य १॥ रु.
१७ प्रसाद्-दीक्षा : म. गांधी मूल्य १ रु.
*१८ भिल्ल साधु गुलामहाराज : शं. वि. ठकार (शिल्लक नाहीं) मूल्य ६ आणे
*१९ आधुनिक भारत : शं. द. जावडेकर मूल्य ४ रु.
*२० हिमालयांतील प्रवास : काका कालेलकर मूल्य १॥ रु.
२१ गांधीजींचें विविध-दर्शन :
संकलनकार : एस्. राधाकृष्णन् मूल्य १॥ रु.
*२२ जिवंत व्रतोत्सव : काका कालेलकर मूल्य १॥। रु.
२३ गांधीविचारदोहन : किशोरलाल मश्रूवाळा मूल्य १। रु.
२४ सत्याग्रही महाराष्ट्र : प्रेमा कंटक मूल्य ३ रु.
*२५ अर्थशास्त्र कीं अनर्थशास्त्र ? : जॉन रस्किन
अनुवादक : शं. द. जावडेकर मूल्य १। रु.
२६ जीवन-दर्शन : महाकवि खलिल गिब्रान
अनुवादक : र. ग. जोशी मूल्य १॥ रु.

---

* हीं पुस्तकें मुंबई, मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील सरकारी विद्याखात्यांनीं शाळांतील वाचनालयांकरितां व बक्षिसांकरितां मंजूर केलीं आहेत.

---

एक रुपया वर्गणी भरून कायम ग्राहक होणारांस प्रत्येक पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळेल. ट. ख. निराळा.

प्रसिद्ध होणारीं सर्व पुस्तकें कायम ग्राहकानें घेतलींच पाहिजेत.

व्यवस्थापक
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला,
टिळक रोड, पुणें २